म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल-वाङ्मय
दा. क्र. ४३७०


BVBK-0404370

दा.क्र. ४३७०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 MAR 1975

* अकलेचे तारे *

(विविध विनोदी साहित्य)

२९२२०
अनुक्रमांक
वि. भाग
१९१२
दि.
१-२-६५

: लेखक :

वि. आ. बुवा

म. रा. वि. सं. पुणे, ग्रंथालय शाखा.
ग्रं. क्र. ८३७० दि. दि.
वि. वा. वा.



बलवन्त प्रकाशन

बलवन्त पुस्तक भाण्डार
गिरगांव नाका, मुंबई नं. ४.

प्रकाशन क्रमांक २६

BVBK-0404370

प्रकाशक :
त्रिं. वि. परचुरे,
बलवंत पुस्तक भांडार,
गिरगांव, मुंबई ४

मुद्रक :
व्यं. रा. शिंगरे,
सर्वोदय मुद्रणालय,
४५० बुधवार, पुणें २.

मुखपृष्ठावरील चित्र :
शि. द. फडणीस
फणसे लॉज, घोले रोड,
पुणें ५.

मुखपृष्ठ मुद्रक :
सर्वोदय प्रिंटर्स,
खेतवाडी,
मुंबई ४.

प्रथमावृत्ति :
मकर—संक्रांत
शके १८७४
१४ जानेवारी १९५३

सर्व
अधिकार
लेखकाधिन

द्वितीयावृत्ति
बलिप्रतिपदा,
शके १८७७

किं म त
१।।।
रु प ये

फुकटांत
मिळालेल्या
परंतु
कमाई
करून
देणाऱ्या
फाउंटनपेनास →
सादर
समर्पण



—वि आ. बुवा

न सांगितलेलें तात्पर्य

श्री. बुवा यांनीं आपल्या विनोदबुद्धीचें पहिलें शरसंधान माझ्यावरच केलें आहे. कारण त्यांनीं मला या संग्रहाला प्रस्तावना लिहिण्यास सांगितलें आणि यांतले बहुतेक लेख 'नवशक्ती'त प्रसिद्ध झाले होते याचें मला स्मरण करून दिलें. इतकेंच काय पण ज्या 'व्यावहारिक शब्दकोशा'मुळें त्यांच्या लिखाणाकडे माझें प्रथम लक्ष गेलें त्यासंबंधीं मीं पूर्वी काय लिहिलें होतें हेंहि त्यांनीं माझ्या नजरेस आणून दिलें. प्रस्तावनेची अशी फक्कड पूर्वतयारी लेखकाला करून देण्याची कल्पना विनोदी नाहीं असें कोण म्हणेल ?

प्रथम हस्तलिखितांत प्रसिद्ध झालेल्या व्यावहारिक शब्दकोशांतील ज्या गुणांमुळें बुवांच्या लिखाणाकडे माझें लक्ष गेलें त्या गुणांचा प्रत्यय हें लिखाण वाचीत असतांना मला वारंवार आला. (कांहीं वेळां अक्षरशः वारंवार, कारण कांहीं कल्पनांची पुनरावृत्ति झालेली आहे.)

हस्तलिखितांतलें लिखाण वर्तमानपत्रांत येणें आणि वर्तमानपत्रांतून त्याचं संक्रमण पुस्तकांत होणं हें उत्क्रांतिवादाचें एक आधुनिक उदाहरण ठरूं शकेल. उत्क्रांतीचा एक धागा त्या तीनहि अवस्थांतून जात असला तरी प्रत्येक अवस्थेचें स्वरूप निराळें असतें. हस्तलिखितांतलें लिखाण म्हणजे खाजगी गप्पा; जगाला त्याची पंचाईत करण्याचें कारण नाहीं आणि जगाच्या अनेक पाशांपासून तें मुक्त असतें. वर्तमानपत्रांत तें आलें कीं जगावर त्याची छाप जशी बसूं लागते तशी जगाचीही त्याच्यावर बसूं लागते. पण वर्तमानपत्रांतील लिखाणाला वर्तमान-काळाखेरीज दुसऱ्या कशाची फिकिर करण्याचें कारण नाहीं. आणि वर्तमानकाळ अक्षरशः क्षणभंगुर असतो. पण पुस्तक छापणें म्हणजे भविष्यकाळालाच आवाहन आणि बुवांनींच या पुस्तकांत एके ठिकाणीं स्मरण करून दिल्याप्रमाणें भविष्यकाळाच्या पोटांत काय काय असतें हें कोणीं सांगावें ? त्यांच्या शब्दकोशांत ' आवाहना'चा अर्थ ' आव्हान ' असाहि असूं शकेल !

म्हणूनच मला वाटतें, वर्तमानपत्र आणि अक्षर–वाङ्मय यांच्यामध्यें एक प्रकारचें शीतयुद्ध सुरू असलेलें दिसतें. तें कांहीं असलें तरी अक्षर वाङ्मय लिहूं इच्छिणारांची वर्तमानपत्रांतं बहुधा पंचाईत झालेली दिसते. विनोदी लेखकांना

ही अडचण विशेष जाणवते. प्रसिद्ध विनोदी लेखक स्टीफन लीकॉक यानें, वर्तमानपत्रांत विनोदी लिखाण करतांना आपले कसकसे हाल होतात याचें वर्णन एके ठिकाणीं केलेलें आहे. मुख्य म्हणजे धांवत्या वाङ्मयाच्या वाचकांच्या आकलन शक्तीच्या कक्षेंत शिरण्यासाठीं विनोदाला एकेक पायरी खालीं उतरावें लागतें, आणि अखेरीस त्याची स्थिति खाणावळींतल्या ताकासारखी होते ! आपल्या इकडे श्री. शिवरामपन्त परांजपे यांची अशी अडचणीची स्थिति झाल्याचें वारंवार आढळतें. श्री. बुवा यांच्या लिखाणांत जी पुनरावृत्ति आढळते तिची संगति तर यामुळें लागतेच, पण सूचकतेचा अभाव कांहीं ठिकाणीं आढळतो तोहि याच कारणामुळें अपरिहार्य झाला असेल. वर्तमानपत्रासाठीं केलेलें लिखाण स्थूल दृष्टीनें करावें लागतें. पण स्थूलपणा शारीरिकप्रमाणेंच कलात्मक सौंदर्यालाहि विघातक ठरतो. विनोदाच्या गोळ्या या ॲटम बॉंबप्रमाणें, निदानपक्षीं होमिओपाथीच्या गोळ्यांप्रमाणें असल्या पाहिजेत. आकार लहान, पण स्फोट अगर ' रिॲक्शन ' प्रचण्ड ! वर्तमानपत्रांत हें साधणें अशक्य होतें, हीच तर लीकॉकसारख्यांची तक्रार !

असें असलें तरी श्री. बुवांच्या लिखाणांतल्या कांहीं कल्पना अगदीं स्फोटक आहेत. ' व्यावहारिक शब्दकोशां'त अशा कल्पना भरपूर आहेत. मंत्रिमहाशयांसारख्यांच्या कैफियती, भारत व चीनमधील साम्य, लाल चिनी प्रेम, कांहीं अकलेचे तारे यांनीं माझें भरपूर मनोरंजन झालें, तसेंच वाचकांचें होईल अशी खात्री वाटते. कांहीं प्रकारांची फारच गंमत वाटली. उदाहरणार्थ, ' इसापनीतींत नसलेल्या गोष्टी'नीं इसापनीतींतील गोष्टींचा फारच वेगळ्या पद्धतीनें प्रत्यय आणून दिला ! तो असा कीं, दोघांनाहि तात्पर्य बांधलेलें आहे ! इसापनीतींतील गोष्टींचें तात्पर्य फारच उघड असल्यामुळें आणि ' इसापनीतींत नसलेल्या गोष्टीं 'चें तात्पर्य विरुद्ध स्वरूपाचें असल्यानें !

तात्पर्यः—पण तें सांगण्याचें कारण नाहीं.

१०-१-१९५३ } प्रभाकर पाध्ये

पहिल्या आवृत्तीचें प्रास्ताविक

'अकलेचे तारे' हें माझें पहिलें पुस्तक वाचकांस सादर करतांना मला आनंद होत आहे.

यांतील बहुतेक लेख 'नवशक्ती'त प्रसिद्ध झाले असून कांहीं थोडे लेख 'लोकमान्यांत' प्रसिद्ध झाले आहेत. एकदोन लेख 'वेणी' प्रभृति चित्रपटविषयक अंकांतून' प्रसिद्ध झाले आहेत. या नियतकालिकांच्या संपादकांनीं परवानगी दिल्याबद्दल मी अतिशय आभारी आहें.

दोन वर्षांपूर्वीच प्रसिद्ध होणार असलेलें हें पुस्तक आतां, 'बलवंत पुस्तक भांडारा'चे मालक श्री. त्र्यं. वि. परचुरे यांच्यामुळें प्रसिद्ध होत आहे. मी नवीन लेखक असून आणि माझें हें पहिलेंच पुस्तक असून तें प्रसिद्ध करण्याचें धाडस **श्री. परचुरे** यांनीं केलें त्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

या कामीं माझे परममित्र प्रा. **स. गं. मालशे** यांच्या झालेल्या साहाय्याचा उल्लेख न करणें अनुचित ठरेल.

ज्यांच्या प्रोत्साहनामुळें मी लेखक झालों त्या **श्री. प्रभाकर पाध्ये**, संपादक 'नवशक्ति', यांची प्रस्तावना या पुस्तकास लाभली याबद्दल मला विशेष आनंद वाटतो.

आपल्या विशिष्ट शैलीनें विनोदी चित्रें काढणारे श्री. **शि. द. फडणीस** यांनीं अत्यंत अल्पावधींत अतिशय सुंदर आणि कल्पकतापूर्ण चित्र काढून दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

'रामकृष्ण प्रेस'चे मालक आणि कामगार–बंधू यांनीं अल्प काळांत पुस्तक सुबकरीत्या छापल्याबद्दल मी त्यांचाहि आभारी आहें.

व्ही. जे. टी. आय्., मुंबई १९
मकर–संक्रांत, शके १८७४

वि. आ. बुवा

दुसऱ्या आवृत्तीविषयीं थोडेंसें

'अकलेचे तारे' या माझ्या पहिल्याच गाजलेल्या विनोदी पुस्तकाची ही सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति रसिक वाचकांना सादर करतांना मला अत्यानंद होत आहे.

१९५३ सालीं पहिली आवृत्ति निघाली होती; आणि आतां इतक्या अल्पावधींतच दुसरी आवृत्ति काढण्याचा सुयोग येत आहे. बृहन्महाराष्ट्रांतील (आणि महाराष्ट्राबाहेरीलहि) श्रेष्ठ साहित्यिकांनीं, प्रमुख नियतकालिकांनीं आणि रसिक वाचकांनीं या पुस्तकाचें प्रशंसापर स्वागत केलें आणि रसिक वाचकांनीं तें विकत घेऊन माझें सक्रिय कौतुक केलें, त्याबद्दल या सर्वांविषयीं कृत्यज्ञता व्यक्त करणें शब्दातीत आहे.

दुसऱ्या आवृत्तींत मूळ मजकुरावरून आवश्यक तेथें हात फिरविला आहे आणि विशेष म्हणजे आणखी छोटीं परंतु चटकदार प्रकरणें वाढविलीं आहेत. यांकडे मी वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों.

'**बलवंत पुस्तक भांडारा**'चे मालक **श्री. त्र्यं. वि. तथा अण्णासाहेब परचुरे** हेच ही दुसरी आवृत्ति प्रसिद्ध करीत आहेत. पहिली आवृत्ति लौकर संपण्यास त्यांच्या व्यावसायिक अनुभवाचें साहाय्य योग्य प्रमाणांत कारणीभूत झालें आहे.

या आवृत्तीची छपाई अल्पावधींत व सुबक केल्याबद्दल **सर्वोदय मुद्रणालया**चे मालक श्री. **व्यं. रा. शिंगरे** आणि कामगार-बंधू यांचा मी अतिशय आभारी आहें.

वाचकांनीं या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचें स्वागत जसें केलें आणि '**अकलेचे दिवे**' या माझ्या दुसऱ्या पुस्तकाचें स्वागतहि ते जसें करीत आहेत तसेंच या आवृत्तीचें सप्रेम स्वागत वाचकांकडून होईल अशी सदिच्छा मी व्यक्त करतों.

गडकरी वाडा, मुरबाड रोड,
कार्तिक शु. १ शके १८७७
दि. १५-११-१९५५

वि. आ. बुवा

अनुक्रमणिका

१	आमच्या कैफियती	१
२	प्रश्नोपनिषद्	४७
३	इसापनीतींत नसलेल्या गोष्टी	५७
४	नव्या म्हणी	७९
५	व्यावहारिक शब्दकोश	८२
६	बायकोबरोबर हिंडतांना	९१
७	मी आणि भारत	९५
८	राजकीय पार्श्वभूमीवरून	९७
९	आर्थिक परिस्थिति आणि मी	१००
१०	बंडु आदर्श माणूस	१०७
११	प्रेमळ संवाद	१०८
१२	अकलेचे तारे	११०

ग्रंथ संग्रहालय, ...
क्रमांक 2...
वा.वा.
१५१२
१-१-५

आमच्या कैफियती

श्रीकृष्ण

'देवकीपरमानंदं कृष्णं वन्दे जगद्गुरुम्' असं म्हणून मला जगाचें गुरुपण देणाऱ्या मंडळीपासून राधेचा अंबाडा सैल करण्याची पोंचट कामागिरी देणाऱ्या पुणेकर मंडळीपर्यंत, आतांपर्यंत असंख्य महाभागांनीं माझी नानाप्रकारें प्रशंसा आणि बदनामी करून ठेवली आहे. कुणीं भाविकानें मला देव बनविलें; कुणीं मला अवतारी पुरुष बनविलें; कुणीं मला तत्त्वज्ञानी बनवलें, तर कुणीं मला छिनालसुद्धां म्हटलें. छे! छे! माझ्याइतकी बरी वाईट कीर्ति अजून तरी कुणी मिळवली नसावी.

माझ्या जन्मापासूनचीच गोष्ट घ्या ना! एखाद्या जन्मजात पुढाऱ्याला शोभेल असा तुरुंगांतील जन्म मला लाभला होता; परंतु कंसाच्या दुष्ट राजवटीमुळें मला जन्मतांच अंडरग्राउंड व्हावें लागलें आणि गोकुळांत नंदाच्या पितृत्वाखालीं दिवस कंठावे लागले. मी तिथें असल्याचा सुगावा कंसाच्या सी. आय्. डी. ना लागला होता; परंतु मी कसला वस्ताद! बेचाळीसच्या वीरांप्रमाणें त्यांना पुरून उरलों होतों.

पुष्कळ पुराणिकांनीं आणि कवींनीं मी तान्हा असल्यापासूनच चावटपणा करूं लागलों अशी माझी जाहिरात करून ठेवली. इतक्या लहानपणीं मीं 'तसला' चावटपणा करणें शक्य आहे का? मी गुटगुटीत दिसायचा म्हणून चार गवळणींनीं येऊन माझे पापे घेतले कीं त्यांत अश्लील नि रोमँटिक असें काय झालें? कितीतरी लग्न झालेल्या बायका आठ दहाच काय परंतु सोळा सोळा वर्षांच्या मुलांचे गालगुच्चे घेतात; त्यांचा हात हातांत घेतात आणि हंसतात. त्यांत आम्हां मुलांची काय चूक? नवरा मनाजोगा नाहीं मिळाला कीं हें असें व्हायचंच! नागपूरच्या तुमच्या भाव्यांनीं नाहीं का, तरणीबांड वहिनी आपल्या अगडबंब नवऱ्यावर नाखूष असून सतरा वर्षांच्या बबनशीं मात्र गुलगुल गोष्टी करते नि त्याला शेजारीं बसवून झोके घेते अशी गोष्ट

लिहिली ? मग राधेनें माझ्याशीं गट्टी जमवली तर बिघडलें कुठें ? राधेचा नवरा आपल्या डेअरीच्या धंद्यांत आणि स्थानिक पुढारपणांत गुंतलेला असल्यामुळें बिचाऱ्या एकट्या राधेनें काय करावें ? माझ्या सहवासांत तिची चार घटका करमणूक होत होती. परंतु लोक कसले घातकी ? त्यांनीं आमच्या प्रेमाचा पिटवला डांगोरा !

चोरीच्या बाबतींतहि तीच बदनामी ! मी चोरून नेहमीं दहींदूध खात होतों म्हणे ! अरे, सध्यांच्या रामराज्याप्रमाणें आमच्या वेळीं दह्यादुधाचा तुटवडा पडला होता काय ? कांहीं शिष्ट गवळणी आम्हांला मागूनहि दूध दहीं देत नव्हत्या, म्हणून त्यांची जिरवण्यासाठीं कुठं थोडी चोरी केली कीं, लागले कोकलायला ' चोरी चोरी ' म्हणून. कांहीं चावट कथाकार तर मीं एका तरुण गवळणीकडे जाऊन भलत्याच दुधाची मागणी केल्याचें कथांमधून सांगतात. काय चावट लोक असतात पहा तर ? हे कथेकरी स्वतःच्या मनांत निर्माण झालेले परंतु सफल न झालेले विचार सरळ माझ्या नांवावर ढकलून मोकळे होतात. चोरीवरून आठवलं; एका विद्वान् आचार्यांचं असं म्हणणं आहे कीं, ' चोरी कशी करावी हें कृष्ण—चरित्रापासून शिकावं ! ' वारे आचार्य ! लाज नाहीं वाटत एखाद्याची बदनामी करायला ? स्वतःला बुद्धिवादी म्हणवून घेऊन नसता चोंबडेपणा करण्याची संवयच असते बऱ्याचजणांना !

गोकुळांतील दंगामस्तीपासून तों अर्जुनाला गीता सांगेपर्यंतच्या माझ्या प्रदीर्घ आयुष्यांत परस्परविरोधी अशा घटना अनंत घडल्या आहेत. त्यामुळें कांहीं विद्वानांनीं माझ्या एकेका स्वभावानुरूप माझें अनेकत्व सिद्ध केलें आहे. म्हणजे गोकुळांतील गाई राखणारा नि गवळणीशीं गंमत करणारा कृष्ण, द्वारकेचा राजा रुक्मिणीपति कृष्ण आणि अर्जुनाला गीता सांगणारा कृष्ण या तीन भिन्न व्यक्ती आहेत. हे तिन्ही कृष्ण एकाच काळांत झाल्यामुळें सगळ्या कर्तबगाऱ्या कोणत्या तरी एका कृष्णाच्या नांवावर जमा झाल्या आहेत असें त्यांचें म्हणणें आहे; तर कांहीं इद्वानांनीं याच्याहि पुढें मजल मारली आहे. मी अर्जुनाचा रथ हांकणारा सारथी होतों आणि रथ हांकणाऱ्या माणसास गीतेसारखा महान् ग्रंथ निर्माण करतां येणें शक्यच नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे; बरें, या विधानाला पुष्टि

कोणती ? तर पुण्याचे टांगेवाले आणि मुंबईचे व्हिक्टोरियावाले. पुण्या-मुंबईच्या या असंख्य 'अश्वपती'पैकीं एकाचेंहि ज्ञान एवढें प्रचंड नाहीं, म्हणून मीहि गीता सांगणें शक्य नाहीं असा कोटिक्रम केला. मी घसा फोडून गीता सांगितली (पाहिजे तर संजयाला विचारा) अन् या महाशयांनीं त्यावर साफ बोळा कीं हो फिरविला ?

दोन निराळ्या गोष्टी दिसल्या कीं विद्वानांना दोन कृष्ण दिसूं लागतात. गोपींचीं वस्त्रें हरण करणारा कृष्णा यादव निराळा आणि द्रौपदीला वस्त्रें पुरवणारा कृष्णा पटवर्धन निराळा, असं कांहीं शहाणीं माणसं सांगूं लागलीं. तरी बरं, लहानपणीं मिशा नसलेला कृष्ण निराळा आणि मोठेपणीं मिशा आलेला कृष्ण निराळा असा शोध लागला नाहीं !

सगळ्यांत जर माझी अधिक बदनामी कोणी केली असेल तर या सिनेमावाल्यांनीं ! अरे काय हें माझें विडंबन ! कधीं मी सुदाम्यासारखा कडक्या दाखविला जातों तर कधीं शेटजीच्या मुलासारखा लडदू दाखविला जातों; कधीं मी अकालींच बाप्या दिसूं लागतों तर कधीं पोट सुटलेल्या शेटजीसारखा गरगरीत दिसूं लागतों. माझ्या जीवनावर आजपर्यंत असंख्य चित्रपट निघाले. सगळ्यांतलं सार काय तर मी सपाटून दहींदूध खाल्लें; गवळणींशीं मजा मारली; राधेला घेऊन आणखी स्पेशल गंमत केली; (सेन्सॉरची कात्री न लागण्याइतपत) कसला तरी आधुनिक संदेश दिला. बस्स ! माझी भूमिका करणारे नटहि ठरून गेले आहेत. त्यांचीं वाढतीं वयं होत असूनहि तशींच दडपून ते काम करतात.

कवी मंडळींनीं तर कहरच केला. सगळ्यांचं सार काय तर मी सारखा चोवीस तास यमुनेच्या कांठीं किंवा कुंजवनांत फ्ल्यूट फुंकीत बसलेला असतों आणि राधा घरचं स्वयंपाकपाणी, धुणींभांडीं, शेणगोठा, शिवणटिपण इत्यादि सगळं सोडून माझ्याजवळ येऊन बसली आहे. आम्हां दोघांनाहि कांहीं धंदे आहेत कीं नाहींत ? शिवाय राधेला सासू आणि नवरा यांची कांहीं भीति नाहींच वाटतं ? कधीं तरी अधून मधून राधा पाणी न्यायला नदीवर आली असतां आणि मी गाई राखीत असतां गांठ पडली आणि चार गप्पा मारल्या कीं लागले सगळेजण प्रेम, प्रेम म्हणून ओरडायला ! आमचं गोकुळ म्हणजे

खेडेगांव, तिथं आम्हां दोघांना चोवीस तास गळ्यांत गळा घालून बसणं कसं शक्य आहे ? भिंतीला डोळे असतात. अन् खेडेगांवांत तर भानगडीच्या बातम्या फार लौकर फुटतात. प्रेम करायला मुंबईसारखीं शहरंच बरीं. गिरगांवच्या प्रेमिकांनीं वरळीच्या चौपाटीवर जावें नि दादरच्या प्रेमिकांनीं मलबार हिलवर जावें; ओळखीचं कुणी भेटण्याची बातच नको.

कांहीं कांहीं कवींनीं काय काय चावटपणा माझ्या नांवावर जमा केला आहे. कांहीं कवी राधेकडून मला सांगतात कीं, ' माझा ढळलेला पदर आतांच ओढूं नकोस. रात्रीं चंद्र उगवला म्हणजे ये. त्यावेळीं सासू, नणंद सगळींजणं झोपलेलीं असतील. ' तर कांहीं कवीनीं मी हिंवाळ्याच्या शुभ्र चांदण्यांत मध्यरात्रीं मुरली वाजवीत बसलों आहें; आणि राधा त्या नादानें धांवत धांवत माझ्याकडे आली. आणि मग आम्ही आधुनिक सिनेमा नायकनायिकेप्रमाणें प्रेमाचें कांहीं तरी बरळलों अशीं वर्णनें करून ठेवलीं आहेत. आतां तुम्हींच बघा, हिंवाळ्यांतल्या मध्यरात्रीं घरीं झोंपायचं सोडून, कुंजवनांत धडपडायला मला थंडीबिंडी कांहीं वाजत नाहीं वाटतं. उगीच वाटेल त्या थापा ठोकण्यांत काय अर्थ आहे ?

गोपींच्या वस्त्रहरणाविषयींहि चावटपणाचं खापर माझ्याच माथी ! सगळ्या गोपी नग्न होऊन यमुनेंत स्नान करीत असतां मी म्हणे सगळ्याजणींचीं लुगडीं घेऊन जवळच्या कदंब वृक्षावर बसलों. लोकहो, आतां तुम्हीच सांगा. आमची गोकुळांतली यमुना नदी म्हणजे काय मोंगल बादशहांच्या राण्यांचा बंदिस्त ' हमामखाना ' होता काय ? आणि अशा ' पब्लिक ' ठिकाणीं दिवसाढवळ्या ' तसल्या ' स्थितींत स्नान करायला त्या ' न्यूडिस्ट क्लब ' च्या सभासद थोड्याच होत्या ? आणि वाह्यातपणा केल्याबद्दल मला त्यांच्या नवऱ्यांकडून चप्पल बिप्पल बसली नसती वाटतं ? जाऊं द्या झालं ! आमचंच नांव बदनाम झालं आहे खरं !

असो ! असंख्य लोकांनीं माझ्यासंबंधीं अपरंपार बरं वाईट लिहून आणि बोलून ठेविलं आहे. जेवढं सांगावं नि खुलासा करावा तेवढा थोडाच आहे. म्हणून मी माझी कैफियत इथंच थांबवितों.

∞ ∞ ∞

पोष्टाची पेटी

तरुणांनो आणि तरुणींनो, व्यापाऱ्यांनो आणि लेखकांनो, तुम्हां सर्वांना मी उपयुक्त अशी आहें. माझ्या विशाल हृदयांत सगळ्या जगाच्या उलाढाली सांठविलेल्या आहेत. माझं पोट म्हणजे विराट् स्वरूपच आहे म्हणा ना ! माझ्या पोटांत नाना प्रकारचीं रहस्यें भरलीं आहेत. प्रेमपत्रें, शोकपत्रें, व्यापारी पत्रें, नॉट्पेड् पत्रें, लेखांचीं बाडें, कवितांचीं भेंडोळीं–एक कीं दोन ? असंख्य भानगडी आहेत.

हें निळ्या रंगाचें पाकीट ! सुधाकर नांवाच्या एका तरुणानें इंदु नांवाच्या आपल्या प्रेयसीला लिहिलें आहे. आठवड्याला कमींत कमी असें एक पत्र तरी पडतेंच. तिच्याकडे प्रेमाची याचना चालली आहे महाशयांची. परंतु इंदु कांहीं अजून दाद देत नाहीं.

याच्या उलट हा प्रकार पाहा. एका स्त्रीनें हें पत्र लिहिलें आहे. अगदीं उघड्या कार्डावर लिहिलें आहे. तिचा प्रियकर तिच्याशीं पावित्र्य पाप (यालाच वदतो व्याघात कीं कायसं साहित्यिक म्हणतात) करून तिच्यावर एका जीवाचा भार टाकून नामानिराळा झाला होता. त्याला ती लग्न करण्यासंबंधीं आर्जवून आर्जवून पत्र लिहित आहे. परंतु त्या गृहस्थानें ' सवत्स ' पत्नी स्वीकारणें सामाजिक अब्रूच्या दृष्टीनें ठीक नाहीं असें तिला पत्रानें स्पष्ट सांगितलें आणि अनाथ महिलाश्रमांत जाण्याचा अनाहूत सल्लासुद्धां दिला. अनाथाश्रम म्हणजे लफडेबाजांची सोय असं म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं.

हा एका बेकार तरुणाचा अर्ज. सरासरी आठवड्याला तीन याप्रमाणें याचे अर्ज माझ्या पोटांत येऊन पडतात. पाकीट आंत टाकल्यावर हा तरुण मला हात जोडून भक्तिभावानें नमस्कार करतो. जसं कांहीं मीच ऑफिसर आहें किंवा नवसाला पावणारा देव आहें. बाकी माझ्या तांबड्या रंगावरून मी कुठला तरी ' शेंदरी देव ' आहें असं वाटणं स्वाभाविक आहे.

आतां हें बंद पाकीट पाहा. मुंबईत नोकरी करणाऱ्या एका मनुष्याचें आहे हें. हा गृहस्थ गांवीं आपल्या घरीं दरमहा वीस रुपये पाठवीत असतो. मनिऑर्डरनें नव्हे तर पत्राच्या पाकिटांतून ! म्हणजे दोन आण्यांत पत्रहि गेलें नि मनिऑर्डरहि गेली.

बाकी दोन आण्यांच्या पाकिटावर वीस रुपयांची जोखीम सोपविणाऱ्या या गृहस्थाचा पोस्ट खात्याच्या कार्यक्षमतेवरील विश्वास जबरदस्त आहे यांत शंका नाहीं.

हें जाडजूड बाड ! ओळखलं कसलं आहे तें ? एका उदयोन्मुख लेखकाच्या लघुकथेचं चऱ्हाट आहे. 'तो तिला भेटतो' पद्धतीची ठराविक सांच्याची गोष्ट आहे. वरच्या बाजूस तो 'प्रेस–मॅटर' (म्हणून) 'बुकपोस्ट' असं लिहितो आणि प्रत्येक खेपेला आंतमध्यें संपादकास पत्र लिहून कसंहि करून गोष्ट छापाच अशी विनंति करून (लाक्षणिक) हातापायां पडतो. एकदां तर त्यानें अशाच लेखाबरोबर घुसडून दिलेल्या पत्रांत संपादकास असें लिहिलें होतें कीं, 'लेख 'तसाच' छापावयाचा नसल्यास निदान जाहिरातीच्या दरानें का होईना छापा आणि बिल माझ्या नांवावर गुपचूप पाठवा.' नांव छाप्यांत देण्याचा कोण हा सोस ! हा गृहस्थ प्रत्येक बुकपोस्टानें पाठविलेल्या लेखाबरोबर संपादकास पत्र ठेवीत असतो. परंतु आपण अथवा संपादक सांपडले जाऊं असें त्याला मुळींच वाटत नाहीं. पोस्टखातें बुकपोस्ट उघडून बघण्याचा उपदव्याप करीत नाहीं असा त्याला जबरदस्त विश्वास आहे आणि त्याचा आजवरचा अनुभवहि आहे म्हणे !

आतां हे कवितेचे कपटे आणि चिटोरे पाहा. गिरणींतील साच्यावरच्या घोटा इकडून तिकडे आणि तिकडून इकडे सारखा जात असतो,त्याच्या वेगानें कवितांची आवक जावक, कवीचें घर आणि संपादकाचें कार्यालय यांच्या दरम्यान होत असते. कवीची कविता प्रसिद्धीसाठीं म्हणून संपादकाकडे गेली रे गेली कीं तिसऱ्या दिवशीं 'बुमरँग' सोड्याप्रमाणें कवीच्या हातीं दत्त म्हणून हजर ! अर्थात् या अल्प काळांतसुद्धां कवितांचा जास्तींत जास्त मुक्काम माझ्याकडेच असतो.

हीं पाहा व्यापारीं पत्रें ! हीं पत्रें मात्र धूर्तपणानें लिहिलेलीं असतात. कुठें कांहीं ' खुट्ट ' झालं कीं, यांच्या बाजारभावांत चढउतार झालाच म्हणून समजा. नियंत्रण उठणार म्हटलं कीं काय करायचं; नियंत्रण येणार म्हटलं कीं पवित्रा कसा बदलायचा या संबंधींच्या अनेक भानगडींचीं पत्रें माझ्या पोटांत येऊन पडतात. त्यांची खुलासेवार माहिती मी आपणांस सांगत नाहीं, ती तुम्ही कल्पनेनें समजून घ्या. मी तें सांगितलें तर माझ्यावर व्यापारी गौप्य फोडल्याचा आरोप येईल. अगोदरच साधीं पत्रें गहाळ होतात अशी नेहमीं आरडाओरड चालू असते. त्यांत आणखी ही बातमी फोडण्याची भर नको. कारण

आजकाल काळा बाजार अथवा तदनुषंगिक भानगडी करणें हा गुन्हा नसून या गोष्टी चव्हाट्यावर मांडणें हा गुन्हा होऊं पाहात आहे.

हा आणखी एक पत्रांचा कळप पाहा. 'अमुक तमुक रस्त्यावरील अमुक तमुक बिल्डिंगमधील दुसऱ्या मजल्यावरील चौथ्या ब्लॉकमधील नंबर तीनच्या संडासाच्या टांकीची सांखळी तुटली आहे, याकडे घरमालक आणि विशेषतः म्युनिसीपालिटीचे योग्य अधिकारी लक्ष देतील काय?' यापासून तों थेट 'अँग्लो-अमेरिकन युति होऊन रशियाविरुद्ध युद्ध पुकारलें गेल्यास भारताच्या आध्यात्मिक बलानें नि तेजानें हैड्रोजन बाँबच्या कशा ठिकऱ्या उडतील?' अशा विश्वव्यापी प्रश्नावर सारख्याच सफाईदारपणें लेखणी चालवणाऱ्या 'पत्रलेखक' बहादूरांचा हा पत्रांचा गट्टा आहे. प्रत्येक वर्तमानपत्रानें या मंडळीसाठीं एक 'चौक' राखून ठेवलेला असतो. लेख किंवा कविता यांप्रमाणें हीं पत्रें साभार परत येण्याची भीति नसते. कारण यांत साहित्यिक गुणांची आवश्यकता नसते. त्यामुळें नांव छाप्यांत यायला हा सोपा उपाय आहे.

हीं कॉलेज विद्यार्थ्यांचीं पत्रें. नमुन्यासाठीं दोन पत्रें पहा. एक पत्र खारला राहाणाऱ्या प्रेयसीला लिहिलें आहे आणि दुसरें सोलापूरला राहाणाऱ्या आपल्या तीर्थरूपांना. वडिलांच्या पत्रांत त्यानें लिहिलें आहे कीं, 'मी गेले पंधरा दिवस आजारी होतों. औषध, नर्सिंग, फळफळावळ, इंजेक्शन्स, डॉक्टरांची फी इत्यादि मिळून ऐशीं रुपये बिल झालें आहे. शिवाय डॉक्टरांनीं एक टॉनिक सांगितलें आहे त्याचे वीस रुपये; असे एकंदर शंभर रुपये ताबडतोब पाठवून द्यावे'. उलट प्रेयसीच्या पत्रांत लिहिलें आहे कीं, 'सुम्या, परवां शहाडे–आठवल्याकडे पाहिलेलं तें झिरझिरीत निळ्या रंगाचं ९५ रुपयांचें पातळ मी तुला तीन चार दिवसांत नक्की घेऊन देतों बघ. शॉच्या एकेका शब्दाला संपादक एकेक शिलिंग द्यायचे म्हणे. परंतु सुमन नव्हे सुम्या, तुझ्या एकेका 'निःशब्द' अशा चुंबनासाठीं एकेक पातळ द्यायला मी तयार आहें!'

आहे कीं नाहीं गंमत? माझ्या पोटांत आणखी कितीतरी गंमती नि भानगडी भरल्या आहेत. परंतु सगळींच कुलंगडीं चव्हाट्यावर मांडूं नयेत. कांहींतरी झांकली मूठ ठेवावी म्हणून मी माझी कैफियत थांबवितें.

∞ ∞ ∞

कवीचा खिसा

'जें न देखे रवि, तें देखे कवि' अशी कवीच्या दिव्य आणि भव्य दृष्टीची व्याख्या कुठल्याशा कवीनें करून ठेवली आहे. अशा मोठ्या व्यक्तीच्या कपड्याचा खिसा होण्याचें सुभाग्य म्हणा वा दुर्भाग्य म्हणा मला लाभलं आहे. कवीचा खिसा म्हणजे अजब चीज आहे, नव्हे अजब चिजांचें गोडाउनच आहे. माझ्यापाशीं काय काय आहे हें पाहण्यापेक्षां काय काय नाहीं हें पाहणेंच अधिक सोपें होईल. इतक्या भानगडी माझ्या पोटांत दाटीवाटीनें बसल्या आहेत.

ही पाहा टोंकदार पेन्सिल! पेन्सिल? नव्हे लोकांना घायाळ करणारा भाला आहे भाला! ही पेन्सिल नसती तर कवीनें काव्य कसें केलें असतें? काव्य नसतें झालें म्हणजे लोकांनीं घायाळ होण्याचा प्रश्नच नव्हता. परंतु पुढील सारी अनर्थपरंपरा या पेन्सिलींतून निर्माण झाली आहे. बरं पेन्सिल एक तरी आहे? चांगल्या आवळ्या-जावळ्या दोन आहेत!

हे डोक्यांत घालायचे आंकडे पाहा. चांगले अर्धा डझन आहेत. हा कच-कड्याचा आंकडा आहे ना तो कवीला बी. बी. दादरला असलेल्या मुलींच्या शाळेजवळ सांपडला आहे. हे दोन लोखंडी तारेचे आंकडे भाजीमार्केटच्या आसपास सांपडले आहेत. आणि हे दोन आंकडे तर कवीनें खुद्द आपल्या बायकोचेच आपल्याजवळ ठेवले आहेत. प्रत्येक आंकडा मिळाला कीं एकेक कविता तो प्रसवला. एका आंकड्याला आणि तो धारण करणाऱ्या मुलीला उद्देशून कवीनें, 'इतुका जर का छान आंकडा (कवींना सगळं कांहीं छानच दिसतं) गोड किती तव सजणे मुखडा' असा सवाल केला आहे. तर दुसऱ्या आंकड्यास साक्षी ठेवून त्यानें, 'सखे सुंदरी, तुझ्या ग शिरीं, अकलेहुनि आंकडेच भारी.' इत्यादि शिळ्या कोट्यांचें काव्यहि केलें आहे.

तिकडे स्त्रिया आंकडे हरवले म्हणून हळहळतात तर इकडे कवि आंकडे सांपडले असूनहि हळहळत असतो. व्यवहारी जगांत एकाची वस्तु हरवून ती दुसऱ्यास सांपडल्यास दुसऱ्यास आनंद होतो; परंतु कवि लेकाचे दळभद्रेच! त्यांना व्यवहार कळतोय् कुठं? फुकटांत सांपडलेल्या आंकड्यावर पदरची

कागदशाई नासून कविता करण्याचा आंतरवट्ट्याचा अव्यवहारीपणा ते नेहमीं चालवितात.

कवीनें कविता केल्या तर त्यांत माझं कांहींच विघडत नाहीं; परंतु तें भयंकर ओझं मला सतत सांभाळावें लागतें म्हणूनच तोंड उघडायची पाळी येते.

आतां हा हातरुमाल पाहा. रेशमी असून स्पर्शसुखद नि सुळसुळीत आहे. आकार ४'' × ४'' आहे. हा रुमाल कवीला हिंदु कॉलनीच्या दुसऱ्या गल्लींत सांपडला आहे. (कुणाचा खरोखर हरवला असल्यास लेखकाकडे चौकशी करूं नये. लेखकांजवळ स्वतःच्या हातरुमालावांचून दुसऱ्या कोंणाचे रुमाल नाहींत) रुमालाच्या आकारावरून नक्कीच तो पोरीचा आहे. कवि रस्त्यांतल्या वस्तू उचलतो; परंतु पुरुषी वस्तू तो सहसा उचलीत नाहीं. त्याच्या कोमल मनोवृत्तीला पुरुषी राकट वस्तू पेलत नाहींत. रुमाल सांपडल्यावर कवीची प्रतिभा लगेच फुरफुरूं लागली. पोरी रुमाल कुठं ठेवतात तें कवीला माहीत होतेंच. कारण कवीची दृष्टि सूक्ष्म असते. त्यानें काव्य केलें—

' इवल्याशा रुमालाची, केली इवलिशी घडी ।
ठेवियेली उरोजाशीं, श्वासानें वर खालिं हो ॥
रुमालाचें अहा भाग्य, जागा 'दुर्लभ' त्या मिळे ।
अरेरे ! दैव फिरुनीयां, पडला पदपथावरी ! ॥ '

ही शेपट्याची रिबन दादरच्या चौपाटीवर सांपडली आहे. लगेच काव्य तयार !

' वेणीमध्यें रिब्बन गुंफुन
केशबंधनीं पुरी गुंतली
प्रेमबंधनीं तसा तुझ्या मी
सखे गुंतलों, रिब्बन झालों ! '

हा बघा फुटक्या बांगडीचा तुकडा. सेक्रेटरीएटमध्यें कामाला जाणाऱ्या एका युवतीची बांगडी, ऑफीसला जाण्याच्या घाईंत दादरला (जी. आय्. पी.) गाडींत शिरत असतांना दारावर आपटून वाढवली. कविमहाशयानें

तेवढ्यांत त्या गर्दीतून एक तुकडा तरी मिळवलाच. घरीं आल्यावर काव्य-प्रसूति झाली.

'तुझी बांगडी फुटली!
अन् धक्का हृदयासि माझिया कां ग!'

जसं कांहीं हा कवीच त्या युवतीचा नवरा आणि त्याच्या आयुष्याचें भवितव्य जणूं कांहीं हिच्या बांगडीवरच अवलंबून होतें.

अरेच्या! ही सुकलेली वेणी राहिलीच कीं! कविमहाशय शिवाजीपार्क-जवळील एका बंगल्याजवळून सुप्रभातीं जात असतां क० ध० संयोगानें पहिल्या मजल्यावरील कोणा एका सुमारें सतरा वर्षांच्या मुलीनें, आदल्या दिवशींची निर्माल्य वेणी खालीं न बघतां टाकली आणि ती नेमकी कवीच्या डोक्यावर येऊन पडली. त्यावेळीं स्वर्गीतल्या तेहतीस कोटी देवांनीं जणूं एकत्र जमून आपल्यावर पुष्पवृष्टि केली असा त्याला आनंद झाला. ती सुकलेली वेणी पाहून तो काव्य ओकूं लागला—

'वेणी सुकली? नव्हे! ती तर ताजी!
जीवन माझें होतें सुकलें
वेणीनें या पुलकित केलें॥'

मित्रहो, कवीनें माझ्या पोटांत वरील प्रकारचीं अगणित काव्यें भरून ठेवलीं आहेत. या भेंडोळ्यांनीं मी अगदीं कसा तट्ट फुगून गेलों आहें. वरील काव्याशिवाय, 'ढळलेला पदर पाहून,' 'शेपटा कीं प्रेमरज्जू?' 'चप्पल नव्हे मी!' 'गळ्यांतली एकदाणी पाहून,' 'गोल साडी गोड बाई' इत्यादि प्रासंगिक कवितांचें बाडहि टिच्चून भरलें आहे माझ्या पोटांत! अगदीं कंठापर्यंत काव्यच काव्य भरलें आहे. या काव्य-डबक्यांत (काव्य-समुद्रांत म्हणत नाहीं. उगीच समुद्राच्या मोठेपणाची बदनामी कशाला करा?) माझा जीव कसा अगदीं कासावीस होत आहे; आणि आतां तर माझ्या कंठांतून शब्दहि फुटत नाहीं, म्हणून मी माझी कैफियत इथेंच थांबवतों.

∞ ∞ ∞

अनुक्रम २-९९
विभाग
क्रमांक १६१
दि. १-

म्युनिसिपालिटीचा कंदील

ब्रिटीश सरकारनें, नेटिव्हांना राज्यकारभार करण्याची अक्कल नाहीं म्हणून आस्ते आस्ते कांहीं प्रमाणांत स्वराज्य देण्याची जी शक्कल काढली होती त्यापैकीं म्युनिसिपालिटीचा कारभार ही पहिली पायरी होती. म्युनिसिपालिटीच्या कामाचा दिवा आणि माझा जन्म साधारणपणें एकाच वेळीं झाला; आणि विसाव्या शतकाच्या मध्यावरसुद्धां मी आहें तसाच आहें. कांहीं वात्रट लोक म्हणतात कीं, 'म्युनिसिपालिटी जनतेसाठीं कामाचे काय दिवे लावते यांचें प्रतीक म्हणजे म्युनिसिपालिटीचा दिवा!' अर्थात् म्युनिसिपालिटीची कार्यक्षमता आणि माझा अंधुक प्रकाश यावर ही टीका आहे हें निराळें सांगायला नको. एखाद्या खडतर तपश्चर्या करणाऱ्या योग्याप्रमाणें मी अहोरात्र ऊन, वारा, पाऊस इत्यादि आपत्ति सहन करून अविचलपणें उभा आहें.

माझी दररोज दोन वेळां नियमितपणें गांठ घेणारा मनुष्य म्हणजे म्युनिसिपालीटीचा नोकर. सकाळीं हा माझी साफसफाई करून माझ्या पोटापाण्याची व्यवस्था करून जातो. तो दररोज पंचांगांत चंद्रोदय आणि चंद्रास्त किती वाजतां आहे हें पाहून येत असावा. कारण शुक्लपक्षांत चंद्राची कला जसजशी दररोज वाढत जाते तसतसें माझ्या पोटांत रॉकेल कमी कमी घातलें जातें. मात्र कृष्णपक्षांत हा क्रम उलटा होतो. चंद्राची पौर्णिमा ती माझी अमावास्या आणि त्याची अमावास्या ती माझी पौर्णिमा असते.

हा आला नोकर तेल घालायला. या गृहस्थानें नोकरीस लागल्यापासून एका पैशाचेंही तेल विकत घेतलें नाहीं. माझ्या आणि माझ्या इतर बांधवांच्या तेलांतून थोडीथोडी कपात करून तो आपल्या घरच्या दिवाबत्तीचा खर्च वांचवितो. जाऊं दे. जगांत या गोष्टी चालायच्याच. माझी एका खांबावर प्रतिष्ठापना केली आहे. माझ्या खालचा भाग इतका रुंद आहे कीं,' दिव्याखालीं अंधार ' ही म्हण माझ्या बाबतींत अतिशय विस्तृत प्रमाणांत खरी ठरते. दिव्याचा उजेड जवळच्या जेवढ्या भागांत जास्त पडणें शक्य असतें तेवढ्या भागांत माझ्याखालीं संपूर्ण अंधार असतो आणि त्या पलीकडील भागांत माझी मजल

जात नसल्यामुळें पुढील भागांतहि जवळ जवळ अंधारच असतो. म्हणजे एकंदरींत माझ्याकडून उजेडापेक्षां अंधार निर्माण करण्याचेंच कार्य होत असतें. नगरपिते माझ्यांत कधीं सुधारणा करणार आहेत हें देव जाणे ! (बाकी आधीं नगरपित्यांतच सुधारणा होणें आवश्यक आहे !)

पुष्कळ चोरांना, ' चोराच्या मनांत चांदणं ' या म्हणीपेक्षां, ' चोराच्या मनांत म्युनिसिपालिटीचा कंदील ' ही म्हण आवडते—नव्हे उपयुक्त वाटते. गस्तवाला ओरडूं लागला म्हणजे चोर माझ्याखालच्या अंधारांत निर्धास्तपणें लपून बसतात. अेरेरे ! ' कंदील ' आणि ' कंदिलाचा प्रकाश ' या दोन शब्दांची कोण ही बदनामी ! जाऊं द्या झालं ! आमच्या नशीबीं जास्त उजेड नाहीं हेंच खरं !

ही कुत्र्याची पीडा आली. यांचा त्रास मला फार होतो. कुत्र्यांची जात फडतूस; परंतु लघुशंका करायला मात्र नेहमीं उच्च स्थान लागतें. त्यामुळें खेडेगांवांतील ग्रामदेवतेला एखाद्या वेळीं तिच्या भक्ताकडून स्नान घातलें जायचें नाहीं परंतु या कुत्र्यांकडून माझी तिन्ही त्रिकाळ ' पाद्यपूजा ' यथाशक्ति होत असते.

आतां या मुलाकडे पाहा. माझ्या शेजारीं असलेल्या भिंतीवर बसून (कारण खालीं अंधार असतो.) हा मुलगा माझ्या उजेडांत (?) अभ्यास करीत असतो. त्याला भावी आयुष्यांत मोठें व्हायचें आहे म्हणून तो मोठेपणाची पूर्वतयारी म्हणून माझ्या उजेडांत बसून अभ्यास करीत आहे. लहान आहे बिचारा ! जगाचे छक्केपंजे माहीत झाले नाहींत त्याला अजून. ज्या वेळीं म्युनिसिपालिटी नव्हती त्या वेळीं ज्यांचें बाळपण गेलें आणि नतर मग मोठे झालेले लोकसुद्धां आपण लहानपणीं म्युनिसिपालिटीच्या दिव्यावर अभ्यास करून दिवस काढल्याची चविष्ट थाप मारतात. गेली ती पिढी ! म्युनिसिपालिटीच्या दिव्यावर अभ्यास करून मोठं होतां येतं ही शुद्ध थाप आहे. परंतु हा समज माणसांत चांगलाच मूळ धरून बसला आहे हें खरं. असो. त्यामुळं कां होईना मला थोडासा मोठेपणा मिळतो. म्हणून मी या थापेच्या प्रवर्तकाचे मनापासून आभार मानतों. मोठें होण्यासाठीं इतर लफडीं

नि भानगडी कराव्या लागतात हें या मुलाला वयानें मोठा झाल्यावर आपोआप कळून येईल.

कांहीं उडाणटप्पू पोरांकडून मला फार त्रास होतो. ते दगड मारून माझें घर छिन्नविच्छिन्न करतात. मी गप्प बसतों. कारण 'स्वतः कांचेच्या घरांत राहाणाऱ्यानें दुसऱ्यावर सहसा हल्ला करूं नये' हा उपदश मला अक्षरशः पाळावा लागतो. मुलांनीं दगड मारून माझें घर फोडलें म्हणजे वाऱ्याचें फावतें आणि मग मी अकालीं नाहींसा होतों. दुसऱ्या दिवशीं अर्थातच तेलवाल्याची चंगळ होते. माझ्यांतलें उरलेलें तेल तो घरीं पळवतो. इथें आणखी एक गुप्त गोष्ट हळूच सांगतों—या तेलांत या वार्डाच्या नगरपित्याचासुद्धां वांटा आहे म्हणे ! खरं खोटं मला माहीत नाहीं हं ! नाहीं तर मोठ्याचं नांव भलत्या ठिकाणीं गुंतवल्याचा ठपका माझ्यावर यायचा.

कुठल्या तरी हलक्या वर्गातली एक बाई आणि तिचा नवरा दोघेहि माझ्याखालच्या अंधाराच्या आसऱ्यानें बोलत असतात. बायको सारखी रुसून बाहेर पडते आणि नवरा तिची समजूत घालण्यासाठीं तिच्या पाठोपाठ बाहेर पडतो; आणि माझ्याखालची निवांत जागा पाहून त्यांचीं बोलणीं सुरू होतात. बिचाऱ्या त्या नवऱ्याची मला कींव येते.

मी मुंबईसारख्या मोठ्या शहरांतला दिवा नाहीं, एका सर्वसाधारण शहरांतला दिवा आहें. अद्याप लहान मुलांनीं सडकेवरच बहिर्दिशेला बसणें योग्य आहे असें त्यांच्या पालकांना वाटतें आणि कां कुणास ठाऊक पण सगळीं कार्टीं माझ्या शेजारींच येऊन बसतात. त्यामुळें मला मात्र दिवसभर कुत्र्यांची आणि या पोरट्यांची घाण सहन करावी लागते.

शिमग्याच्या हंगामांत उत्साही होळकर मंडळी माझ्या आधारभूत खांबाचें पुण्यकार्यासाठीं उच्चाटन करून माझीहि उचलबांगडी करतात.

बरंय् मंडळी, थांबतों मी आतां. हा तेलवाला तेल घालण्याच्या निमित्तानें माझ्यांतलें तेल न्यायला आला आहे ! करूं दे त्याला त्याचें दैनिक काम !

∞ ∞ ∞

वर्तमानपत्र

एका हातांत चहाचा कप आणि दुसऱ्या हातांत मी असल्यावांचून सुशीक्षितांना करमतच नाहीं. जुनें लोक ज्या कर्मठपणानें आणि नियमितपणानें पोथी वाचीत असत तितक्याच नियमितपणें आणि निष्ठेनें हल्लींचे लोक माझें वाचन करतात. माझ्या वाचकांचे वर्ग बरेच आहेत. अगदीं 'र ट फ' करीत वाचणाऱ्यांपासून तों थेट, 'वर्तमानपत्रें वाचूं नयेत, निष्कारण वेळ मोडतो.' असें म्हणणाऱ्या विद्वानांपर्यंत मी सर्वांना पाहिजे असतों.

मुंबईत तर सूर्योदय होतो न होतो तोंच लोकांना मी पाहिजे असतों. मी पाहिजे असण्याचीं प्रत्येकाचीं कारणें निराळीं आहेत.

चला तुम्ही माझ्याबरोबर दादरला एका मोठ्या चाळींत. या चाळींत व्यापारी, धंदेवाले, फेरीवाले, साधारण प्राप्ति असलेले प्राध्यापक, 'सर्टिफिकेटवाले' (स्वतःजवळ सर्टिफिकेट असणारे परंतु प्रॅक्टीस चालत नसल्यामुळें पैसे घेऊन मेडिकल सर्टिफिकेट देणारे) डॉक्टर्स, वकील, कारकून, शिक्षक, विमा-एजंट, बेकार, उडाणटप्पू इत्यादि सर्व दर्जाचे लोक या चाळींत भरले आहेत. प्रत्येकाचीं राजकीय मतेंही भिन्न आहेत.

हे पहा दोन कारकून गॅलरींत बसून माझें पारायण करीत आहेत. एक कारकून पृष्ठ १ आणि ६ असलेली माझी बाजू वाचीत आहे आणि दुसरा पृष्ठ २ आणि ५ असलेली बाजू वाचीत आहे. माझें तिसरें–चौथें पान पलीकडल्या कारकुनानें पळविलें आहे. साधारणपणें अर्ध्या तासांत ते दोघेही 'छा. छा. पर्यंत (छापखान्यांत छापलें) येऊन पोहोंचतात. मग ते माझी घडी करून चर्चा सुरू करतात. माझें वाचन झाल्यानंतर कुठल्याहि कारकूनवर्गात चालणारी चर्चा मोठी मनोरंजक असते. 'नेहरू मूर्ख आहेत; राज्यकारभाराची बोंबाबोंब ही अशीच चालणार; रशिया बोकांडी बसला म्हणजे कळेल; सोशॅलिस्टांची वायफळ बडबडच बघून घ्यावी; हिंदुसभेंत काम करणारीं धडाडीचीं माणसंच कुठं आहेत; हैड्रोजन बाँब पडल्यावर संघवाले त्याला लाठ्यांनीं अडवणार काय? मुसलमानांची जात हलकट ती हलकट; जेधे–मोरे लेकाचे ब्राह्मणांचे पक्के दुष्मन आहेत; विजयालक्ष्मीच्या डझनावारी रेशमी साड्या

धूळ खात पडल्या आहेत आणि आमच्या 'हिला' आम्हांला दोन लुगडीं घ्यायला जमत नाहीं. मारा मजा लेको हो सरकारच्या पैशावर ! गाडगीळांच्या अग्रलेखाला दुरुस्त्याच भारी; पाध्यांच्या अग्रलेखांत काव्याचा पसाराच फार; नवऱ्यांचे अग्रलेख अगदींच आळणी असतात तर केसरीच्या अग्रलेखांतील संस्कृत श्लोकांच्या जंजाळांतून मराठी शब्द चाळून घ्यावे लागतात !' इत्यादि इत्यादि नानाप्रकारचे शेरे कारकून मंडळी फडाफड मारतात; राजकारणाचा काथ्याकूट करतात आणि ऑफिसची वेळ झाली कीं राजकारण गुंडाळून ठेवून सेवाधर्म करायला निघून जातात.

हा शिक्षक आहे ना तो नेहमीं प्रथम दोंदे, सार्जंट, घाटे, परुळेकर हीं नांवें आहेत काय हें पहातो. 'शिकवण्या पाहिजेत' च्या जाहिराती बघतो. तो माझें जवळ जवळ सगळें वाचन करतो आणि शेवटीं, 'हल्लीं शुद्धलेखन फार बिघडत चाललें आहे' असा शेरा मारतो. 'रामभाऊ सीताकाकूंच्या माडीवर बसले होते' हें वाक्य 'रामभाऊ सीताकाकूंच्या मांडीवर बसले होते, असें छापलें जातें; 'माजी मंत्री' हे शब्द 'पाजी मंत्री' असे छापले जातात; आणि एकदां तर 'वैश्यांनीं आपला व्यवहार रोखीनें करावा' हें वाक्य वेश्यांनी आपला व्यवहार रोखीनें करावा' असें चक्क छापून आल्याचें आपण वाचलें आहे, असें या शिक्षकांचें म्हणणें आहे. शिक्षकमहाशय दररोज अग्रलेखही घोकून ठेवतात; आणि त्याच्या जोरावर शाळेंत राजकीय ज्ञान प्रकट करतात. त्याप्रमाणें 'सा शक्तिर्या विमुक्तये,' 'मामनुस्मर युध्य च', 'अर्थज्ञान–क्रियासिद्धौ लोकसत्ता प्रतिष्ठिता', 'सत्य दिसेल तें बोलणार आणि न्याय्य दिसेल तें करणार,' 'न मे भक्तः प्रणश्यति,' इत्यादि अग्रलेखांच्या टाळक्यावरील संपादकीय धोरणाच्या बिरुदावल्याहि त्यानें घोकून ठेवल्या आहेत, आणि शाळेंत मुलांना सांगितल्या आहेत.

आतां या तरुणाकडे पहा. लग्न व्हायचंय् अजून. 'अश्लीलतेच्या तावडींतून मुंबई हायकोर्टातून सहीसलामत निर्दोष' म्हणून सुटलेल्या 'अनंगरंग रतिशास्त्र' या पुस्तकाची मुद्दाम वेड्यावांकड्या अक्षरांत छापलेली जाहिरात पाहून त्याची दृष्टि तिथंच स्थिरावते. ट. ख. सहित सहा रुपये दहा आणे पाठवून तें पुस्तक मागवावें अशी त्याची जबरदस्त इच्छा आहे. परंतु

मागवावें कुठल्या पत्त्यावर ? इथं तो राहातो दुसऱ्यांच्याकडे. त्यांना हें कळलें तर ? ऑफिसच्या पत्त्यावर मागवलें तर तिकडेही बोंब होणार. केवळ सोयीस्कर पत्ता मिळत नाहीं म्हणून विचाऱ्याची कुचंबणा होत आहे. शेवटीं नुसती 'ती' जाहिरात वाचूनच तो आपली दुधाची तहान ताकावर भागवीत आहे.

या दोन बायका बघा हं ! राजकीय बातम्या, आंतरराष्ट्रीय घडामोडी, अग्रलेख, इतर लेख इत्यादि सर्व भानगडींवरून उड्या मारून त्या 'सेल' च्या जाहिरातीवर दृष्टि स्थिरावतात, आणि संध्याकाळीं नवरे घरीं आल्यावर त्यांच्या-मागें 'सेल' मधील स्वस्त (!) वस्तु विकत घेण्याचें तुमणें लावतात.

माझी एक चतुर्थांश जागा सिनेमाच्या जाहिरातींनीं व्यापली जाते. त्यांच्या जीवावरच मी अवघ्या एका आण्यांत तुमच्या भेटीस येतों. या ओळीनें पांचसहा खोल्या आहेत ना, इथल्या सगळ्या बायका सिनेमाच्या जाहिराती तोंडपाठ करतात आणि नवरे ऑफिसांत गेले कीं पटापट दुपारचा 'मॅटिनी' पाहून पुन्हां संध्याकाळीं पतिराजांचें स्वागत करण्यासाठीं, आर्यपत्नीप्रमाणें अदबीनें दारांत उभ्या राहातात.

माझा खप हॉटेलांत पुष्कळ होतो. परंतु सकाळीं एक दोन तासांतच माझीं गात्रें शिथिल होतात आणि दुपारपर्यंत माझ्या शरिराची चिरफाड होऊन माझ्यामध्यें भजीं, शेव, गांठ्या बांधल्या जातात. बिचारे संपादक आणि उपसंपादक रात्रीचा दिवस करून, पांढऱ्यावर काळं करून मला जन्म देतात आणि माझी लगेच रद्दींत रवानगी होते ! शिव शिव ! कोण हें दुर्दैव !

एखादे वेळीं भजीं बांधायला माझा उपयोग झाला असता तरीही चाललें असतें; परंतु सुप्रभातीं ब्रह्ममुहुर्तावर प्रत्येक माउली आपल्या युवराजाच्या 'त्या' विधीसाठीं जेव्हां माझा उपयोग करते तेव्हां मला अक्षरशः नरकवास भोगावा लागतो. हूं ! करतां काय ? भोग कुणाला सुटला आहे ?

असो ! तुम्हांला शेअर–बाजार, बाजारभाव, सरकारी नोटिसा, रेल्वेचीं टेंडरें, वकीलाच्या नोटिसी, कोर्टाच्या दरखास्ती इत्यादि रुक्ष भानगडी सांगितल्या तर आवडणार नाहींत. म्हणून मी माझी कैफियत इथंच थांबवतों.

∞ ∞ ∞

पाऊस

'काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी' या वैदिक मंत्रापासून तों जुन्या तिसरीच्या पुस्तकांतील 'नेमेचि येतो बघ पावसाळा, हें सृष्टिचें कौतुक जाण बाळा' या कवितेपर्यंत किंवा 'ये रे ये रे पावसा, तुला देतों पैसा' या बालगीतापर्यंत माझें सर्वत्र कौतुक होत असतें. वेदशाळेंतील गुरुजींपासून वेधशाळेंतील शास्त्रज्ञांपर्यंत प्रत्येकजण आपल्या अकलेच्या कुवतीप्रमाणें माझ्या आगमनाविषयींचें भविष्य वर्तवीत असतो. नंदीबैल तर माझ्या आगमनाचें भविष्य नेहमीं होकारार्थीच वर्तवीत असतो. वर्षाऋतूच्या सुमारास बरेच ज्योतिषी आणि वेधशाळेंतील तज्ज्ञ, एखाद्या गंजडी साधूनें गांजाच्या कैफेंत तोंडाला येईल तो आंकडा सांगावा त्याप्रमाणें माझ्या आगमनाच्या चार दोन तारखा ठोकून देतात. परंतु 'ते आंकडे' जसे फेल्यूअर जातात त्याप्रमाणेंच या तारखाहि बाद ठरतात.'तज्ज्ञांचा अंदाज म्हणजे शास्त्रोक्त पद्धतीनें केलेल्या चुका' अशी तज्ज्ञांच्या ज्ञानाची व्याख्या आहे. (पहाः—वि. आ. बुवाकृत 'व्यावहारिक शब्दकोश') माझ्या बाबतींत तरी ही व्याख्या खरी ठरते. बहुतेक वेळां माझ्या बाबतींतील या लोकांचा अंदाज चक्क उलटा ठरतो. वेधशाळेनें, 'आज जोरदार वृष्टि होणार' म्हणून भविष्य वर्तविलें कीं पुरुष झकास सूट घालून आणि बायका मस्त पातळें नेसून किंग्ज सर्कलकडे फिरायला जातात आणि सुंदर चंद्रप्रकाशांत घरीं परत येतात.

मी प्रत्येकाला पाहिजे त्याचीं कारणें निराळीं आहेत. शेतकऱ्यांना मी पाहिजे तो धान्य पेरायला म्हणून; शहरांतील लोकांना मी पाहिजे असतों हवेंतील उकाडा कमी व्हावा म्हणून, माझ्या वर्षावांत भिजायला गंमत वाटते म्हणून मी मुलांना पाहिजे असतों; तरुण मुलींनाहि मी पाहिजे असतों; त्यांनासुद्धां माझ्या पाण्यानं भिजणं आवडतं, परंतु भिजल्यावर लाज वाटते म्हणून त्या तसं कबूल करीत नाहींत. तें निळं किंवा (विशेषतः) पांढरं पातळ नि त्याला मॅच् होणाऱ्या रंगाचा वायलचा झिरझिरीत ब्लाउज माझ्या पाण्यानें भिजून चिंब झाला म्हणजे एखाद्या पिलानें आईला बिलगून बसावें त्याप्रमाणें तो त्या गोऱ्या गोऱ्या अंगाला चिकटून बसतो. मुली भिजल्यानंतरच मस्त दिसतात म्हणे! मला तरी हें माहीत असायला कारण काय तर मृच्छकटिकांतील वसंतसेनेचा

आज कित्येक वर्षे या एकाच कारणानें तुम्हां मानवप्राण्यांत उदो उदो होत आहे. ठाकूरांची ' ओलेती ' सुद्धां ओलेपणामुळेंच गाजली.

माझं पहिलं आगमन झालं. तज्ज्ञांनीं सांगितलेल्या तारखांना टांग मारून भलत्याच दिवशीं मी आलों. बघा कशी धांवपळ चालली आहे लोकांची ! दुकानाच्या कडेला मिळणाऱ्या थोड्याशा आडोशानें, आपण भिजत नाहीं अशी सोयिस्कर समजूत करून घेऊन भिजत चालले आहेत. त्या इवल्याशा आडोशाच्या वाटेवरून स्त्रीपुरुषांची होणारी आवक जावक निःसंशय प्रेक्षणीय असते. मुलीला जवळून डोळे भरून पाहणाऱ्या तरुणांपासून तों डोळ्यांत छत्रीच्या काड्या खुपसणाऱ्या बावळटांपर्यंत सगळ्या प्रकारचीं माणसं एवढ्याशा जागेंतून जातात. थोड्या जागेंत पुष्कळ माणसं असल्यामुळें यावेळीं मिळणारे किंवा दिले जाणारे धक्के क्षम्य ठरतात.

हीं कॉलेजांतील मुलें पहा. रेनकोट, हॅट् घालून रुबाबांत चाललीं आहेत आणि रस्त्यांत ' तसं ' कांहीं एखादं दृश्य दिसतं कीं काय याच्या शोधांत आहेत. तसं कुणी दिसलंच कीं, विन्या म्हणतो. ' हें भिजेल गोरें अंग' आणि लगेच वशा त्याला, ' अन् भिजेल चोळी तंग ' अशी स्वकृत काव्याची पुस्ती जोडतो. मग लगेच टोळक्यांत हंशा पिकतो. पुढं जाणारी मुलगी एकटीच असली तर ती मुकाट्यानें झपझप पुढें जाते. परंतु त्यांचाही कळप असला म्हणजे त्याही कमी वात्रटपणा करीत नाहींत. त्यावेळीं बिचाऱ्या पुरुषांना अगदीं नको नको होऊन जातं.

हे पहा दूधवाले वसईकर आणि भय्ये ! दुधाच्या कावडी आणि हंडे घेऊन माझा वर्षाव होत असतांनासुद्धां आस्ते कदम जात आहेत. त्यांचे दुधाचे हंडे उघडे राहिले आहेत ते चुकून नाहींत हं ! मुद्दामच त्यांनीं ते उघडे ठेवले आहेत. दूधवाल्यांना माझा सीझन एकंदरींत फायद्याचा जातो.

ऑफिसला जाणारी ही सूटबूटवाली मंडळी बघा. शिवाजीच्या वेळच्या मावळा पलटणीप्रमाणें, गुढघ्याच्या किंचित् खालपर्यंत पँट आणून ती क्लिप्स लावून जाम केली आहे. राडप्रतिबंधक उपाय आहे हा. डोक्यावर छत्रीसुद्धां धरून चालले आहेत. छत्रीचा मुख्य उपयोग म्हणजे रस्त्यांत भेटणाऱ्या

देणेकऱ्याचें तोंड चुकविणें हा असतांना माझा मारा चुकविण्यासाठीं माणसं छत्री कां वापरतात हें मला समजत नाहीं.

रेशनिंग आणि कॉलेज-कन्यकांचे हे तांडे पहा. पुस्तकांची चवड, छत्री, पर्स इत्यादि वस्तू हातांत धरून माझ्यामुळें निसरडें झालेल्या रस्त्यावरून तोल सावरून जातां जातां त्यांना पुरेवाट होते. राड उडूं नये म्हणून गुढघ्याइतकें वर धरलेल्या पातळावर, लवचिक चपलांच्या नाजूक पदाघातानें होणारें 'स्प्रेप्रिंटिंग' सुद्धां प्रेक्षणीय असतें. अगदीं फुकटांत पातळ प्रिंट होऊन मिळतं. अशी एखादी बिचारी तोल जाऊन अथवा घसरून रस्त्यावर पडली म्हणजे तिला अगदीं मेल्याहून मेल्यासारखें होतें.

बसचे क्यू बघितलेत का हे? कंडक्टरनें ठराविक प्रवासी घेतल्यानंतर बाकीचे भिजत राहिलेले प्रवासी कंडक्टरला, बेस्ट कमिटीला, एस के. पाटलांना (पाटलांना कुणीहि, कधींहि, कुठेंहि शिव्या द्याव्यात. बिचारे पाटील!) शिव्या देत उभे राहिले आहेत; आणि बसमध्यें जागा मिळालेले लोक मागें वळून जागा न मिळालेल्या लोकांना 'टाऽऽटा' करीत आहेत. (ही 'टाटा' 'बिर्ला' काय भानगड आहे?) निरोप द्यायचा हा मांडवलशाही प्रकार आहे काय?— पाऊस.'

हें कोळसेवाल्याचें दुकान पहा. काय? बिचाऱ्याचा माल भिजला म्हणून तुम्हांला वाईट वाटतें? 'मोरू' आहांत तुम्ही अगदीं! अहो हे कोळसे मुद्दाम भिजण्यासाठींच त्यानें उघड्यावर ठेवले आहेत. ओले कोळसे वजनांत कमी लागतात. तुम्हां माणसांचें हें नवीन सुधारलेलें व्यापारी तंत्र आहे ना?

मी जर का वेळींच आलों नाहीं तर तुम्हां सर्वांच्या तोंडचें पाणी अक्षरशः पळतें. तुम्ही प्रार्थना सुरू करतां, निरनिराळ्या देवांना पाण्यामध्यें आकंठ बुडवून ठेवतां. माझ्यावांचून तुमचं फारच नडतं म्हणून तर तुमच्या शहाण्या पूर्वजांनीं मला आणि माझ्या पाण्याला पंचमहाभूतांपैकीं एका भुताचें स्थान देऊन ठेवलें आहे.

∞ ∞ ∞

रस्ता

मानवी जीवनाचं खुलं आणि व्यापक दर्शक कुठं होत असेल तर तें माझ्या पृष्ठभागावर. माझ्या पाठीवरून नाना प्रकारचीं माणसं जातात येतात; असंख्य वाहनें भराभर धांवतात; धूर्त माणसं नीट सावधपणें जातात; मूर्ख माणसं लुबाडलीं जातात; बावळट माणसं केळ्याच्या सालीवरून घसरून पडतात; तरुण मुली तोंडाला पावडर फांसून पदर उडवीत लचकत जातात; विजारी घातलेल्या आणि उपरणं पांघरलेल्या पहिलवानी थाटाच्या पंजाबी स्त्रिया वोंटंत दिसेल तें खात जातात; नाकांत चूक मारलेल्या आणि नेहमीं सोवळ्यांतच आहेत असें वाटणाऱ्या मद्रललना; पदराचें अपसव्य केलेल्या महाकाय गुर्जरभगिनी; नाकांत माणिकमोत्यांचे प्रचंड दगड अडकविलेल्या सिंधी बायका—एक कीं दोन असंख्य प्रकारचे लोक माझ्या पाठीवरून जातात. डोक्यावर पृथ्वीचा भार सहन करणारा शेष सोडल्यास माझ्याइतका भार कोणीच सहन करीत नाहीं. भार असह्य होऊन माझें डांबरी अथवा सिमेंटचें मांस झिजून आंतील दगडी हाडें वरचेवर दिसूं लागतात.

या मिलीटरीच्या प्रचंड गाड्या बघा. कशा बेफाम वेगानें धांवत आहेत. या गाड्यांमुळें माझी प्रकृति नेहमीं नादुरुस्त होत असते. या गाड्या ॲक्सिडंट फार करतात. दुसऱ्या गाड्यांवर आदळून दुसऱ्या गाड्यांचा चक्काचूर झाला तरी या गाड्या आपल्या जशाच्या तशा ! स्टंट सिनेमांतील नायकाप्रमाणें अगदीं वज्रदेहीच असतात म्हणा ना !

आतां सकाळचे सात आठ वाजले आहेत. माझ्यावर तुम्हांला यावेळीं फारसें आकर्षण वाटणार नाहीं. वर्तमानपत्रवाले पोऱ्ये, दूधवाले भय्ये, पाववाले, पायाशीं फिट दुहेरी काचा मारलेले कल्हईवाले, रिपेरवाले, रद्दीवाले इत्यादि मंडळींचा माझ्या पाठीवरून संचार होतो. गिरण्या—कारखान्यांतून काम करणाऱ्यांची धांवपळ यावेळीं जोरांत होते.

आतां या गृहस्थाकडे पहा. वयानें पोक्त आहे. माझ्यावरून चालत चालत वर्तमानपत्र वाचण्याची याला खोड आहे. तरी बरं, माझ्या फूटपाथ नांवाच्या अवयवावरून तो वाचीत जातो. अहो तरी काय झालं ? आजपर्यंत त्यानें

वाचनाच्या नादांत, दहा पुरुषांना, सोळा बायकांना, दोन डझन मुलांमुलींना, सात आठ दिव्याच्या खांबांना आणि पांचसहा झाडांना धडका मारल्या आहेत, तीनदां केळ्याच्या सालीवरून पडला आणि दोन वेळां शेणांत पाय भरला. माझ्या फूटपाथवर भाजीचें दुकान मांडून बसलेल्या एका बाईच्या भाजीवरून हा गृहस्थ वाचनाच्या नादांत सरळ चालत गेला आणि त्यानें त्या बाईकडून आपल्या ८४ पिढ्यांचा (वडिलांकडील ४२ आणि आईकडील ४२), उद्धार करून घेतला.

आतां दहाचा सुमार झाला आहे. आतां मात्र थोडेंसें आकर्षण आहे. गर्दीचा हा दुसरा हप्ता आहे. शाळा कॉलेजांत जाणारीं मुलं मुली, गाइड्स् आणि नोट्स् पाठ करून जाणारे शिक्षक–प्राध्यापक, कागदांची नासाडी करण्यासाठीं नेमलेले पगारी कारकून, हिशेबांत चुका आणि घोटाळे निर्माण करून अकाउंटंटला दुप्पट काम देणाऱ्या स्त्री–कारकून, रेशनिंगमधील अन्नपूर्णा, वरील मंडळींच्या पोटापाण्याची व्यवस्था करणारे डबेवाले इत्यादि मंडळींची रहदारी नि धांवपळ माझ्यावरून यावेळीं सुरू होते. माझा हा वेळ गमतींत जातो.

गर्दीचा हा दुसरा बहर ओसरल्यावर मला थोडासा आराम मिळतो. साधारण दुपारच्या बारापासून तीन चार वाजेपर्यंत गर्दी कमी असते. नवरे मंडळी जेवून (अथवा उपाशीं) ऑफिसांत गेली कीं, चाळींतल्या बायकांचा दौरा सुरू होतो. नवरा बरोबर असतांना मनाजोगी खरेदी करतां येत नाहीं असें ज्या बायकांचें मत आहे अशा बायका यावेळीं आपली खरेदी आटपून घेतात. स्टेनलेस स्टीलचा एक चमचा घ्यायचा असेल तर या बायका सात आठ दुकानें फिरतील आणि चमचा घेण्यापूर्वी आणि नंतर गंगावनें, लोंकर, विणायच्या सुया, चाळीस नंबरचें सूत, रंगीत दोरा, गार्टर्स, आंकडे, ओलें कुंकू, आंत आरसा असलेली पर्स, प्लॅस्टिकच्या बांगड्यांचें अखंड भेंडोळें, रिब्बन्स, लेस आणि आणखी कितीतरी वस्तूंच्या रिकामटेकड्या चौकशा करतात. खरोखरच ' बायकांचा बाजार नि दुकानदार बेजार ' असं म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं.

दोन्ही बाजूचे फूटपाथ म्हणजे माझे दोन्ही हात. या माझ्या हातांवर सिनेमा बघणाऱ्यांच्या रांगा लागलेल्या असतात. दुपारीं सुमारें एकपासून ते

रात्रीं साडेनऊच्या खेळाचीं तिकिटें न मिळेपर्यंत मला हें मानवी ओझें सहन करावें लागतें. एवढी तपश्चर्या करून बघण्याइतके सिनेमा खरोखरच चांगले असतात काय ? मी आपला नेहमीं बाहेरच असतों, मला सिनेमा पहायला कधींच मिळत नाहीं म्हणून विचारतों ! बाकी तसा माझ्या पाठीवर शूटिंग चालू असतांना मीं थोडासा सिनेमा बघितला आहे. परंतु ॲक्सिडंटचें दृश्य आणि नायिकेची किंकाळी यापेक्षां मला केव्हांच कांहीं जास्त दिसलें नाहीं. 'रस्ता म्हणजे ॲक्सिडंट करण्याची जागा' अशी सिनेमावाल्यांनीं माझी व्याख्या केलेली दिसते.

साडेपांच वाजून गेले. आतां खरी मजा आहे माझ्या पाठीवर. सकाळीं सेवाधर्म करायला, शिकायला, शिकवायला, काळा बाजार करायला, लोकांना टोप्या घालायला इत्यादि कारणांनीं बाहेर गेलेले लोक आपापलीं कामें आटपून फिरायला निघाले आहेत. लग्न झालेले लोक आपल्या बायकांना घेऊन, ज्यांचें जमण्याचा 'चान्स' आहे असे लोक प्रेयसीला घेऊन, आणि बाकीचे बुभुक्षित एकटे अथवा मित्रांना घेऊन निवडक चेहऱ्यांना 'ए वन्. बी टू.' असे रूपानुरूप क्रमांक देत हिंडत असतात.

वरील सर्व मंडळी निरनिराळ्या ठिकाणांहून निघाली असली तरी शेवटीं सर्वांच्या वाटा, 'आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम्' या उक्तीप्रमाणें दादरच्या चौपाटीला मिळतात. माझ्यावरच्या गर्दीचा चान्स घेऊन पुष्कळ पुरुष बायकांना धक्के मारतात. एखादी वस्ताद बाई भेटली म्हणजे ती पुरुषाचा गाल लाल करते—चप्पलनें ! तर कांहीं मुली नुसतंच संतापून,' पुरुष मेले हलकट मेले असतात मेले; बायकांना मेले धक्का मेले मारतात मेले,' असं म्हणतात. तर कित्येक बायका धक्क्याचा विधिनिषेधच बाळगीत नाहींत. उलट त्या अस्ताव्यस्तपणें चालतात आणि पुरुषांनाच त्यांचा धक्का लागतो. जाऊं द्या ! माणसांनीं एकमेकांना मारलेल्या धक्क्यांचा त्रास मला होत नाहीं. संध्याकाळीं सात आठच्या सुमारास हीं फिरायला गेलेलीं माणसें घरीं परत येतात.

रात्रीं दहानंतर थोडे सभ्य लोक, आणि बरेच मवाली, उडाणटप्पू. मोटारींतून 'कुठें तरी' जाणारे श्रीमंत इत्यादि लोकांचा संचार माझ्यावरून होतो. आतां बरेच गरीब लोक माझ्या आसऱ्याला झोंपण्यासाठीं आले आहेत,

गृहविहीन माणसांना तुम्हीं माणसांनीं जागा दिली नाहीं तरी मीं पत्थराचा बनलेला असूनही त्यांच्या दुःखाला यथाशक्ति हातभार लावीत आहें.

आतां रात्रीचे बारा वाजून गेले. सगळीकडे सामसूम आहे. गस्तवाले, पहारेवाले गुरखे, आणि पोलीस दुकानांच्या फळ्यांवरून आरामशीर झोंपले आहेत. मीं माझी कैफियत चालू ठेवली तर त्यांची झोंपमोड होईल म्हणून मी ही कैफियत इथेंच थांबवितों.

∞ ∞ ∞

ऑफिस

मी एक निमसरकारी ऑफीस आहें. त्यामुळें सरकारी कामाचा भोंगळपणा आणि बिनसरकारी संस्थांचा वेंधळेपणा या दोन्हींचा पन्नास पन्नास टक्के असा सुंदर मिलाफ माझ्या ठिकाणीं झाला आहे. माझ्यामध्यें आज कित्येक वर्षे कैक कारकून आणि ऑफीसर्स राबून गेले आणि वरचा सबंध माळा भरून त्यांनीं रद्दी निर्माण करून ठेविली.

हा बाजूचा लाकडी पार्टिशन असलेला माझा भाग आहे ना त्यांत मुख्य साहेब बसतात. साहेबांचं नांव आहे देशपांडे. माणूस मोठा उमदा आहे. आपल्या सासऱ्याच्या वाशिल्यानें छोकरीबरोबरच नोकरीही त्यानें मिळविली आणि त्याच्याच वाशिल्यानें मुख्य साहेबसुद्धां झाला आहे. सासरा या संस्थेच्या संचालक मंडळांत आहे.

या रूममध्यें साहेबासमोर त्याची लेडीस्टेनोग्राफर बसते. 'फ्रॉकवाली' (म्हणजे वयानें लहान नव्हे !) आहे. बाकी आहे स्मार्ट हं ! नखाला लाल रंग लावलेलीं नाजूक बोटें टाइपरायटरवर विजेच्या वेगानें आणि नर्तिकेच्या लालित्यानें पंडूं लागलीं म्हणजे काय सुंदर दिसते ती ! मला नव्हे–साहेबांना ! आणि त्यामुळें घरीं आपली सुंदर पत्नी आहे याचाहि त्यांना कांहीं वेळ विसर पडतो. मधल्या वेळीं मिळून चहा घेणें आणि...इत्यादि गोष्टीहि ऑफिसच्या कामाव्यतिरिक्त चालतात. माझ्या स्वतंत्र बंदिस्त विभागांत ही भानगड चालत असल्यामुळें इतरांना त्याचा सुगावा लागत नाहीं. परंतु माझ्याच पार्टिशनमधील

भानगडी मला कळल्यावांचून कशा राहतील ? स्टेनोग्राफर XXX जातीची असल्यामुळें ती वरवरच्या प्रेमाच्या चाळ्यांचा फारसा विधिनिषेध बाळगीत नाहीं. उलट, चहापाणी आणि चैनी भागवायला बरं कूळ मिळालं, याच आनंदांत ती असते. शिवाय नोकरीच्या बाबतींत बॉसिंग नाहीं हा फायदा निराळाच !

आतां आपण साहेबांचा दरवाजा बंद करूं या. आतां तुम्ही माझ्या मुख्य भागांत आलां आहांत. ही खिडकीजवळची प्रशस्त खुर्ची आणि मोठें टेबल पहा. हेड्क्लार्क बसतात या ठिकाणीं. हावर्दसाहेबांचीं चार बुकं शिकून कारकून म्हणून हे या ठिकाणीं चिकटले आणि वशिलेबाजीच्या जोरावर हेड्क्लार्क झाले. बहुतेक सर्व हेड्क्लार्कप्रमाणें हे सुद्धां चष्मा निम्म्या नाकावर आणून कावेवाज दृष्टीनें कारकून-वृंदाकडे बघत असतात.' आमच्या वेळचे चार बुकं शिकलेले लोक इंग्लिशच्या बाबतींत हल्लींच्या बी. ए. च्या तोंडांत मारतील' असा त्यांचा नेहमीं दावा असतो. आणि गंमत म्हणजे हे महाशय मधून मधून इंग्लिशचा असा मुडदा पाडतात कीं बस् रे बस् !

आतां बाकीच्या कारकून मंडळीकडे बघा. प्रथम या शकुंतला श्रीखंडेकडे पहा. डिस्पॅच क्लार्क आहे. टेबलाच्या खणांत सुताचं बंडल ठेवून सारखं विणकाम चाललेलं असतं हिचं. त्यामुळें कामांत अधिकच घोटाळे आणि चुका होतात. कालिदासाच्या शकुंतलेप्रमाणें सुंदर आणि श्रीखंडाप्रमाणें अंगकांति असलेली ही गोड छोकरी सगळ्या कारकुनांना घायाळ करते. परंतु हेड्क्लार्क कसला खाष्ट ! तो मात्र हिला भाळत नाहीं. उलट चुकलं कीं दम भरतो. म्हणतात ना ' घरांत सासू नि ऑफिसांत हेड्क्लार्क ' अगदीं खरं आहे. हिशेबाचें नि श्रीखंडेचें वांकडें आहे. पोस्टाच्या तिकिटांच्या हिशेबांत इतका गोंधळ असतो कीं दरमहा तिच्या पदराला चाट बसते. पत्रें पाठवतांनासुद्धां घोंटाळे होतात. (आणि श्री. बाळासाहेब खेरांनीं स्त्रियांना ' कर्तृत्ववान् ' म्हणून सर्टिफिकेट देऊन ठेवलें आहे.) एकदां एका नव्या माणसास कारकून म्हणून नेमून घेतलेलें पत्र तिनें दिल्लीला अर्थमंत्र्यांच्या मुख्य सेक्रेटरीला पाठविलें आणि नोकरी मागण्यासाठीं आलेल्या बुभुक्षु माणसाकडे, ' संस्थेला सध्यां मिळत असलेल्या दोन लक्ष रुपये ग्रँटमध्यें पंचवीस टक्के वाढ करावी ' अशी ' भिक्षांदेहि '

केली. दोघांकडूनहि नकारात्मक उत्तरें आल्यावर हेड्क्लार्कनें तिला या गफलतीबद्दल हडसून खडसून जाब विचारला. झालं ! बायकांचं निर्वाणीचं अस्त्र बाहेर आलं ! गंगा यमुना डोळ्यांत उभ्या ! जाऊं द्या; पोरीची जात आहे. माझ्या चार भिंतींत थोडंच आयुष्य घालविणार आहे ? लग्न झालं कीं जाईल आपल्या नवऱ्याच्या घरीं !

या कारकुनाकडे पहा. तरुण पोऱ्या आहे. इंटर आर्ट्सला शिकत आहे. याचं नांव आहे अरविंद गोगटे. काम करीत आहे असा भास निर्माण करीत हा भराभर लघुकथा वाचून काढतो. त्याला अरविंद गोखल्यांच्या लघुकथा फार आवडतात. दिवसाकांठीं हा जेमतेम तीनचार कागद कामासाठीं म्हणून नासतो.

हे दुसरे तरुण कारकून पहा. यांच्याकडे पत्रांचें आवक खातें आहे. यांचें नांव आहे का. शि. खडके. नांवाच्या आद्याक्षरांवरून सर्वजण यांना ' काशी खडके ' असेंच हांक मारतात. आवकच्या लठ्ठ रजिस्टरांत ना. सी. फडके ठेवून वाचण्याची त्यांना संवय आहे.

हे कोंपऱ्यांतले पोक्त गृहस्थ आहेत ना त्यांचं नांव आहे दाजी कर्वे. त्यांच्याकडे रेकॉर्डचें काम आहे. आणि त्यांच्या शेजारचे धोंडोपंत खाबू. त्यांच्याकडे स्टोअरचें काम आहे. हे दोघेजण अव्वल इंग्रजीपासून चालत आलेली ' चंचीपरंपरा ' चालवीत असतात. रेकॉर्ड क्लार्कला वरची प्राप्ति नसते म्हणून चंचीखर्च एकटे खाबूच चालवितात.

हा पंचविशींतला तरुण पहा. टाइपिस्ट म्हणून काम करतो. त्याचं नांव आहे वसंत काणे. स्वारीचं सारं लक्ष शकुंतला श्रीखंडेवर असतं. त्यामुळें टाईपिंगमध्यें तो स्पेलिंगच्या इरसाल चुका करून ठेवतो. जाधव (Jadhav) या शब्दाचें स्पेलिंग त्यानें एकदां (Gadhav) असें केलें होतें. आणि एकदां तर कोल्हापूरच्या श्रीखंड्यांना लिहायच्या पत्रावर ' माय डिअर शकुंतला श्रीखंडे ' असं चक्क टाइप करून तें पत्र कोल्हापूरला रवाना केलें.

हे अकाउंटंटसाहेब ! यांचं नांव आहे भास्करराव बेणारे. दिवसभर आंकड्यांच्या नांवानें बोटें मोडीत असतात आणि दरमहा हिशेबांतील

घोंटाळ्यांची तोंडमिळवणी करण्यासाठीं पदराला चाट लावून घेतात. आणि वर म्हणतात कीं, ' ऑडिटर्स मूर्ख असतात म्हणून त्यांच्या समजुतीसाठीं मला पदराला चाट लावून घ्यावी लागते. ' इतक्या चुका करूनही त्यांचा स्वतःच्या गणिताच्या ज्ञानावरील विश्वास जबरदस्त आहे. परंतु आंकडे हे नेहमीं दगा देणारच ! मग ते हिशेबांतिल असोत किंवा अमेरिकन कापसाचे असोत !

आतां हीं तीन रत्नें पहा. शिर्पती, 'म्हादू आणि रामचंदर ! हे तिघेजण शिपाई आहेत. महादेवाआधीं नंदीला प्रथम नमस्कार करावा लागतो त्याप्रमाणें साहेबांच्या अगोदर शिर्पतीला करावा लागतो. शिर्पती साहेबांच्या तैनातीला आहे. बाकीचे दोघे सगळ्या कारकुनांसाठीं आहेत. परंतु दोघे एका वेळीं कधींच सांपडत नाहींत. दोघेहि आळीपाळीनें एकमेकांना (खरोखरची) करंगळी दाखवून आणि कारकुनांना (लाक्षणिक) आंगठा दाखवून चहा, बिडी, तंबाखू इत्यादि कार्यक्रमांसाठीं म्हणून गुल् होतात. फोर्टमध्यें त्यांना कामाला पाठविलें कीं, संध्याकाळीं ऑफीस बंद होतांनाच हजर होतात. रिकाम्या वेळीं टोपी डोळ्यांवर आणून स्टुलावर बसल्या बसल्या डुकल्या घेणें दोघांनाहि मनापासून आवडतें.

माझ्यामध्यें बसणारी मंडळी एकंदरींत ही अशी आहेत. एकेका कारकुनानें पेन्शनमध्यें निघेपर्यंत अशी रद्दी निर्माण करून ठेविली आहे कीं, त्यापुढं तुमचं मराठी साहित्य म्हणजे किस झाड कीं पत्ती ! माझ्या पोटमाळ्यावरच्या रद्दीचा ढीग रचून त्याच्या शेजारीं डॉ. केतकरांचा ज्ञानकोश आणि समग्र केळकर वाङ्मय ठेविलें असतां तो संयुक्त गट्ठा, हिमालयापुढें पुण्याची पर्वती ठेवल्याइतका क्षुद्र भासेल !

आँ ! सहा वाजले कीं ! कारकून आपापलीं मासिकं, पुस्तकं, विणकाम, चंच्या गुंडाळून घरीं निघाले. रामचंदर माझ्या खिडक्या दारं बंद करीत आहे. दारें बंद केल्यावर माझं बोलणं तुम्हांला ऐकूं यायचं नाहीं म्हणून मी माझी कैफियत इथंच थांबवीत आहें !

∞ ∞ ∞

महिला मंडळ

पिता रक्षति कौमारे, भर्ता रक्षति यौवने ।
रक्षन्ति स्थविरे पुत्रा, न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥

असं म्हणणारा मनु जर आज पुन्हां जन्म घेईल आणि बायकांचं स्वातंत्र्य आणि कर्तबगारी पाहील तर पुरता चाट पडेल. बायकांच्या निरनिराळ्या पुरोगामी कर्तबगाऱ्यांपैकीं एक म्हणजे मी—महिला मंडळ—आहें. श्रीमंत बायकांनीं आपल्या नवऱ्यांच्या पगारांतून आणि इतर श्रीमंतांपासून पैसे जमवून माझी इमारत बांधली आहे.

संस्थेची घटना, पदाधिकारी इत्यादि सर्व कांहीं पद्धतशीर आहे. परंतु 'भांडणें' हा जो स्त्रियांचा आनुवंशिक वारसा आहे तो इथेंहि प्रकट झाल्यावांचून राहात नाहीं. जगांतील पुरुषांचीं पुष्कळ भांडणेंसुद्धां स्त्रियांवरूनच झालीं आहेत; मग खास स्त्रियांच्या संस्थेंत भांडणें नाहींत असें कसें होईल ?

संस्थेच्या घटनेंत सर्व स्त्रियांना समानता, लायकी इत्यादि बाबतींत निःपक्षपातीपणा दाखविला जाईल असें असलें तरी प्रत्यक्ष व्यवहारांत मोठ्या जागा मोठ्यां (शरिरानें आणि पैशांनीं) बायकांनीं अडविलेल्या दिसून येतील. साधारणपणें येथील स्त्रियांचा लहानमोठेपणा त्यांच्या नवऱ्यांना मिळणाऱ्या पगाराच्या आंकड्यावरून ठरविण्यांत येतो. तसा लेखी नियम नसला तरी रूढि मात्र आहे. त्यामुळें एखाद्या तीन साडेतीन हजार रुपये पगारवाल्या गृहस्थाची, स्थूल शरिराची, गोल पातळ नेसण्याचा नाहक हव्यास धरणारी, मूळची कमी लायकी असलेली परंतु बड्याची अर्धांगी असलेली बाई अध्यक्ष किंवा कार्यवाह बनते, आणि एखाद्या सुशीक्षित, तरुण, तडफदार परंतु कारकुनाच्या किंवा मास्तराच्या बायकोला कार्यकारी मंडळांतील सभासदाची जागा मिळणेंसुद्धां मुष्कील होतें.

आतां इथं चालणाऱ्या कामकाजाची आणि स्त्रियांची माहिती करून घ्या.

या जॉर्जेटची गोल साडी नेसलेल्या गोल गरगरीत बाई आहेत ना त्या अध्यक्ष आहेत. त्यांच्या यजमानांना दरमहा साडे तीन हजार रुपये पगार

मिळतो. इतका पगार सभ्यांच्या सभासदांपैकीं कोणाच्याच नवऱ्याला मिळत नसल्यामुळें अध्यक्षपद ओघानेंच त्यांच्याकडे आलें. शेजारीं बसलेल्या बाई उपाध्यक्ष आहेत. त्यांच्या 'इकडे' दरमहा तीन हजार मिळतात. पलीकडेच त्या जाड परंतु चालायला सुटसुटीत बाई आहेत ना त्या आहेत कार्यवाह ! त्यांच्या 'ह्यां' ना दरमहा अडीच हजार मिळतात. पुढील खुर्च्यांवर या दहाबारा बायका बसल्या आहेत ना त्या आहेत कार्यकारी मंडळाच्या सभासद. ज्यांच्या नवऱ्यांना कमींतकमी पांचशें ते दोन हजारपर्यंत पगार आहे, अशा स्त्रियांनाच कार्यकारिणींत घ्यायचें असा एक अलिखित नियमच आहे म्हणा ना ! आणि मागं बांकड्यांवर खूप बायका दिसतात ना त्या आहेत प्राथमिक सभासद. त्यांचे नवरे दरमहा दीडशें ते पांचशें मिळवितात.

या प्राथमिक सभासदांतील स्त्रिया कांहीं चांगला हेतु मनांत धरून इथें येतात. सामाजिक कार्य म्हणा, शिवणटिपण म्हणा, बौद्धिक विकास म्हणा यासाठीं येतात. त्यांतील बऱ्याचजणी सुशिक्षित आणि मध्यमवर्गीय असल्यामुळें मेहनती आणि कामसू आहेत. त्यांच्या या गुणांचा फायदा घ्यायला वरील बड्या बायका कधीं विसरत नाहींत.

आतां हीच गोष्ट पाहा ना ! अध्यक्षीणबाईनीं सभ्यांची अन्नटंचाई लक्षांत घेऊन पूरक अन्नाच्या विविध पदार्थांचें प्रदर्शन भरविण्याची टूम काढली. परंतु पदाधिकाऱ्यांपैकीं एकाहि स्त्रीनें उभ्या आयुष्यांत फोटो काढण्यासाठींसुद्धां लाटणें किंवा तत्सम आयुध हातांत धरलेलें नसल्यामुळें त्यांना प्राथमिक सभासदांना हातीं धरणे भाग पडलें. मध्यमवर्गीय बायकांना हल्लींच्या दिवसांत कोंड्याचा मांडा करून संसार गोड करून घेण्याची संवय झाली आहे. त्यांनीं आपल्याला येत असलेल्या पदार्थांची यादी सांगितली. तेव्हां अध्यक्षीणबाई हंसून म्हणाल्या, 'तुम्ही बायका अगदीं पेशवाई काळांतल्या आहांत बघा ! या पूरक अन्नाचे हल्लीं वडे, थालिपीठें करायचीं नसतात कांहीं ! आपण लांबलचक रताळ्याचा 'कुतुबमिनार' करूं; बर्फीच्या ताटावर 'ताजमहाल' कोरूं; घट्ट श्रीखंडाच्या ताटावर केशराच्या काड्यांनीं एक भिकारीण आपल्या मुलासहित भीक मागत आहे असें चित्र काढून अन्नटंचाईचें औचित्य दाखवूं. अशा प्रकारचीं चित्रें काढून त्यांचें प्रदर्शन भरवायचें !' अध्यक्षीणबाईनीं आपली कल्पना अंमलांत

आणून प्रदर्शन भरवलेंसुद्धां. 'मोठ्या' लोकांनीं कलाकृतीचं कौतुक केलं, परंतु हल्लींचीं वर्तमानपत्रं कसलीं रद्दड! त्यांना कलात्मक दृष्टीच नाहीं. उलट 'अन्नाची नासाडी! अन्नाची नासाडी!' अशी त्यांनीं बोंब मारली.

माझ्या ठिकाणीं जमणाऱ्या स्त्रियांची कपड्यांची चढाओढ नेहमीं लागते. कार्यवाहीणबाईंनीं शंभर रुपयांचं फिकट निळ्या रंगाचं पातळ घेतलं कीं, उपाध्यक्षीणबाईनं दीडशें रुपयांचें गडद निळ्या रंगाचं पातळ घेतलंच म्हणून समजा. आणि मग अध्यक्षीणबाईना, दोघींच्या नाकावर टिच्चून गडद निळ्या रंगाच्या वरच्या रंगाचं म्हणजे जांभळ्या रंगाचं पावणेदोनशें रुपयांचें पातळ आणायला मुळींच वेळ लागत नाहीं. या तिघीजणी साध्या सभासदांच्या 'स्वस्तिक' आणि 'टिकेकरी' पातळांकडे नेहमींच नाकं मुरडून पाहातात.

स्त्रियांना स्वावलंबी बनून आपद्प्रसंगीं आत्मसंरक्षण करतां यावें म्हणून लाठीवर्ग चालू केला आहे. परंतु पदाधिकाऱ्यांपैकीं आणि कार्यकारिणींतील सभासदांपैकीं बऱ्याचजणी स्थूल असल्यामुळें त्यांना स्वतःचें शरीर पेलणेंच झेंपत नाहीं, मग लाठी कशी पेलणार? सभेंत या नेहमीं ओरडून सांगतात, 'स्त्रियांनीं स्वसंरक्षणक्षम बनलें पाहिजे?' आणि इकडे प्रत्येकीच्या बंगल्यावर पहाऱ्यासाठीं गुरखा आहे; आणि निवडक फोन-नंबरच्या यादींत पोलिस स्टेशनचा फोन नंबर बराच वर आहे.

माझ्या आवारांत शिवणकामाचाही वर्ग चालू आहे. मध्यमवर्गीय सभासदांनीं शिवणकला व्यवस्थित हस्तगत केली आहे; आणि नवऱ्यानें घर-खर्चाला दिलेल्या पैशांतून थोडथोडी बचत करून कांहींजणींनीं स्वतःचें मशिनसुद्धां आणलें आहे. घरचे आणि ओळखीच्या लोकांचे कपडे दुपारच्या वेळांत शिवून देऊन त्या आपल्या नवऱ्यांना संसारांत सक्रिय मदत करीत आहेत. बड्या स्त्रियांनींसुद्धां शिवणकलेंत बरीच प्रगति केली आहे. गेला महिनाभर हातरुमाल शिवणाऱ्या बायका या महिन्यांत बिनबंदाच्या पिशव्या उत्तम शिवूं लागल्या आहेत, (नवऱ्याच्या पँटचा गुदग्याखालचा भाग कापून त्याच्या पिशव्या बनवितात). पुढील महिन्यापर्यंत त्या उत्तम प्रकारें बंद लावूं शकतील.

परवांच्या सभेंत एक ठराव पास झाला, 'कीं स्त्रियांनीं प्रत्यक्ष सामाजिक कार्य केलं पाहिजे.' त्यास अनुसरून कामगार वस्तींत जाऊन तेथील स्त्रियांना बालसंगोपनादि विषय आणि लिहिणें वाचणें शिकविण्यासाठीं त्यांचा त्या भागांत दौरा सुरू झाला. अध्यक्षीणबाईनीं स्वतःकडे लोअर परळचा खास कामगार भाग घेतला. तेथें जाऊन तेथील स्त्रियांत मिसळल्यासारखें केलें. एका शेंबड्या, अर्धनग्न पोराला (श्वास घट्ट दाबून घेऊन) जवळ घेतलें आणि त्याला दूध नि क्रीमकस्टर्ड बिस्किटं दिलीं. नंतर बायका जमवून व्याख्यान दिलं. 'मातांनो, आपलीं बाळं सुदृढ होण्यासाठीं मुलांना दररोज अर्धा शेर दूध दोन वेळां मिळून देत जा आणि शिळे किंवा तेलकट पदार्थ न देतां दररोज दोनचार 'गोल्डन पफ्' बिस्किटं देत जा. त्यांना व्यसनापासून अलिप्त ठेवा. त्यांना साबण लावून आंघोळ घाला आणि स्वच्छ इस्त्रीचे कपडे घाला. मुलें म्हणजे उद्यांचे नागरिक आहेत. आठवड्यांतून एक दिवस येऊन मी तुम्हांला लिहायलावाचायलासुद्धां शिकविणार आहें.'

आतां वरील भाषण आणि स्वतःची कृति यांतील विसंगति पाहा. लोकांना ज्ञान पाजणाऱ्या या बाईनें स्वतःच्या मराठी तिसरींतील मुलीला शिकवणीसाठीं दरमहा पन्नास रुपयांवर मास्तर ठेवला आहे. बालसंगोपनावर 'परोपदेशे पांडित्यम्' करणारी ही बया स्वतःचं सातआठ महिन्यांचं मूल मोलकरणीवर सोपवून सामाजिक कार्याची 'फुकट फौजदारी' करायला निघाली आहे. व्यसनापासून अलिप्त राहा म्हणून सांगणारी ही बाई सीझनमध्यें 'महालक्ष्मीची यात्रा' चुकवीत नाहीं. शिवाय रमी खेळते तें निराळेंच.

संस्थेचें मुखपत्र आणि साहित्यसेवा म्हणून एक हस्तलिखित नियतकालिक चालविण्यांत येतें. लिखाण, सजावट, चित्रं, इत्यादि किचकट कामं तरुण, होतकरू अशा साध्या सभासद-स्त्रियांकडून करून घेण्यांत येतात आणि संपादक मंडळांत अर्थात् कोणाचीं नांवें चमकतात हें निराळें सांगायला नको. ते भयंकर लेख, त्या मुक्ततंत्र लघुकथा, वाचकांना बेशुद्ध पाडणाऱ्या कविता, विनोदानें नव्हे तर उपहासानें हंसायला लावणारे चुटके! अरे बाप रे! बंदच करूं या कसं तें नियतकालिक!

जातां जातां एक चर्चेची गंमत सांगावीशी वाटते. साखर-टंचाई दूर करण्यासाठीं सरकारनें लोकांना 'साखरेचे पुडे' द्यावेत अशी चर्चा करण्यासाठीं अखिल जागतिक मानवांना (वचने किं दरिद्रता) निमंत्रण केलें होतें; परंतु कार्यबाहुल्यामुळें मानव कांहीं येऊं शकले नाहींत. बरेच स्थानिक मानव या चर्चेला आले होते. परंतु त्या चर्चेचा एकदम बोऱ्या वाजला. स्त्रियांच्या मतें हा बोऱ्या पुरुषांनींच वाजविला. अखेर, 'पुरुष मेले हलकट मेले असतात मेले' हेंच खरें!

असो! आतां इथं एक सभा भरत आहे. सभेंतील मुख्य विषय, 'बायकांनीं नवऱ्यांचें आर्थिक दास्य स्वीकारावें कीं अर्धांगीपणाचा हक्क म्हणून नवऱ्याचा अर्धा पगार मागून घ्यावा?' असा आहे. बायका एरवीं मधुभाषिणी असल्या (असतात काय?) तरी वादविवाद करतांना त्यांच्यांत जिजाबाई आणि झांटीपी यांचा संचार होतो. त्यांच्या शाब्दिक काथ्याकूटाच्या आरडाओरडींत माझं बोलणं तुम्हांला ऐकूं यायचं नाहीं म्हणून माझ्या कैफियतीला इथंच विराम देऊं या.

∞ ∞ ∞

तरुण मुलगी

'अत्र पयोधरविस्तारयितृकमात्मनो यौवनमुपालंभस्व' असं वाक्य प्रियंवदेच्या तोंडीं घालणाऱ्या कालिदासापासून ते 'तिचें स्तन भिजवलेल्या कणकेच्या घट्ट गोळ्याप्रमाणें होतें' असं वर्णन करणाऱ्या अमुकतमुक लेखकापर्यंत साऱ्या पुरुषांचा डोळा मेला आम्हां बायकांवर आणि आमच्या शरीरसौष्ठवावर। ही सगळी पुरुषमंडळी अनादिकालापासून आमच्यावर अशी कां टपून बसली आहेत कुणाला ठाऊक? विश्वामित्रानें यावें मेनकेच्या मागें लागावें; शंतनूनें यावें नि मत्स्यगंधेशीं लगट करावी; दुष्यंतानें यावें आणि पहिल्याच भेटींत शकुंतलेशीं करूं नये ती गोष्ट करून ठेवावी; इंद्रानें गौतमाच्या रूपानें यावें नि अहिल्येशीं आपला पतित्वाचा हक्क बजावून जावें! आणि मोंगल बादशहांनीं तर आम्हां तरुण बायकांची सोळ एजन्सीच घेतली होती. काय मेला हा बाइलेपणा! पुरुषांनीं चांगलं शिकावं, नोकरी-धंदा करावा, राजकारणाचीं

गटारं उपसावींत, युद्धं करावींत, काळा बाजार करावा, मारामाऱ्या कराव्यात ! तें सगळं सोडून आमच्या मागं कां लागतात मेले सगळे !

माझीच गोष्ट पाहा ना ! आतां मी आहें एकवीस वर्षांची. हें वय खरं आहे हं ! या मेल्या पुरुषांनीं आम्हां बायकांची वयासंबंधीं कायमची बदनामी करून ठेविली आहे. जसं कांहीं हे नेहमीं खरंच वय सांगत असतात. जन्मपात्रिकेंत जन्म दाखविलेला असतो एका वर्षीं तर शाळेंत हा जन्म दोन वर्षांनीं पुढं सरकलेला असतो; सरकारी नोकरीच्या वेळीं तर पुरुषांची पंचविशी चारपांच वर्षें उलटतच नाहीं. जाऊं द्या ! म्हणतात ना 'चोराच्या उलट्या...!'

मला माझ्या पांचव्या वर्षापासूनचं सारं आठवतं. मी अतिशय सुंदर नि आकर्षक आहें हें तुमच्या लक्षांत आलं असेलच. माझं नांव इंदु आहे. मला किनई इंदु हें नांव भारी आवडतं बाई. मला हें नांव आवडेल हें आईबाबांना माझ्या बारशादिवशीं कसं कळलं कुणास ठाऊक ? माझं आडनांव आहे देशपांडे. मी पांच वर्षांची असतांना आमच्या शेजारीं कुलकर्णी नांवाचे एक डॉक्टर राहात होते. त्यांचा सात वर्षांचा वसंत नांवाचा मुलगा होता. तो दिसायला बरा होता असं मला आठवतंय. तो माझ्याशीं नेहमीं खेळायला यायचा. आम्ही खूप खेळायचीं. खेळून परत जातांना मात्र तो माझ्या गालाचा चावा घेऊन जायचा. त्या वयांत तो जें करायचा किंवा मीं जें करून घ्यायची तें अर्थातच वयाच्या दृष्टीनें निष्पाप असेंच होतें. परंतु त्यांत पुरुषी प्रवृत्तीचा अंकूर कसा होता हें स्पष्टपणें दिसतें.

मी शाळेंत जाऊं लागून मराठी चौथी पास झालें. पहिला नंबर आला होता माझा त्या वेळीं. मी माझ्या मावशीला ही बातमी सांगायला गेलें होतें तेव्हां तेथें तिचा पुतण्या शरद् होता. तो मॅट्रिकला होता. मी चौथी पास झालें तेव्हां दहा वर्षांची होतें. मीं पहिल्या नंबरनें पास झाल्याचं ऐकून तो मारे लाडालाडानें माझ्याजवळ आला नि, 'आमच्या इंद्याट्ल्याचा पहिला नंबर आला काय ?' असं म्हणत मला एखाद्या तान्ह्या मुलासारखं उचलून घेतलं नि गालगुच्चा सुद्धां घेतला. तेव्हां मला 'तसलं' कांहीं कळत नव्हतं तरी मी चटकन् खालीं उतरलें. कां कुणास ठाऊक, मला लाज पण वाटली आणि 'इश्श, हें रे काय शरद् ? मोठ्या मुलींचे गालगुच्चे घेत असतात वाटतं ?'

असं फणकाऱ्यानं म्हटलं. दहा वर्षांची असणं म्हणजे मोठी असणं असं त्या वेळीं मी समजायची. मला शरदूचा नक्की हेतु त्यावेळीं कळला नाहीं, तरी आतां मात्र ध्यानांत येऊं लागला आहे. त्या वेळीं तो साधारण सोळा सतरा वर्षांचा असावा. त्या वयांत माणसांना आंतून कसं कसं होतं हें मला पांचसहा वर्षांपूर्वीपासूनच कळूं लागलं आहे. माझ्या दहाव्या वर्षीच्या अज्ञानाचा फायदा त्यानें त्या वेळीं अशा प्रकारें घेतला होता. एकूण पुरुष असे चावट असतात तर!

मी इंग्रजी शाळेंत जाऊं लागलें. इंग्लिश शिकूं लागलें म्हणून बाबांनीं मला चांगले चांगले फ्रॉक्स शिवले. छान छान सँडल्स् घेऊन दिले. आणि फाऊंटन पेनसुद्धां आणून दिलें. मी मस्त मस्त फ्रॉक्स घालूं लागल्यामुळें अधिकच रुबाबदार दिसूं लागलें. इंग्लिश पहिलींतलीं मुलं! होतीं लहानच. म्हणजे माझ्या त्या वेळच्या वयाची. परंतु त्यांना त्या वयांत कळणारा चावटपणा करायला तीं विसरत नव्हतीं. मी एकटी चाललें म्हणजे हीं चावट मुलं आपापसांत परंतु मला ऐकूं येईल या बेतानें, 'क्यू यू डबल इ एन् क्वीन, म्हणजे राणी, 'बी ई ए यू टी आय् एफ् यू एल ब्यूटिफूल, म्हणजे सुंदर, 'बी ए डबल एल, म्हणजे चेंडू' असे शब्द पाठ करीत असल्याचा आव आणीत होतीं. त्या वयाच्या मुलांना, 'आपण इतकं बोललों म्हणजे भरपूर चावटपणा केला' असं वाटायचं. पुरुषांच्या बालवयांतील चावटपणाचा आहे कीं नाहीं हा नमुना!

पंधराव्या वर्षीं मी इंग्लिश पांचवींत गेलें. मी मोठी दिसूं लागलें. मी मोठी झाल्याचा मला अभिमान वाटला. आतां मला मुलं चिडवणार नाहींत असं त्या वेळीं माझ्या अपरिपक्व बुद्धीला वाटलं. परंतु झालं उलटं! मीं जसजशी मोठी होऊं लागलें तसतशी या भुंग्यांची संख्या वाढूं लागली. पांचवींत आल्यावरचा माझ्यांतील मोठा बदल म्हणजे मी पातळ नेसूं लागलें. हो! फ्रॉक घालणं बरं का दिसतं वाढत्या शरिराला? मी पहिल्यांदा गोल पातळ नेसून वर्गांत आलें त्या वेळची गोष्ट. मुलं सगळीं बसलीं होतीं. शिक्षक अद्याप यायचे होते. मी वर्गांत शिरलें मात्र—लगेच सगळ्या मुलांनीं डेस्कवर थापा मारून आणि, 'बक् अप् गोल साडी' असा ओरडा करून सारा वर्ग डोक्यावर घेतला. मी रागानें आणि लाजेनें इतकी लालेलाल झालें कीं विचारायची सोय नाहीं. तेवढ्यांत जर मास्तर आले नसते तर मी पळूनच गेलें असतें. दुसरे दिवशीं

पुन्हां फ्रॉक घालण्याचा विचार केला, परंतु यापुढं मुलांना भिऊन फ्रॉक किती दिवस घालायचा असा विचार करून मी दडपून पातळ नेसूनच जाऊं लागलें. मीं फ्रॉक घालीत होतें तेव्हां मागल्या बांकावर बसणारीं टारगट कार्टीं कसलासा 'कैरीसुपारी' चा उखाणा घेत असल्याचं मीं ओझरतं ऐकलं होतं. हलकट मेले!

मॅट्रिकच्या वर्गांत गेल्यावर माझा रुबाब वाढला. मला शिकवणीसाठीं मास्तर ठेवले. जोशी मास्तर मला घरीं शिकवायला यायचे. ते नुकतेच गेल्या वर्षी एम्. ए. झाले होते. माझ्या वर्गांतल्या मंदा जोशीचे ते चुलत भाऊ होते. त्यांचं लग्न अजून झालं नव्हतं हें मला मंदाकडून कळलं होतं. ते मला संस्कृत, इंग्लिश नि मराठी शिकवायचे. ते शिकवायचे छान, परंतु शिकवितांना ते सारखे माझ्याकडे पाहायचे. मला लाजल्यालाजल्यासारखं व्हायचं. तेव्हां मला नुकतंच सतरावं वर्ष लागलं होतं. त्यावेळीं त्यांच्या मनांत माझ्याविषयीं कांहींतरी निराळं वाटत होतं असं वाटतं. एकदोनदां त्यांनीं सहज बातमी म्हणून दोन मुलींनीं शिकवणीच्या मास्तरशींच लग्न करून टाकलें असें सांगितलें आणि पर्यायानें परंतु उघड उघड आपला बेत बोलून दाखविला. परंतु कां कुणास ठाऊक, मास्तरांचं तसलं बोलणं नि वागणं मला नाहीं आवडलं. एकूण शाळेंतलीं मुलं काय नि शिकवणीचे तरुण मास्तर काय सगळे मेले ठपून बसलेले असतात बायकांचं सौंदर्य लुटायला!

मी व्यवस्थित रीतीनें मॅट्रिक पास होऊन कॉलेजांत गेलें. बाबांनीं मला रेशमी पातळं घेऊन दिलीं. मीं लहान असतांना रेशमी फ्रॉक्स घालायची, परंतु त्या वेळीं मला रेशमांतील मादक सळसळाट जाणवला नाहीं. कदाचित् हा वाढत्या वयाचा परिणाम असावा. मी मूळची सुंदर! त्यांतून वय सतरा आणि कपडे आकर्षक! त्यामुळें तर मी सगळ्या कॉलेजांत उठून दिसायची. एफ्. वाय्. च्या चावट मुलांनीं मला त्या वर्षीचा 'ए वन्' नंबर बहाल केला होता. मला कॉलेजांत जाणं किती किती आवडायचं. परंतु या मेल्या दोळभैरवांपुढं नक्को नक्को होऊन जायचं. क्लासमध्यें कागदी बाण काय मारायचे, उशीर झाला कीं बांक काय बडवायचे? एकदां तर मागाहून कुणीतरी मारलेला कागदी बाण नेमका माझ्या वेणींत पडून फुलासारखा खोंवला गेला. संस्कृतच्या तासाला तर मला तो तास कधीं संपतो असं व्हायचं.

मला तसें संस्कृत खूप आवडतं, परंतु संस्कृतांतलीं तीं प्रेमप्रकरणं आलीं कीं प्राध्यापक रंगांत येऊन सांगायचे आणि चावट कार्टी तीं वर्णनं मला लावून माझ्या नांवाचा शंख करायचीं. रघुवंशांतील 'अज–इंदुमती विवाहा' चा सर्ग चालला असतांना एका आचरट विद्यार्थ्यानें प्राध्यापकांना मुद्दाम प्रश्न विचारला कीं, 'सर, अज म्हणजे बोकड असा अर्थ आहे. मग बोकडाशीं इंदुमतीनें लग्न कसं केलं?' सगळीं पोरटीं माझं नांव उच्चारलं गेल्यावर खो खो हंसायला लागलीं. मला कांहीं सुचेना. मी खूप खूप चिडलें आणि घरीं येऊन रडलें.

इंटरला गेल्यावर एक काळे नांवाचा विद्यार्थी माझी ओळख करून घ्यायला धडपडत होता. परंतु मला त्याचा हेतु कळला. मी कांहीं कुक्कुलं बाळ नव्हतें. मीं त्याला चार दिवस झुलविल्यासारखं केलं नि एके दिवशीं जास्त लगट करायला लागल्याबरोबर दाखविला त्याला हिसका! प्रेम करतोय् मेला! दाढी तरी करतां येतेय् का नीट?

मी इंटर पास झाल्यावर ज्यू. बी. ए. ला गेलें. हें वर्ष अभ्यासाच्या दृष्टीनें कमी त्रासाचें होतें. गॅदरिंगच्या वेळीं नाटकाचा सेक्रेटरी माझ्याकडे येऊन मला नाटकांत काम करण्याबद्दल विनंति करूं लागला. मी त्याला होकार दिला. परंतु मी नायिका होण्याचें ठरल्याबरोबर नायक होण्याच्या बाबतींत सदू बर्वे आणि मधु कर्वे या दोन विद्यार्थ्यांत सुंदोपसुंदी सुरू झाली. शेवटीं मींच नाटकांतून नांव काढून घेतलं. हलकट मेले! नाटकांत मी त्यांची बायको होणार म्हणून हुरळून गेले होते. कशी पण जिरविली त्यांची? मी काम केलं नाहीं हेंच बरं झालं असं वाटतं; नाहींतर नाटकांतल्या प्रेमप्रसंगीं मेल्यांनीं माझं खरोखरीच चुंबन घ्यायलाही कमी केलं नसतं!

मी सीनीयर बी. ए. ला खूप अभ्यास करून पास झालें. आईबाबांना आनंद झाला. ते माझ्या लग्नाची भाषा बोलूं लागले. आणि थोड्याच दिवसांत हेमंत जोशी नांवाच्या आमच्या परिचयांतील उमद्या तरुणाशीं माझें लग्न झालें.

आमचं वैवाहिक जीवन सुखाचं आहे. आम्ही नेहमीं संध्याकाळीं दादरच्या चौपाटीला फिरायला जातों, परंतु तिथंही मेले टोळभैरव हजरच! फिरायला

येण्याच्या नांवाखालीं पोरी बघण्याचं काम करतात. माझ्याकडे कुणी वळून बघतो; कुणी टक लावून बघतो, कुणी तिरक्या नजरेनें बघतो, कुणी मला पाठमोरी बघतो; तर कुणी नुसतं माझ्या मंगळसूत्राकडेच बघून निराशेनें मुस्कारे टाकतो !

जाऊं द्या ! कोळसा उगाळावा तेवढा काळाच ! पुरुषांचा चावटपणा किती म्हणून सांगावा ? मला वीट आला म्हणून इथंच थांबतें.

मंत्री

ऐरावत रत्न थोर, त्यासी अंकुशाचा मार ।
लहानपण दे गा देवा, मुंगी साखरेचा रवा ॥

अहाहा ! किती खरं आहे हें ? धन्य तुकाराम महाराज ! विसाव्या शतकांत निर्माण होणाऱ्या आम्हां मंत्र्यांना उद्देशूनच तर त्यांनीं ही भविष्यवाणी वर्तविली नाहीं ना ? (म्हणून तर आम्हीं त्यांची गाथा प्रसिद्ध केली आहे.) लोकांना आमच्या यातना काय ठाऊक ? नुसती टीका करायला पाहिजे. मंत्री व्हा म्हणजे कळेल. माघारींच याल चटकन् ! पूर्वी तुरुंगांत जाण्यापासून तों हल्लीं एखाद्या तुरुंगाचें उद्घाटन करण्यापर्यंत आम्हांला अनेक कामें करावीं लागतात.

आतां दोनतीन माणसें येऊन गेलीं ना, त्यांनीं मला त्यांच्या शाळेच्या वार्षिक समारंभासाठीं अध्यक्ष म्हणून बोलाविलें. मीं त्यांना खूप सांगून पाहिलें परंतु ऐकेनातच ! बरं, लोकनियुक्त मंत्री म्हटला कीं, लोकांत मिसळलंच पाहिजे. मी तर स्वतःला जनतेचा सेवकच म्हणवून घेतों. परंतु लोकच माझी सेवा कां करतात कुणास ठाऊक ? शाळेंत मी दणदणीत भाषण केलें, ' मुलं म्हणजे राष्ट्राचे भावी आधारस्तंभ आहेत. उत्तम नागरिक तयार करणें हें प्रत्येक शिक्षकाचें पवित्र कर्तव्य आहे. शिक्षणाचें पवित्र आणि उदात्त कर्तव्य बजावीत असतांना शिक्षकांनीं पगारवाढीसारख्या मर्त्य प्रश्नाकडे लक्ष न देतां निष्कामबुद्धीनें ज्ञानदानाचें कार्य करावें. वसिष्ठ, सांदीपनी, द्रोणाचार्य,

कृपाचार्य, दादोजी कोंडदेव इत्यादि महान् व्यक्तींनीं पगारवाढ, महागाईभत्ता, इत्यादि बाबतींत युनियन, लवाद, संप इत्यादि अपमार्गांचा अवलंब केल्याचा उल्लेख महाभारतांत किंवा दुसऱ्या कोणत्याहि पुराणांत नाहीं. म्हणूनच त्यांच्या हातून राम, कृष्ण, पांडव, शिवाजी यांच्यासारखे वीर पुरुष निर्माण झाले. वरील पुरुषांपैकीं शिवाजी युगप्रवर्तक नव्हता एवढी गोष्ट सोडली तरी इतर पुरुष तरी मोठे होऊन गेले ना ? शिक्षकांनीं वरील ऋषींची महान् परंपरा चालवावी ! ' वरील आशयाचें भाषण झाल्यावर मीं नको नको म्हणत असतांनाही ' चहा–पान ' या साध्या नांवाखालीं आकंठ खाणेंपिणं झालं. देशांतील अन्नपरिस्थिति मुळींच समाधानकारक नसल्यामुळें ' चहापान ' करतांना माझं अंतःकरण तिळतिळ तुटत होतं. पार्टी चालू असतांनासुद्धां मीं अन्नधान्याच्या परिस्थितीवरच चर्चा करीत होतों.

शाळेंतला समारंभ आटपून घरीं येतों न येतों तोंच ' अ. धा. पि. ' मोहिमेचें कार्य दत्त म्हणून हजर ! दुसरे दिवशीं एका खेडेगांवीं माझ्या हस्तें धान्य पेरण्याचें उद्घाटन होणार होतें. मोटारीनें आम्हीं त्या खेड्यांत पोहोंचलों. परंतु खेडें चार फर्लांग दूर असतांनाच मोटार पंक्चर झाली. मग मी माझ्या सहकाऱ्यांसह–हो, मी माझ्या हाताखालच्या नोकरांना सहकारीच म्हणतों–तब्बल चार फर्लांग तस्सा चालत गेलों. धरतीमातेवर चालत जाण्यांत कसली आली आहे लाज ? बापूजीसुद्धां नव्हते का चालत ? लगेच फोटोग्राफर्सचा ' क्लिकाक्लिकाट ' सुरू झाला. गांवीं पोहोंचल्यावर मीं मुद्दाम दहा मिनिटें शेतावरून नांगर फिरविला आणि लगेच धान्य पेरलेंसुद्धां. नको नको म्हणत असतांनाहीं फोटोग्राफर्सनीं फोटो घेतलेच ! आमच्या पक्षाच्या वर्तमानपत्रांनीं ते मागाहून कौतुकानें पहिल्या पानावर छापले. मात्र विरोधी वर्तमानपत्रांनीं त्यांचें व्यंगचित्रांत रूपांतर करून पहिल्या पानावरच छापले. मला प्रसिद्धीची आवड नसतांना हे लोक असें कां करतात कुणाला ठाऊक ? मी हाडाचा शेतकरी आहें. नांगर धरण्यानें मीं विशेष कांहीं केलें असें मला मुळींच वाटत नाहीं. मला नांगर हातांत धरायला आणि माझ्या बायकोला तांदूळ सडण्यासाठीं हातांत मुसळ धरायला मुळींच लाज वाटत नाहीं. लोकांच्या प्रेमानें मंत्री झालों म्हणून काय झालें ?

समाजांतील प्रत्येक घटकानें, मग तो शहरांतील असो किंवा खेड्यांतील असो, दररोज दहा मिनिटं तरी नांगर फिरवलाच पाहिजे. तरच आपण अन्नधान्याच्या बाबतींत येत्या वर्षीं स्वयंपूर्ण होऊं ! व्याख्यानांत वरील मुद्दा खणखणीतपणें मांडल्यावर खेडुतांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. एका विरोधी वर्तमानपत्रानें या टाळ्यांच्या बाबतींत असं छापलं होतं कीं, मामलेदारानें या खेडुतांना मंत्र्याचें भाषण चालू असतांना दणकेबाज वाक्क्यानंतर लगेच टाळ्या वाजविण्याची अगाऊ सूचना (कीं ताकीद ?) देऊन ठेविली होती. ' परंतु आमच्या प्रसिद्धी खात्यानें या बाबतींत योग्य ती चौकशी करून वरील गोष्टींचा इन्कार केला आणि खेडुतांच्या टाळ्या स्वयंस्फूर्त होत्या असें प्रसिद्ध केलें. वरील भाषण संपल्यावर मी परिवारासह शेतांतून हिंडत असतां एका म्हाताऱ्या बाईला लांकडांची मोळी उचलतां येईना म्हणून मी जातीनें जाऊन तिची मोळी उचलूं लागलों. तेव्हां ती बाई गहिंवरून मला म्हणाली, ' अरं बाबा, तूंबी पुन्याच्या टिळक बामनावानी गरिबाचा कैवारी हायस बग !' तेव्हां, मीं 'टिळक बामन कोण हें मला माहीत नाहीं. मीं गांधीजींचा माणूस आहें.' असा खुलासा केला. आतां तुम्हीच सांगा, टिळक काय थोडे आहेत ? केसरीवाले टिळकच ! पोल्ट्रीवाले टिळकच ! कविता करणारे टिळकच ! इतकेंच काय माझ्या ओळखीचा एक टिळक मराठी पहिलीवर मास्तर आहे नि दुसरा टिळक खाणावळींत वाढपी आहे. जाऊं द्या. किरकोळ माणसांची नामावळी देण्याचें हें स्थान नव्हे. बापूजींच्या एका नांवांत देशांतल्या पस्तीस कोटि माणसांचीं नांवें आलीं.

शेतकीचें उद्घाटन आटपून परत येतों तों दुसरे दिवशीं एका हॉटेलच्या पायाभरणी समारंभास उपस्थित राहण्याचें निमंत्रण आलें. हॉटेलचे मालक म्हणाले, ' तुम्ही राष्ट्राचे पाया घालणारे मंत्री आहांत; तेव्हां आमच्या हॉटेलाचा पायाभरणी समारंभही तुमच्या हातूनच झाला पाहिजे.' मला त्यांच्या प्रेमासाठीं जाणं भाग पडलं. माझं टोपणनांव आप्पासाहेब आहे. मुंबईतील कांहीं नियतकालिकांचे खवचट संपादक मला, ' आप्पासाहेब दगडेश्वर ' या नांवानें संबोधून माझ्या पायाभरणी समारंभाची टर उडवतात. हीं मराठी पत्रें माझी आणि माझ्या सहकारी मंत्र्यांची अशीच नेहमीं टिंगल करतात.

आणि आमच्यावर टीका करतात. म्हणून तर आम्हीं ते काय छापतात हें तपासण्यासाठीं खास दोन अधिकारी नेमले आहेत. असो.

हें एक पत्र पहा. हें एका जिल्ह्याच्या ठिकाणापासून सात आठ मैल लांब असलेल्या एका खेड्यांतील विरुद्ध पक्षाच्या कार्यकर्त्यांचें आहे. त्यानें लिहिलें आहे. 'मंत्री महाराज, आपण जवळ जवळ बारा महिने दौऱ्यावरच असतां. तर एकदां आमच्या गांवीं पायधूळ झाडा कीं! आपल्या शुभागमनाच्या निमित्तानें कां होईना, लोकलबोर्ड आमच्या गांवापासून जिल्ह्याच्या गांवापर्यंत सडक तयार करील. अर्जविनंत्यांसाठीं आजपर्यंत जवळ जवळ एक रीम कागद संपले आहेत. कागदाची टंचाई लक्षांत घेऊन कां होईना आपण एकदां आमच्या गांवास भेट द्यावी.' ब्रिटिश सरकार असतें तर असल्या टोमणेबाज पत्राचा काय परिणाम झाला असता हें तुम्हांला माहीतच आहे. परंतु आम्हीं त्यांना पत्र पाठवून सोबत आमची खेड्याखेड्यांतून सिमेंटच्या रस्त्यांचें जाळें पसरविण्याची पंचवार्षिक योजनाही पाठवून दिली. इतकेंच काय, मंत्रीपदाचें काम आणि जागा अत्यंत खडतर असूनही आम्हीं त्यांना प्रतिज्ञापूर्वक कळविलें आहे कीं, सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्यांचें काम पूर्ण झाल्यावांचून मी माझें मंत्रीपदच सोडणार नाहीं. माझ्या या प्रतिज्ञेला उद्देशून एका विरुद्ध पक्षाच्या वर्तमानपत्रानें लिहिलें कीं, 'लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकून मंत्रीपदाचा जास्तींत जास्त उपभोग घेण्याचा हा डावपेंच आहे. आगामी निवडणुकी लांबणीवर टाकण्याचाही हेतु यांतून स्पष्ट दिसतो! परंतु या मंत्र्यांना आतां खालीं ओढण्याची वेळ आली आहे!' आतां तुम्हीच बघा, हें लिखाण Violent नाहीं काय? कावीळ झालेल्या माणसाला प्रत्येक गोष्ट पिवळीच दिसावी त्याप्रमाणें विरोधी पक्षाला मंत्र्यांचें बोलणं, चालणं, योजना इत्यादि सगळ्या गोष्टी आम्ही आत्मभोगाच्या लालसेनेंच करीत आहोंत असें वाटतें. परंतु आमचं विरोधकांना असं सांगणं आहे कीं, त्यांनीं मंत्रीपदाला योग्य अशीं माणसं आणावींत; आम्ही आत्तां खुर्च्या खालीं करतों आणि आमची 'मिनिस्टर्स अँड कंपनी' लिक्विडेशनमध्यें काढतों. परंतु या अफाट देशांत या पदाचा कांटेरी मुकुट धारण करायला धजणारीं माणसंच नाहींत. म्हणून तर आम्हांला पूर्वायुष्यांत तुरुंगाचे खडतर हाल ('अ' वर्गाचे) सोसूनहि या उतारवयांत मंत्रीपदाचें ओझें सहन

करावें लागत आहे. लोकांची नैतिक पातळी वाढविणें हें आमचें ध्येय आहे आणि तें आम्ही पार पाडणारच !

प्रजेची नैतिक पातळी वाढविण्यासाठीं आम्हीं दारूबंदी केली; द्विभार्याप्रतिबंधक कायदा करून सर्व पुरुषांना एक एक बायको करण्याची समान संधि दिली; प्रांताप्रांतांत लठ्ठालठ्ठी होऊं नये म्हणून भाषावार प्रांतरचनेची योजना आम्हीं सद्हेतूनें थोपवून धरली; परराष्ट्रांत वकिलांच्यामार्फत आमच्या आध्यात्मिक बलाचें सामर्थ्य व्याख्यानांतून आणि चहापाट्यांतून पटवून दिलें; लोकमताला मान देऊन नातलगांना दिलेलीं कंत्राटें रद्द केलीं; युगप्रवर्तक लोकांची लांबलचक यादी काटछाट करून अवघ्या एका माणसावर आणून ठेवली; एक कीं दोन ? नानाप्रकारच्या सुधारणा, राष्ट्रसेवा आणि जनसेवा नित्यशः होत असते. परंतु हे लेकाचे विरोधी पक्षाचे लोक आमच्या कार्यावर नेहमीं अक्षरशः पाणी ओतीत असतात. माझं तर स्पष्ट मत आहे कीं, देशांत नेहमीं 'एकपक्षीय' लोकशाही असावी. (आणि तीही आमच्या पक्षाचीच !)

अरे हो ! विसरलोंच मी ! हे दौरे, उद्घाटन समारंभ, पायाभरणीसमारंभ, सत्कारसमारंभ, इत्यादि भानगडींतून मला सेक्रेटरीएटमध्यें जाऊन माझ्या खात्याचें काम करायला हल्लीं मुळींच सवड झाली नाहीं. येत्या निवडणुकींत मलाच पुन्हा निवडून देणाऱ्या माझ्या प्रिय प्रजाजनांनो, आतां मला सेक्रेटरीएटमध्यें एक चक्कर मारून आलंच पाहिजे. म्हणून मी माझी कैफियत इथंच थांबवितों.

∞ ∞ ∞

अंधार

'तमसो मा ज्योतिर्गमय' असं उपनिषदांत सांगणारे सज्जन ऋषी मागंच होऊन गेले. आजकाल माझा शत्रु जो उजेड याच्यापेक्षां मीच सर्वांना अधिक आवडूं लागलों आहें. अंधार म्हटलं कीं चोर खूष ! प्रेमिकजन खूष ! कर्जबाजारी खूष ! मवाली खूष ! काळाबाजारवाले खूष ! सगळेच खूष ! नाहींतर लेकाचा उजेड ! कांहींही करायची चोरीच !

उजेड नेहमीं दगा देतो. चोरांना दगा देतो, प्रेमिकांना दगा देतो. इतकंच काय देशालासुद्धां दगा देतो. म्हणून तर युद्धकालांत सरकार ब्लॅकआऊट जारीनें करतें. मी फार पक्का नि हुशार आहें. माझ्या आवरणाखालीं चोरांची नि मालकांची गांठ पडायची नाहीं. प्रेमिकांचा ठावठिकाणा त्यांच्या आईबापांना लागायचा नाहीं. ऋणको धनकोला धक्का मारून गेला तरी कळायचं नाहीं. सगळं कांहीं चुपचाप ! सर्वांच्या आवश्यक गांठीभेटी आणि ताटातुटी मी सेयिस्करपणें घडवून आणतों. नाहींतर बावळट लेकाचा उजेड ! त्याचं अस्तित्व असतांना ' त्या ' नं ' ति ' च्या तोंडापाशीं तोंड न्यावं तोंच कुणीतरी वडील माणसांनीं बघितलंच म्हणून समजावं. बरी मजा आहे. माझा शत्रु बावळट आहे म्हणून तर मला भाव आहे, कांहीं माणसांनीं तर, 'कठिण समय येतां कोण कामास येतो ? ' यांत ' कठिण समय येतां ' कोन ' कामास येतो. ' अशी थोडीशी दुरुस्ती केली आहे. कोन म्हणजे कोपरा. घराच्या कोंपऱ्यांत माझें वास्तव्य ठेवलेलेंच आहे. म्हणून ' कठिण ' प्रसंगीं लपण्यासाठीं कोनच कामाला येतो.

माझें वास्तव्य सर्वत्र आहे. बहुतेक माणसांच्या जीवनांत आणि बहुतेक घरांच्या जिन्यांत मी बहुधा असतोंच. कांहीं माणसं आपल्या जीवनांत उजेड आल्याच्या बाता मारतात परंतु तें सगळं खोटं आहे. जीवनांत उजेड आलेला नसून जीवन उजाड झालेलें असतें त्यांचें.

चला माझ्याबरोबर म्हणजे एक एक गंमत दाखवितों.

हे चाळींतले नळ आणि जिने बघा, इथले दिवे लागतच नाहींत कधीं. मालकाला इथं नवे दिवे लावण्याची इच्छा होत नाहीं आणि, कां कुणास ठाऊक, बिऱ्हाडकरूही या बाबतींत कांहीं कुरकूर करीत नाहींत.

हीं बागेंतील दृश्यें पहा. नुसती हवा आणि भेळ खायला आलेलीं माणसं दिवसा उजेडींच परत गेलीं. परंतु ज्यांना आणखी महत्त्वाचं काम होतं अशी मंडळी ' जोड्यां ' नीं माझ्या आवरणाखालीं गुलगुल गोष्टी करीत बसलीं आहेत. सध्यांच्या गजबजलेल्या वस्तीमुळें नि घरांतील भरगच्च लोकसंख्येमुळें नूतन विवाहित दांपत्यांना बाग, हिरवळ, चौपाटी, टेकडी इत्यादि ठिकाणींच माझ्या आवरणाखालीं आश्रय घ्यावा लागतो.

आतां या गृहस्थाकडे पहा. गृहस्थ कसला ? गृहच नाहीं त्याला. सतरा पिंपळावरचा मुंज्या आहे. स्वारीचा लोकांना टोप्या घालण्याचा धंदा आहे. देणेकरी फार वाढले कीं, दिवसाचा तो कुठंतरी अज्ञात ठिकाणीं झोंपून राहातो आणि रात्रीच्या वेळीं, भूमिगत पुढाऱ्याच्या सावधगिरीनें, माझ्या प्रेमळ छत्राखालीं फिरतो. एकदां एका सावकाराला रस्त्यांत त्याचा धक्का लागला परंतु सावकारच आपण होऊन ' सॉरी ' म्हणून निघून गेला, अजूनसुद्धां हा माणूस एकदांही आपल्या सावकाराच्या तावडींत सांपडला नाहीं. अर्थात् माझ्या आवरणामुळेंच !

चोरांच्या बाबतींतही तोच अनुभव. शर्विलक, अलीबाबा प्रभृति युगप्रवर्तक चोरांपासून दोरीवर वाळत टाकलेला जुना टॉवेल पळविणाऱ्या भुरट्या चोरांपर्यंत बहुतेक स्वकर्मकुशल चोर आपलीं कामें रात्रीं माझ्या सहकार्यानें आटपून घेतात. हल्लीं गर्दीच्या शहरांतून दिवसाउजेडीं चोरी करण्याची टूम निघाली आहे. परंतु या चोरांना शेवटीं ' अंधारकोठडीं 'तच यावें लागतें.

कोणताही काळाबाजारवाला घ्या. तो आपल्या मालाची आयात निर्यात आणि खरेदीविक्री दिवसा कधीं करणार नाहीं. त्याला उजेडाचा अवसानघातकीपणा आणि माझा सुरक्षितपणा याची नक्की जाणीव आहे. इतकंच काय माझ्या सहकार्याबद्दलची कृतज्ञता म्हणून त्यांनीं आपल्या बाजाराला माझ्या रंगाचें स्मारक म्हणून ' काळा बाजार ' असें नांव दिलें आहे. मीही कृतज्ञतेनें त्यांना भरपूर पैसा मिळवून देतों. व्यवहारांत ही देवाण–घेवाण असलीच पाहिजे.

चला आतां सिनेमाच्या थिएटरांत. इथं तर माझ्यावांचून चालणारच नाहीं. सिनेमा सुरू झाल्यावर तुम्हीं चांचपडत राखीव किंवा रिकामी जागा हुडकीत असतांना ' कुणाला ' ही चुकून धक्का मारावा किंवा हात लावावा आणि मुद्दाम केलेली ही क्रिया चुकून झाली असें भासविण्याकरितां ' सॉरी ' म्हणावें नि सरळ पुढें जावें. गुन्हा माफ ! थिएटरमधील माझ्या आवश्यक अस्तित्वाचा फायदा किती तरी कायदेशीर आणि बेकायदेशीर जोडपीं घेत असतात. किती तरी उदयोन्मुख धूम्रप्यांनीं इथें माझ्या आवरणाखालीं आपली तलफ भागवून घेतली आहे. (अरेरे ! सरकारला हेंही पहावलं नाहीं ! त्यानें थिएटरांत विड्या फुंकायला बंदी करून टाकली हं !)

ही पाहिलीत का गंमत ? आहे थोडी चावटपणाचीच ! परंतु प्रत्यक्ष घडत आहे तर दाखवायला काय हरकत आहे ? हे गृहस्थ माझ्या आसऱ्यानें चालले आहेत. हे कोण माहीत आहेत ? हे मोठे कार्यकर्ते असून अनेक संस्थांमध्यें विविध नात्यांनीं काम करतात. हो !

परंतु 'या बोळांत' कां ? हा बोळ कसला आहे तें माहीत आहे ना ? इथं 'त्या' राहात असतात. दिवसाउजेडी सभ्य म्हणून मिरवणारा हा गृहस्थ रात्रीं माझ्या आवरणाखालीं किती सफाईदारपणें वांकडीं पावलें टाकतो पहा ना ! पुन्हा सकाळीं परत सभ्यच !

भूमिगत पुढाऱ्यांना आणि हद्दपार गुन्हेगारांना तर माझ्यासारखा परम मित्र कोणीच नाहीं. त्यांच्या खडतर जीवनाला माझ्यामुळेंच विरंगुळा मिळतो. ही मंडळी दिवसा चुकून जरी बाहेर पडली तर हटकून सांपडलीच म्हणून समजा.

अरेच्या ! हें काय ? सकाळचे सहा वाजायला झाले. आतां सूर्य उगवेल. मला स्वतःलाच आतां अंडरग्राउंड झालं पाहिजे. सूर्य मला आज कित्येक हजारों वर्षें हुडकीत आहे; परंतु अद्यापपर्यंत मी त्याला सांपडलों नाहीं. बसूं दे त्याला हुडकीत. आतां मी माझी कैफियत इथंच थांबवितों.

∞ ∞ ∞

बागेंतील बांक

म्युनिसिपालिटीच्या सार्वजनिक बागेंतील मी एक साधासुधा लांकडी बांक आहें ! मीं काय कैफियत सांगणार ? माझ्याजवळ सांगायला काय आहे असं तुम्हांला वाटेल ! परंतु आहे ! बरंच आहे सांगण्यासारखं. ऊन, थंडी, पाऊस या नैसर्गिक आपत्ती आणि प्रचंड मानवी धूडांचें वजन सहन करण्याची मानवी आपत्ति मला नित्य सहन करावी लागते.

तो पहा समोरून एक लठ्ठ पारसी, आपल्या शिरीनच्या हातांत हात घालून, माझ्याकडे येत आहे. दोघांची पन्नाशी उलटलेली आहे, परंतु यांची गंमत कशी अगदीं पंचाविशींतल्या तरुणाप्रमाणें चालली आहे. बसलीं आतां दोघेंजणं

माझ्यावर. थोडा वेळ बसतील, मेळ खातील आणि जातील मग कमरेभोंवतीं हातांचा विळखा घालून.

थोड्याच वेळांत एक कारकुनाचें जोडपें आपल्या सहा मुलांच्या परिवारासह माझ्या आश्रयास येऊन बसेल. कारकून दिवसभर ऑफिसमध्यें कागदाची नासाडी करून दमून घरीं आला म्हणजे चारसहा दिवसांआड करून बागेंत येतो फिरायला बायकांमुलांसह. बोलण्याचा विषयही ठरलेला आहे नवराबायकोचा. विषय नाजूक आहे थोडासा ! बायकोचं म्हणणं आहे कीं, आतां यापुढं "पुरे !' तर नवऱ्याचं म्हणणं आहे कीं, 'घर कसं गोकुळासारखं भरलेलं असावं !' यावर बिचारी बायको काय करणार ? प्रत्येक खेपेला प्रसूतिगृहाकडे जातांना ती मनांत म्हणते, 'परमेश्वरा, प्रसूतिगृहाकडे जाण्याची माझी ही शेवटचीच खेप ठरो !' आणि दुर्दैवानें प्रत्येक खेपेला तिच्यावर हेंच वाक्य म्हणण्याची पाळी येते. उठलें हें जोडपें ! न उठून काय करणार ? मध्यमवर्गीय जोडपं आहे हें ! घरीं जाऊन पत्नीला स्वयंपाकपाणी सारं करायचं आहे.

हं ! आतां मात्र गंमत आहे. समोरून एक तरुण जोडपं येतं आहे. तीं एकमेकांचे कोण आहेत हें अजून ठरायचें आहे. ऐका तीं काय म्हणतात तें, 'इंदु, गिरगांवांतून मीं मुद्दाम किंग सर्कलची बाग पसंत केली. इतक्या लांब आपल्या ओळखीचं कोणी भेटणार नाहीं.' परंतु त्यावर ती इंदु म्हणते, 'तूं झालास रे निर्धास्त ! परंतु जवळच ब्राह्मणवाड्यांत माझी मावशी राहते ना. ती जर इकडे चुकून आली तर माझा बोऱ्या वाजेल !' परंतु त्या तरुणानें ती मावशी येणार नाहीं असं सांगितलं आणि त्या पोरीला थोड्या वेळांत तें पटलंही ! नंतर तो तरुण म्हणतो, 'इंदु, माझं तुझ्यावर प्रेम आहे नि तुझं माझ्यावर आहे; मग आपण लग्न कधीं करूं या ? (हीं वाक्यं आतां मला तोंडपाठ झालीं आहेत.) नंतर ती मुलगी आपण लग्न करायला केव्हांही एका पायावर तयार असल्याचें सांगते आणि वचन देण्यासाठीं त्याच्या हातावर हात ठेवते. तो तरुण तो हात तसाच कांहीं वेळ दाबून ठेवतो. नंतर तीं दोघें उठून जाऊं लागतात. जातांना, गिरगांवांत गेल्यावर निरनिराळ्या वेळेला बिल्डिंगमध्यें पोहोंचण्याचें ठरतें. कारण एकदम तीं गेलीं तर लोकांना संशय येईल. अरेरे !

मोकळेपणानें प्रेम करायलासुद्धां मुंबईत जागा मिळूं नये हं ! नगरपालिका इकडे लक्ष देईल काय ?

अंधार पडूं लागला. आतां ही भानगड आली काय ? करतां काय ? आलीया भोगासी असावें सादर ! बसली कीं ही माझ्या पाठीवर येऊन. ही म्हणजे ' ही ! ' (या ठिकाणीं वाचकांनीं आपल्या नाकावर एका बोटाची हळूच टिचकी मारून डोळे मिचकवावेत.) ही बसल्यावर हिचे प्रियकर झालेच गोळा ! उजेडाचे सभ्य दिसणारे लोक ' त्या ' बांकाकडे (म्हणजे माझ्याकडे) जणूं कांहीं पहातच नाहीं अशा अभिनिवेशानें आसपास घुटमळत होते; परंतु त्यांना तिच्याजवळ जाण्याचें धाडस होत नव्हतें. (संस्कृति आणि नीति माणसांच्या भावनेचा कोंडमारा करते याचें हें घ्या जळजळीत उदाहरण !) इतक्यांत ' आरोरा 'च्या आसपास फिरणारा एक वीर तिच्याकडे आला आणि बेधडकपणें तिच्या शेजारीं बसला. संस्कृति–विस्कृतीच्या भानगडी तो न पाळणारा आहे. घामट कपडे, केसांचें न विंचरलेलें जंगल, तोंडांत ' नंबर टेन ' अशा थाटांतला तो प्रियकर बघून तिची कळी खुलली. कां नये खुलूं ? तिला प्राप्ति होते ती असल्या लोकांपासूनच ! हा येऊन बसायच्या अगोदरचीच एक गंमत सांगतों तुम्हांला. एक सभ्य परंतु वयांत आल्यामुळं कससंच वाटूं लागलेला पोरगा तिच्या आसपास घिरट्या घालीत होता. तिनं त्याच्याकडे पाहून 'शुक' केलं. तेव्हां तो पोरगा घाबरला आणि आपल्याला कोणी पहात नाहीं ना हें चटकन् घाईघाईनें पाहून त्यानें पोबारा केला. ' ही ' आणि तिचा प्रियकर यांचा अचकट विनोद आणि ग्राम्य गप्पा चालू आहेत. मी एवढा लांबरुंद असून आगगाडींतील तिसऱ्या वर्गाच्या बांकावर बसल्याप्रमाणें तीं दाटीवाटीनें बसलीं आहेत. तीं कधीं उठणार आहेत कुणाला ठाऊक !

हं ! हे दोन पेन्शनर आलेच ठरलेल्या नित्य नियमाप्रमाणें ! संस्कृति कुठं कुठं ढांसळून पडते हें पहाण्याचें काम हे दोघे करतात. म्हणून यांच्या नजरेंतून वरील दृश्य सहसा सुटत नाहीं. उपरण्यानें चष्मे साफ करून अंधारांतही ते त्या सवग प्रणयलीला बघतात. वरून संस्कृतीच्या अधोगतीच्या गप्पा मारीत, वळून वळून बघत आणि कसल्याशा गोळ्या तोंडांत टाकीत ते निघून जातात. हा कार्यक्रम नेहमींचाच आहे.

आतां रात्रीचे दहा वाजले. घरांत उकडतं म्हणून एक गुजराती माणूस घरची गादी आणि मादी सोडून माझ्या पाठीवर येऊन आराम करतो. चंपीवाला येऊन मालीस करून जातो. मालीस करतां करतां गुजराल्याला डुलकी लागल्याची संधि साधून चंपीवाल्यानें त्याचें पैशांचें पाकीट एकदोन वेळां लंपास केलें आहे.

माझ्या वरच्या भागावर या मानवी भानगडी होत असतात आणि माझ्या खालच्या भागांत कुत्र्यानें आपलें बिऱ्हाड थाटलें आहे. बऱ्याच बाबतींत तोही माणसांचें अनुकरण करीत असतो.

मित्रहो, आणखी पुष्कळ गोष्टी सांगतां येण्यासारख्या आहेत. परंतु याच गोष्टी अश्लील ठरतील कीं काय याची भीति वाटते. भानगडी करण्यापेक्षां त्या निवेदन करणें जास्त अनैतिक आहे असा सभ्य (!) माणसांचा नियम आहे म्हणे ! म्हणून मी माझी कैफियत इथंच थांबवितों.

प्रश्नोपनिषद्

सर्वांत सुखी कोण ?

—श्रीमंताची किंवा अधिकाऱ्याची बायको ! कारण कोणतेहि शारीरिक किंवा बौद्धिक श्रम न करतां आरामशीर कोचावर लोळून, रेडिओ ऐकत ऐकत दुपारच्या वेळीं विजेच्या पंख्याच्या सुखद वाऱ्याखालीं मस्तपैकीं झोंप काढण्याचें भाग्य हिच्याशिवाय कोणाच्याच नशिबीं नसतें. या सुखाचा निर्माता जो तिचा नवरा त्यालासुद्धां दुपारच्या वेळीं कामधंद्यानिमित्त बाहेर जावेंच लागतें.

सर्वांत दुःखी कोण ?

मिळवत्या बाईचा बेकार नवरा ! कारण नोकरीच्या खटपटीसाठीं कुठं जायचं म्हटलं तर गाडीभाड्याचे पैसेसुद्धां त्याला लाचार होऊन बायकोजवळूनच मागून घ्यावे लागतात.

सर्वांत परोपकारी कोण ?

—लोकाग्रणीचे आईबाप ! आपण देशाला काय मौल्यवान चीज देत आहोंत याची त्यांना पुत्राला जन्म देतांना कल्पनाही नसते.

अविवाहित आणि विवाहित यांच्यांत कमी दुःखी कोण ?

—अर्थात् अविवाहित ! कारण त्याचें दुःख अतृप्तीचें असलें तरी तें बिनखर्चीं असतें; आणि विवाहितांचें दुःख दिवसेंदिवस अधिकाधिक खर्चाचें होत जातें.

खरा मुत्सद्दीपणा कशांत आहे ?

—नैतिक पाठिंबा देण्यांत ! कारण नैतिक पाठिंबा ही चीज निराकार असल्यामुळेंच तिचें कसलेंच मूल्यमापन कोणालाही आणि केव्हांहि करतां येत नाहीं.

धरणीकंपाची छोटी आवृत्ति कोणती ?

—बायकोचा राग !



मंत्री आणि पुढारी नेहमीं संदेशच कां देतात ?

—त्यांच्याजवळ द्यायला दुसरं कांहींच नसतं म्हणून !



पुढारी पत्रप्रतिनिधि-परिषद् कां बोलावितात ?

—स्वतःजवळ सांगण्यासारखं कांहींच नाहीं हें नीट समजावून सांगण्यासाठीं.



आयुष्यांत एकदांच घडणारी गोष्ट कोणती ?

—मृत्यु ! कारण दुसरी कोणतीही गोष्ट एकापेक्षां अधिक वेळां घडणें संभवतें.



लग्नाड बोलण्याचें योग्य वय कोणतें ?

—खरं बोलून भागत नाहीं हें स्वानुभवानें नक्की जेव्हां कळूं लागेल तें.



पत्नीचें खरेंखोटें रागावणें कसें ओळखावें ?

—गाल फुगविले कीं खोटं रागावली म्हणून समजावें; आणि मोडतोड, आदळआपट सुरू झाली कीं खरोखर रागावली असं समजावं.



कादंबरींतील बहुतेक नायिका मोटारींतूनच कां हिंडतात ?

—कादंबरींतील मोटारींना लेखकाच्या वशिल्यानें बहुतेक पेट्रोलच्या परमिटची आवश्यकता लागत नसावी.



जगांत नेहमीं सगळ्याच गोष्टी चांगल्या होऊं लागल्या तर काय होईल ?

—जगाची प्रगति थांबेल. कारण प्रगति ही नेहमीं वाईट गोष्टींचा प्रतिकार करण्यासाठींच होत असते.

आधिभौतिकता श्रेष्ठ कीं आध्यात्मिकता श्रेष्ठ ?

—अर्थात् आध्यात्मिकता श्रेष्ठ ! कारण तिची श्रेष्ठता आधिभौतिक साधनांनीं कधींच मोजतां येत नाहीं, ही दांडगी सोय आहे. म्हणून तर आपल्या शहाण्या पूर्वजांनीं आध्यात्मिकतेचींच स्तोत्रें गाइलीं; आणि आजकाल आपल्या मंत्र्यांना आणि पुढाऱ्यांना उठल्यासुटल्या आध्यात्मिकतेचा पुळका येतो, यावरून तर तिची श्रेष्ठता नक्कीच पटते.



खरं बोलणं हा गुण कीं दोष ?

—स्वतःच्या तोट्याच्या वेळीं खरं बोलणं हा दोष असून दुसऱ्याचें नुकसान करतांना खरं बोलणं हा गुण आहे.



कांहीं लोक पुढारी कां होतात ?

—दुसरा कोणताच व्यवसाय करायला जमत नाहीं म्हणून.

सार्वजनिक फंड कसा चुकवावा ?

—घरीं फंड वसूल करायला आलेल्या लोकांना सांगावें कीं, ' ऑफिसांत कालच एका कार्यकर्त्यानें आमच्याकडून पैसे वसूल करून नेले. ' आणि ऑफिसांत कोणी वसुलीला आल्यास त्याला हीच थाप घरच्या पत्त्यानें मारावी. मात्र दोन्ही वेळां पावती अनुक्रमें ऑफिसांत किंवा घरीं राहिली अशी दुसरी थाप मारायला विसरूं नये.



चाळींतलें सर्वांत महत्त्वाचें ठिकाण कोणतें ?

—नळ ! कारण नळाइतकीं भांडणें आणि चोरटीं प्रेम-प्रकरणें चाळीच्या कोणत्याही भागांत होत नाहींत.



नवरा फार रागावला म्हणजे काय करतो ?

—उपाशीच ऑफीसांत जातो.



बायको फार रागावली म्हणजे काय करते?

—दोघांचेंही जेवण एकटीच फस्त करते.



आरसा नसता तर काय झालें असतें?

—पुष्कळ सुंदर स्त्रियांना आपल्या सौंदर्याची कल्पना आली नसती आणि अनेक कुरूप स्त्रियांनीं आपण देखण्या आहोंत अशी गैरसमजूत करून घेतली असती.



जीवनांत संगीताचें स्थान कोणतें?

—रडण्याच्या थोडेंसें वरचें!



उच्च वाङ्मय कोणतें?

—जें वाचकांच्याच काय परंतु खुद्द लेखकाच्याही बुद्धीला पुन्हां वाचतांना आकलन न होण्याइतकें दुर्बोध असतें तेंच खरें उच्च वाङ्मय!



माणसें नेहमीं बोलतांना 'गाढव' हा शब्द कां वापरतात?

—'समानशीले व्यसनेषु सख्यम्!' याशिवाय दुसरें कारण काय असणार?



'गचांडी' या अर्थी 'अर्धचंद्र' हा शब्द कां वापरतात?

—गचांडी ही बहुधा अर्धवटांना चंद्रमुखीकडून मिळते; म्हणून या क्रियेच्या स्मरणार्थ हा शब्द रूढ झाला असावा.



'देणें' आणि 'घेणें' हीं दोन विरुद्ध अर्थाचीं क्रियापदें एकाच अर्थी कधीं वापरलीं जातात?

—चुंबनाच्या बाबतींत! कारण चुंबन दिलें काय नि घेतलें काय, कार्य आणि अर्थ एकच!

रस्त्यावर अपघात कां होतात ?

—बावळट माणसें वाहनांकडे 'बघत नाहींत' म्हणून; आणि तरुण माणसें पोरींकडे 'बघतात' म्हणून.

राष्ट्राचा दर्जा कधीं वाढतो ?

—बडबडणाऱ्या पुढाऱ्यांची संख्या कमी झाली म्हणजे !



लबाड बोलण्याच्या पुढची पायरी कोणती ?

—राजकारणांत पडणें.



पैशांचा मुख्य आणि दुय्यम उपयोग सांगा.

—या जगांत अन्न सोडल्यास पैसा ही एकच वस्तु खायचा पदार्थ म्हणून मुख्यतः ओळखली जाते; आणि 'देवघेवीचें साधन' हा पैशाचा दुय्यम उपयोग आहे.



स्वर्ग आणि नरक या गोष्टी खऱ्या आहेत काय ?

—मलबार हिल आणि धारावी पाहिल्यानंतर खऱ्या आहेत असें वाटूं लागतें.



कृतघ्नपणाचें एक नमुनेदार उदाहरण द्या.

—सिमेंट कॉंक्रीट ! ज्या सिमेंटमध्यें पाणी मिसळल्यामुळें तें अभेद्य होतें त्या पाण्यालाच तें सिमेंट पुन्हां सामाबून घ्यायला तयार होत नाहीं.



जगांत गाढव नसतें तर काय झालें असतें ?

—माणसांची विशेषणाच्या बाबतींत बरीच कुचंबणा झाली असती.



बायकांचें खरें वय कसें काढावें ?

—अशक्य आहे !

सा. शि. ... पुणे, वाचनालय शाखा.
नं. क्र. ४३५० दि .....

दांडगी भूक कोणाची ?

—साहित्यिकाची ! कारण त्यांना पोटाच्या भुकेशिवाय 'बौद्धिक' नांवाची एक भूक असते आणि ती भागविण्यासाठीं त्यांना आणखी एक पत्नीसुद्धां लागते.



बायकोला घेऊन सिनेमाला जाणें चांगलें कीं वाईट ?

—तिकिटें लौकर मिळण्याच्या दृष्टीनें चांगलें; परंतु सिनेमा चालू असतांना पडद्यावर चित्रांकडे नीट लक्ष लागत नाहीं. कारण पत्नी (आणि अंधार !)



खरा मूर्ख आणि खरा शहाणा यांत फरक काय ?

—खऱ्या शहाण्याला आपण कितपत शहाणे आहोंत हें नक्की कळतें; परंतु खऱ्या मूर्खाला आपण कितपत मूर्ख आहोंत हेंच समजत नाहीं.



लेखणी श्रेष्ठ कीं तलवार श्रेष्ठ ?

—लेखणी श्रेष्ठ ! कारण तलवारीनें एकावेळीं एकाचाच गळा कापतां येतो; उलट लेखणीच्या एका फटकाऱ्यानें हजारोंजणांचेसुद्धां बळी घेतां येतात



विद्वान् आणि बहुश्रुत यांच्यांतील फरक काय ?

—विद्वानांना थोड्या विषयांचें पुष्कळ ज्ञान असतें, आणि बहुश्रुताला पुष्कळ विषयांचें थोडें थोडें ज्ञान असतें.



कुणालाही माणुसकीचा उमाळा केव्हां येतो ?

स्वतःवर दुसऱ्यानें अत्याचार केला असतां तिसऱ्यानें येऊन आपल्याला वांचविलें नाहीं म्हणजे.



स्टेशनवर टाईमटेबल कां लावतात ?

—गाड्या किती उशीरा येतात हें नक्की कळावें म्हणून !



विवाहित स्त्री मंगळसूत्रावरून ओळखतां येते परंतु विवाहित पुरुष कसा ओळखावा ?

—चेहऱ्यावरून !

बायका केव्हां रडतात ?

—पुरुषांना रडविण्यांत अक्कास्वी झाल्या म्हणजे.

माणसाची व्याख्या काय ?

—देवांचे गुण आणि सैतानांचे दुर्गुण यांपासून बनविलेला घटक.

जिवश्च कंठश्च मित्र म्हणजे काय ?

—प्रसंग पडल्यास कंठ दाबून जीव घेणारा मित्र.

' लाथ मारील तिथें पाणी काढणाऱ्या' चं उदाहरण द्या.

—रागीट नवरा ! रागाच्या भरांत बायकोला लाथ मारल्यावर खळकन् तिच्या डोळ्यांतून पाणी काढतो.

गाढवाचा गीतेशीं संबंध आहे काय ?

—वाटेल तीं गाढव माणसें गीतेवर अकलेचे तारे तोडूं लागलीं म्हणजे संबंध आहे असें वाटूं लागतें.

ब्रह्मचर्य हा शाप कीं वर ?

—लग्न न होईपर्यंत शाप वाटतो; परंतु लग्न झाल्यावर मात्र पश्चात्बुद्धि या न्यायानें वर वाटूं लागतो.

मंत्रीपद म्हणजे कांटेरी मुकुट आहे काय ?

—होय ! पण आंतल्या बाजूनें मऊ मखमली गादी असलेला !

दरिद्री माणसाचें, मेल्यावर या जगांत शिल्लक काय राहतें ?

—कर्ज !



तरुणांची, मार्केटांत गेल्यावर भाजी खरेदी करण्याची पद्धत सांगा.

—तरुण पहिल्यांदा मार्केटांत या टोंकापासून त्या टोंकापर्यंत नुसती चक्कर मारतो; यावेळीं तो भाजी न बघतां पोरी किती आहेत हें पाहून घेतो. दुसऱ्या चकरेच्या वेळीं ज्या भाजीवाल्याजवळ मस्त पोरी भाजी घेत आहेत तिथं जाऊन भाजीचा नुसता भाव विचारतो. असें तीन चार ठिकाणीं केल्यावर (म्हणजे पोरी पाहिल्यावर) तिसरी चक्कर मारतो आणि एखाद्या आण्याची हातरुमालांत मावेल एवढी भाजी घेऊन जातो.



कला जीवनासाठीं असते काय ?

—मुळींच नाहीं. ! जेवणासाठीं असते. कारण जिच्यांतून दोन वेळचें जेवण सुटत नाहीं ती कलाच नव्हे !



आजचे लेखक वास्तववादी आहेत काय ?

—असं कोण लेकाचा म्हणतोय ? उलट प्रत्यक्ष जीवनांतील अपुऱ्या आशा काल्पनिक पात्रांच्या रुपानें मांडल्यामुळें जी सुखद अवास्तवता निर्माण होते त्यामुळेंच तर त्यांच्या लिखाणांचा खप होतो.



आजचें साहित्य लोकाभिमुख आहे काय ?

—नक्कीच आहे ! त्याशिवाय का इतकीं सवंग पुस्तकें निर्माण होतात ?



सुधारणेची आत्यंतिक परिसीमा कोणती ?

—माणसांनीं विवस्त्रावस्थेंत फिरण्याची पद्धत शिष्टसंमत आणि रूढ होणें.

हुंड्याची पद्धत असावी काय ?

—हो असली पाहिजे ! कुरूप मुलींचीं लग्नें व्हायला तेवढाच एकुलता एक आधार आहे.

'चूल आणि मूल' हेंच बायकांचें क्षेत्र आहे काय ?

—गेल्यांत फार तर बदल करतां येईल. परंतु दुसऱ्या बाबतींत ब्रह्मदेवाकडूनच रदबदली करून घ्यावी लागेल. माणसाच्या आवांक्याबाहेरचें काम आहे हें !

चप्पल हें शस्त्र आहे काय ?

—अनुभवी लोकांना माहीत. आम्हांला या बाबतींत अनुभव नाहीं.



वर्तमानपत्रें नसतीं तर काय झालें असतें ?

—रद्दीची चणचण तीव्रतेनें भासली असती.

तोंडमिळवणी म्हणजे काय ?

—चुंबन !

' इश्श ' या शब्दांत कांहीं अर्थ आहे काय ?


—अर्थ कांहीं नाहीं; परंतु रोमान्स् मात्र भरपूर आहे.

गुंड धर्मवीर कधीं बनतात ?

—दंग्याच्या दिवसांत.

दंग्यांतील अपघातांची संख्या कशी ओळखावी ?

—सरकारी पत्रकांतील संख्येला चारानें गुणून, किंवा अफवांना आठानें भागून !



श्रीमंत म्हाताऱ्याला अधिक काळजी कशाची असते ?

—तिसऱ्या लग्नाच्या सुंदर तरुण पत्नीच्या पातिव्रत्याची !



मंत्र्यांच्या दौऱ्यासंबंधीं दोन शब्द लिहा !

—फुकटचे पैसे !



वेश्या आणि अभिसारिका यांचें समूळ उच्चाटन कधीं होईल ?

—जगांतील सबंध पुरुषजात नष्ट झाली तरच !



न्हावी आणि ऑफिसर यांतील साम्य-भेद सांगा.

दोघेही हजामती करतात हें साम्य; मात्र एक खरोखरची हजामत करतो आणि दुसरा लाक्षणिक करतो एवढाच भेद.



गुप्त मतदान म्हणजे काय ?

—विरोधी पक्षाच्या मोटारींतून जाऊन, स्वपक्षीय उमेदवाराला गुप्तपणें मत देणें.



असापनीतींत नसलेल्या गोष्टी

प्रेमाचा एक प्रकार

एकदां एका बंगल्यांत एक नवीन बिऱ्हाड राहायला आलें. त्या कुटुंबांत एक सतरा वर्षांची मुलगी होती (असणारच !). ती दररोज संध्याकाळीं माडींत खिडकीजवळ उभी राहायची. तिची मुद्रा नेहमीं हंसरी असायची. समोरच्या घरांत एक तरुण राहात होता. (हेंही ठरलेलेंच आहे !) तो तिच्याकडे रोज पहायचा; ती त्याच्याकडे (?) पाहून दररोज हंसायची ! असा क्रम कांहीं दिवस झाल्यावर त्या तरुणानें त्या मुलीचें आपणांवर प्रेम आहे अशी जनरूढी-प्रमाणें सोयिस्कर समजून करून घेतली आणि तिला प्रेमपत्र पाठविलें. दुसऱ्या दिवशीं त्या मुलीच्या बापानें त्याला बोलावून घेतलें आणि असा दम भरला कीं, यंव रे यंव ! त्यावेळीं ती मुलगी तेथें होतीच. त्यानें तिला जवळून पाहिलें मात्र आणि हाय रे दैवा ! ती तिरळी होती. दररोज ती दुसरीकडेच पाहून हंसत होती. परंतु त्या तरुणाला वाटे, आपल्याकडेच पाहून ती हंसतेय !

तात्पर्यः—प्रेम आंधळं असतं, इतकंच नव्हे तर तें तिरळंही असतं !

∞ ∞ ∞

कावळा चिमणींचें भांडण

एकदां एका भांडकुदळ कावळ्यानें एका चिमणीच्या घरट्यावर अचानकपणें हल्ला केला. चिमणीनें कावळ्याला विनंति करून पाहिली; इतर तडजोड सुचवून पाहिली. शेवटीं घरट्याची फाळणी करून देण्यासही तयार झाली. फाळणीला कावळा तात्पुरता कबूल झाला. निम्मे घरटें त्यानें बळकावलें आणि राहिलेलें निम्मे बळकावण्याचा प्रयत्न करूं लागला. चिमणीच्या मुलांना ठार केलें; चिमणीच्या तरण्याताठ्या मुलींचें शील भ्रष्ट करूं लागला. तेव्हां चिमणीनें संतापून शेवटचा सनदशीर उपाय म्हणून हें प्रकरण 'युब्बो' कडे (United Birds' and Beasts' Organisation.) सोंपविलें. लगेच युब्बोमध्यें दोन तट पडून कांहींनीं चिमणीची बाजू घेतली. सिंह, अस्वल

(इंग्लंड, रशिया इत्यादींबद्दल वापरलेली ही अन्योक्ति नव्हे हं!) आदि बड्या मंडळींनीं धूर्तपणें कावळ्याची बाजू घेतली आणि नंतर अचानकपणें 'जांगलिक' ('जागतिक' या चालीवर) युद्ध पेटलें. बेसुमार हानि होऊन सिंह अस्वलादि बड्या दोस्त प्राण्यांना विजय मिळाला.

तात्पर्यः—'युब्बो' आणि या धर्तीवर शांतता स्थापण्याच्या उद्देशानें स्थापन झालेल्या संस्थाच घाऊक प्रमाणांत युद्धें निर्माण करतात.

∞ ∞ ∞

गाढव आणि ललित-कला

एकदां एक गाढवाचें दांपत्य संध्याकाळचें फिरायला जात होतें. रस्त्यांतून जातां जातां त्यांनीं सहज एका हॉलमध्यें डोकावून पाहिलें. तेथें गायन आणि नृत्य चाललें होतें. तें पाहून गाढव आपल्या पत्नीस म्हणालें, 'सखे, पाहिलंस का माणसं कशीं आपल्या कलेची 'कॉपी' करीत आहेत तें?' आणि त्या आर्यपत्नीनें आपल्या पतिदेवाच्या म्हणण्याला दुजोरा दिला.

तात्पर्यः—जगांतल्या सगळ्याच कलांचें श्रेय माणसानें आपल्याकडे घेऊं नये.

∞ ∞ ∞

प्रामाणिकपणाचें बक्षिस

एकदां कांहीं मुलें एका फळाच्या बागेजवळून जात होतीं. त्यांतल्या कांहीं द्वाड मुलांनीं बागेंत जाऊन चोरून फळें तोडण्याचें ठरविलें. त्यांतल्या एका प्रामाणिक मुलानें त्यास विरोध केला. परंतु सर्वांनीं त्यास आपल्याबरोबर आंत ओढून नेलें. बागेंत त्यांनीं माळ्याची नजर चुकवून पुष्कळ फळें तोडलीं आणि नेहमींच्या संवयीमुळें तीं सहीसलामत बाहेर पडून, आपापल्या घरीं गेलीं. परंतु त्या प्रामाणिक मुलास बरें वाटेना. तो परत त्या माळ्याकडे येऊन म्हणाला, "माळीदादा, आज मीं तुमच्या बागेंतून चोरून फळें नेलीं होतीं; परंतु या कृत्याबद्दल मला मनस्वी खेद होत आहे!" या प्रामाणिकपणाचें त्या माळ्याला कौतुक न वाटतां तो उलट म्हणाला, 'बरा सांपडलास! तरी मी म्हणतुंया बागेंतलीं

फळं इकतीं कमी कशीं होत्याती रोज ?' असं म्हणून त्यानें त्या मुलाला मारहाण केली आणि धक्के मारून हांकलून दिलें.

तात्पर्यः— (१) जे निसटतात ते तरतात आणि आयडिॲलिझमचे भगत गोत्यांत येतात.

—(२) जॉर्ज वॉशिंग्टनच्या प्रामाणिकपणानें असाच बऱ्याच जणांना धोका दिला आहे. सुदैवानें हल्लींच्या क्रमिक पुस्तकांतून त्याच्या प्रामाणिकपणाचा धडा नाहीं हें ठीक !

∞ ∞ ∞

मूर्ख देव

एकदां एक मूल फारच रडत होतें. कांहीं केल्या रडण्याचें थांबेना. त्याच्या थोरल्या बहिणीनें त्याला परोपरीनें समजाविण्याचा प्रयत्न केला परंतु व्यर्थ ! तेव्हां ती चिडली आणि रागानें म्हणाली, 'कंटाळलें मी बाई ! जातेंच कशी मी आतां !' तेव्हां जवळच असलेल्या तिच्या तीन वर्षांच्या भावानें हें विचारलें, 'कुठं ?' तेव्हां बहीण अधिकच चिडून म्हणाली, 'देवाच्या घरीं.' हें वाक्य उच्चारायला आणि त्याच वेळीं बाहेरल्या बाजूनें 'देव' या आडनांवाचा एक तरुण जा[illegible] एकच गोंधळ पडली. त्या तरुण मुलीसाठीं तर देव दररोज तिच्या [illegible] ये-जा करीत होता. वरील शब्द त्याच्या कानांत अचानकपणें [illegible] कोणीतरी अमृत ओतीत आहे असा भास त्याला झाला [illegible] बेहद्द खूष होऊन, घिरट्या घालण्याच्या तपःश्चर्येला फळ आलें असें समजून आनंदानें घरीं गेला आणि रुबाबदार पोषाख करून तिच्या येण्याची वाट बघत बसला. सबंध दिवस गेला आणि अर्धी रात्रही गेली, परंतु ती कांहीं आली नाहीं. तेव्हां तो निराशेनें झोंपी गेला.

तात्पर्यः— सुतानें स्वर्गाला जाणाऱ्या लोकांना असा फटका बसायचाच !

∞ ∞ ∞

गाढवाचें समर्पक उत्तर

एकदां कांहीं प्राण्यांची सभा भरली होती. नेहमींप्रमाणें अध्यक्षस्थानीं सिंह होता. सभेंतील मुख्य विषय, ' प्रत्येक पशु कोणत्या देवास अथवा माणसास प्रिय आहे ? ' असा होता. नंदी, कुत्रा, गाय, रेडा, शेळी यांनीं आपण अनुक्रमें महादेव, खंडोबा, दत्त, यम, गांधी यांना प्रिय असल्याचें सांगितलें. कोल्ह्यानें मध्येंच खवचटपणानें गाढवास विचारलें, ' काय साहेब, तुम्ही कोणाला प्रिय आहांत ? ' त्यावर गाढवानें ताडकन् उत्तर दिलें, ' कायद्याला ! '

तात्पर्यः— शहाणपणाचा मक्ता कोल्ह्यांनाच कुणीं दिलेला नाहीं; गाढवांतही हल्लीं जागृति होत आहे.

∞ ∞ ∞

माकड आणि टोपीवाला

एकदां एक टोप्यांचा फिरता व्यापारी एका झाडाखालीं उन्हाची विश्रांति घेण्यासाठीं म्हणून झोंपला होता. थोड्याच वेळांत एक माकडांचा कळप तेथें आला आणि त्यांतील प्रत्येकानें एक एक टोपी स्वतःच्या डोक्यावर घातली आणि उंच झाडावर जाऊन बसलें. टोपीवाला जागा होऊन बघतो तर टोप्या माकडांनीं पळविलेल्या. तेव्हां त्याला एक युक्ति सुचली. त्यानें आपल्या डोक्यावर असलेली एकुलती एक टोपी जोरानें जमिनीवर आपटली. हेतु हा कीं, माकडांनींही अनुकरण करून टोप्या जमिनीवर टाकाव्यात. परंतु दुर्दैवानें तसें कांहींच झालें नाहीं. उलट एक माकड चलाखीनें खालीं आलें आणि त्यानें तीही टोपी पळविली.

तात्पर्यः— नेहमीं दुसऱ्यांना टोप्या घालणाऱ्या व्यापाऱ्यांना असें कोणीतरी टोपी काढणारे (कीं घालणारे) भेटतात. म्हणून मुळींत ' टोपी न घालणेंच ' चांगलें !

∞ ∞ ∞

बैल आणि गाढव

एका शहरांतील म्युनिसिपल निवडणुकीसाठीं दोन वार्डांतून एक बैल आणि एक गाढव उमेदवार म्हणून उभे राहिले. दोघेहि आपापला प्रचार जोरांत करीत होते. प्रत्येकाला आपण निवडून येणार याची खात्री होती आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते दोघेही निवडून आले !

तात्पर्यः—माणसांना आपले खरे प्रतिनिधि कोण हें नीटपणें कळूं लागलें.

∞ ∞ ∞

म्हशींचें भाषाज्ञान

एक म्हैस आपल्या मैत्रिणीबरोबर गप्पा मारीत असतां समोरून एक रोडका मरणोन्मुख बैल अत्यंत कष्टानें जात असलेला त्यांना दिसला. तेव्हां त्यांतली एक म्हैस दुसरीला म्हणाली, ' हबळे, आग तो बैल बघ कसा आगदी रोडका नि मरायला टेकल्यासारखा दिसतोय् ! ' तेव्हां दुसरी म्हैस म्हणाली, ' असेना का बापडा कसाही ! गाईला तेवढाच कुंकवाला आधार ! '

तात्पर्यः—म्हशींनासुद्धां माणसांच्या म्हणीविणी येऊं लागल्या.

∞ ∞ ∞

सिनेमांतील प्रेम आणि वस्तुस्थिति

कांहीं सिनेमांत अनोळखी नायक–नायिकेचा एकमेकांना धक्का लागून तात्पुरती बाचाबाची होते आणि दुसऱ्या भेटींत (किंवा त्याच भेटींत) त्यांची प्रीति, परिचय आणि लग्न जमून जातें; अशीं दृश्यें पाहून एका तरुणानें बाजारांतल्या गर्दींत एका मुलीला ' चुकून ' धक्का मारला आणि सिनेमांतल्या नायकाप्रमाणें प्रेमाचं बरळूं लागला. तेव्हां त्या मुलीनें त्याला प्रथम चपलेनें चोपून काढलें. तेवढ्यांत तेथें पोलीस आला आणि त्यास चतुर्भुज करून नेलें. अशा प्रकारें तो निराळ्या अर्थानें चतुर्भुज झाला.

तात्पर्यः—सिनेमांतला 'धक्का' आणि व्यवहारांतला 'धक्का' यांच्यामध्यें 'चतुर्भुज होणें' या शब्दाच्या दोन अर्थांइतकेंच जमीन अस्मानाचें अंतर आहे.

∞ ∞ ∞

गाढवाला गुळाची चव

एक गाय पहिल्यांदाच प्रसूत होऊन तिला खोंडरत्न झालें. पहिल्या मुलाचें बारसें म्हणून बैलानें तें मोठ्या प्रमाणावर साजरें करण्याचें ठरविलें. बैलानें बारशाचे दिवशीं अरण्यांतील सर्व पशूंना निमंत्रण दिलें. मुलाचें नांव आवडीनें आपल्या कुलपुरुषाचें, 'नंदीकेश्वर' हें ठेवण्यांत आलें. बैलानें पाहुण्यांचें तोंड गोड करण्यासाठीं सर्वांना गूळ वांटला. सर्वांनीं तो खाल्ला, त्याप्रमाणें गाढवानेंही खाल्ला. परंतु त्याला तो फार आवडल्यामुळें त्यानें पुन्हा पुन्हा दोनदां मागून घेऊन खाल्ला. बैलानें कौतुकानें स्मित करीत विचारलें, 'काय गाढवराव, तुम्हांला कशी काय बुवा गुळाची चव? त्यावर गाढव विनयानें म्हणालें, 'माणसांना आवडणाऱ्या बऱ्याच गोष्टी मलाही मनापासून आवडतात. परंतु 'माणसें' स्वतःला नेहमींच 'शिष्ट' समजतात आणि म्हणून त्यांनीं माझ्या गुळाच्या आवडीचा विपर्यस्त अर्थ रूढ केला आहे.'

तात्पर्यः—गाढवानें वर सांगितलें तेंच!

∞ ∞ ∞

कोंबडा आणि रत्न

एकदां एक कोंबडा उकिरड्यावर खाद्यपदार्थ शोधीत असतां त्यास अचानकपणें एक मूल्यवान् रत्न सांपडलें. तें रत्न पाहून कोंबडा खूष झाला, आणि भूक विसरून गेला. तो मनाशीं म्हणाला, वा! छान! आज माझें नशीब उघडलें. आतां मी हें रत्न विकून खूप खूप पैसे मिळवीन आणि सपाटून धान्य खरेदी करून ठेवीन.'

तात्पर्यः—हल्लींचे कोंबडे इसापनीतींतल्या कोंबड्यांप्रमाणें मूर्ख राहिले नाहींत. त्यांना व्यवहार कळतो.

∞ ∞ ∞

प्रेम, न्यायदेवता आणि कायदा

एका तरुण म्हशीचें एका गाढवावर प्रेम बसलें. दोघेही नदीकांठीं फिरायला जायचीं, कुंजांत बसून प्रेमाच्या गोष्टी करायचीं; भल्या पहांटे रानांत येऊन म्हैस गाढवाच्या कानांत आपलं भावी नातं सांगायची. शेवटीं दोघांनीं लग्नाच्या आणाभाकाही घेतल्या. परंतु गाढवाला अचानकपणें, आपण कांहींतरी 'माणूसपणा' (गाढवपणा या अर्थीं गाढवांत रूढ असलेला शब्दप्रयोग) करीत आहोंत अशी शंका आली आणि त्यानें म्हशीशीं लग्न करण्यास नकार दिला. तेव्हां म्हशीनें गाढवावर वचनभंगाची फिर्याद केली. कोर्टांत न्यायाधिशानें दोघांचें म्हणणें ऐकून घेऊन निर्णय दिला कीं, 'म्हशीनें प्रथम 'आंतर पाशवी' ('आंतर जातीय' या चालीवर) विवाह करण्याच्या भानगडींत पडावेंच कां? तिच्या ज्ञातींतील उपवधू रेडे नव्हते काय? गाढवानें आपल्या ज्ञातीच्या प्रतिष्ठेसाठीं आणि कुळाच्या शुचितेसाठीं जें केलें तें योग्यच केलें आहे.' असें सांगून खटला फेटाळून लावला. अशा रीतीनें म्हशीच्या मनापासून (कीं आंधळेपणानें) केलेल्या प्रेमाचा बोऱ्या वाजला.

तात्पर्यः—प्रेम आंधळं असतं म्हणून तें कुणावरही बसतं; न्यायदेवता आंधळी असते म्हणून न्यायही भलत्यालाच मिळतो; आणि कायदा गाढव असल्यामुळें त्याचा कल आपल्या बांधवांकडे असणें साहजिक आहे.

∞ ∞ ∞

बकऱ्यांची पूल दुरुस्तीची योजना

एका ओढ्यावर पलीकडे जाण्यासाठीं अगदीं अरुंद पायवाटीचा पूल होता. एकदां एकाच वेळीं समोरासमोर दोन बकरे पुलावरून पलीकडे जाण्यासाठीं निघाले. दोघांची गांठ मध्यावर पडली. वाट अतिशय अरुंद असल्यामुळें कुणालाच बाजूला सरतां येईना. तेव्हां एक बकरा म्हणाला, 'मी खालीं बसतों आणि माझ्या शरिरावरून तूं हलकेंच पलीकडे जा. इसापनीतींतल्या सूज्ञ बकऱ्यांनीं सुद्धां अशा प्रकारच्या आपत्प्रसंगीं हीच युक्ति वापरली होती.' तेव्हां दुसरा बकरा म्हणाला, 'नको रे बाबा! त्या बकऱ्यांना एकदां सुरक्षितपणें तसं जातां

आलं म्हणून सर्वांना नेहमीं तसं थोडंच जमतं ? शिवाय साऱ्या जगाला ज्ञानाचे डोस पाजणारे ते इसापनीतींतले बकरे कुठें आणि आपण कुठें ? आपण एखादे वेळीं पडूं मात्र ! तेव्हां आपण असं करूं या ! आपण हा पूल आहे त्यापेक्षां दुष्पट किंवा तिप्पट रुंद करण्याची तीन कलमी योजना आखूं या ! कलम (१) ज्या अर्थी हा पूल अरुंद आहे त्या अर्थी तो रुंद केला पाहिजे. (२) जरी हा पूल बकऱ्यांनीं बांधला तरी तो सर्व जातीच्या प्राण्यांना मोकळा असावा. (३) आपल्या भगिनींपैकीं एकीला एका मोठ्या मनुष्यप्राण्याजवळ सतत राहण्याचा सुयोग आला होता. म्हणून त्या भगिनीचें नांव सदर संकल्पित पुलाला देण्यांत यावें.' असे तीन ठराव पास करून दोन्ही बकरे एकमेकांकडे पाठ करून आल्या वाटेनें परत गेले आणि पुलाकडे पुन्हा कधींच परत आले नाहींत.

तात्पर्यः—सरकारसुद्धां प्रथम मोठमोठ्या योजना आंखून आणि त्यांना पुढाऱ्यांच्या नांवाची पुस्ती जोडून शेवटीं त्या योजनांकडे कायमची पाठ फिरवितें, हें यावरून सहज समजून येईल.

∞ ∞ ∞

पशूंचा ब्रेनट्रस्ट

एकदां पशूंच्या वसंतव्याख्यानमालेंत ब्रेनट्रस्टचा (प्रश्नमालेचा) कार्यक्रम होता. 'तज्ज्ञ' जनावरें व्यासपीठावर बसलीं होतीं. प्रश्नप्रमुख म्हणून गाढवाची योजना करण्यांत आली होती. निरनिराळ्या तज्ज्ञांनीं गाढवानें विचारलेल्या विविध प्रश्नांना समाधानकारक उत्तरें दिलीं. खालीं कांहीं प्रश्नोत्तरें दिलीं आहेत.

प्रश्नः—लबाड प्राण्यांना काय म्हणावें ?

कोल्हाः—माणूस !

प्रश्नः—स्वार्थी प्राणी कोण ?

गव्हाणींतला कुत्राः—माणूस !

प्रश्नः—चोरून कोण खातो ?

मांजरः—माणूस !

प्रश्नः–वरून साळसूद परंतु आंतून ड्यांबिस कोण ?

बगळाः–माणूस !

प्रश्नः–ज्या दोघांचें कधींही जमणं शक्य नाहीं अशांची एकी करण्यासाठीं उच्च पातळीवरून वाटाघाटी कोण करतो ?

मांजर आणि उंदीरः–माणूस !

प्रश्नः–स्वतः मूर्ख असून तें दर्शविण्यासाठीं दुसऱ्या जनावरांच्या नांवाचा बदनामीकारक उपयोग कोण करतो ?

गाढव आणि बैलः–माणूस !

प्रश्नः–रस्त्यांतून प्रेमाचे चाळे कोण करतो ?

कुत्राः–माणूस !

प्रश्नः - अहोरात्र प्रत्येक प्रकारच्या स्वातंत्र्याच्या नांवानें टाहो फोडणारा प्राणी कोण ?

पिंजऱ्यांतला पोपटः—माणूस !

याप्रमाणें हें प्रश्नोपनिषद् कांहीं वेळ चालून समाप्त झालें.

तात्पर्यः—प्रश्न निरानिराळे आणि उत्तरें देणारे तज्ञ निरानिराळे असूनही उत्तरांत दिसून येणारी एकवाक्यता अत्यंत गौरवास्पद आहे. मानवतेवर प्राण्यांचीं, मानवाच्या गुणदोषाबद्दलचीं वरील मतें पाहून मानव प्राणी योग्य बोध घेईल काय ?

∞ ∞ ∞

प्रतिपोस्टमन

एकदां एका सातआठ वर्षांच्या मुलास त्याच्या मामानें विचारलें, 'काय सुरेश तुला मोठें झाल्यावर कोण व्हावंसं वाटतं ?' तेव्हां त्या चुणचुणीत मुलानें चटकन् उत्तर दिलें, 'मला मोठेपणीं पोस्टमन व्हावंसं वाटतं !' तेव्हां मामानें आश्चर्य व्यक्त करून विचारलें, 'हत् लेका ! तूं एवढ्या मोठ्या ऑफिसरचा मुलगा अन् तुलाही दुर्बुद्धि कुठून सुचली ?'

तेव्हां सुरेश म्हणाला, 'त्याचं असं आहे. हल्लीं मला याच कामाची संवय चांगली झाली आहे. शेजारच्या वसंतानें दिलेलीं पत्रें ताईला पोहोंचविणें आणि उलट टपालीं ताईचीं एक्स्प्रेस डिलिव्हरीचीं पत्रें वसंताला पोहोंचविणें हीं कामें मला करावीं लागतात. वसंतानें ताईसाठीं दिलेलीं रुमाल, वेणी, स्नो, पावडर इत्यादींचीं पार्सलें ॲक्नॉलेजमेंटच्या पावतीसह मला पोहोंचतीं करावीं लागतात. वसंताची मनीऑर्डर ताईला पोहोंचविण्याची कामगिरीहि मलाच करावी लागते. ताईच्या गैरहजेरींत तिच्या प्रेमपत्रांची बँक मलाच सांभाळावी लागते; आणि विशेष म्हणजे मला दोघांकडूनही फक्त दिवाळीलाच नव्हे तर नेहमीं पोस्त मिळत असतें. आतां तुम्हीच सांगा, मोठेपणीं मी पोस्टमन कां होऊं नये बरं ?'

तात्पर्यः—माणूस आपल्या मुख्य व्यवसायाखेरीज इतर एखाद्या गोष्टींतही प्राविण्य दाखवूं शकतो. परंतु आपल्या कार्यप्रवणतेची वरील गोष्टींतील सुरेश-प्रमाणें प्रत्येकास जाणीव असतेच असें नाहीं. सरकार माणसांचे सुप्त गुण जाणून त्यांची योग्य जागीं योजना करील काय ?

∞ ∞ ∞

लांकूडतोड्याची कुऱ्हाड

एक लांकूडतोड्या होता. तो अतिशय गरीब होता. रोजच्याप्रमाणें तो जंगलांत लांकडें तोडण्यास गेला असतां विहिरीजवळच्या एका झाडावर चढला. लांकडें तोडतांना चुकून त्याच्या हातांतली कुऱ्हाड निसटली आणि विहिरींत पडली. तेव्हां तो खालीं येऊन विहिरीजवळ बसून रडूं लागला. त्याच्या उपजिविकेचें साधनच गमावलें होतें. त्याची ती असहाय स्थिति पाहून जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं असलेल्या देवाला वाईट वाटलें; आणि पूर्वी एकदां एका प्रामाणिक लांकूडतोड्याला जशी अनुक्रमें सोन्याची, चांदीची, तांब्याची, स्टेनलेस् स्टीलची (सॉरी हं ! त्या काळांत स्टेनलेस् स्टील नव्हतें) कुऱ्हाड देऊं केली असतांहि त्यानें ती नाकारूनहि आपली लोखंडी कुऱ्हाडच मागून घेतली त्याप्रमाणेंच याच्याहि बाबतींत सोन्याच्या कुऱ्हाडीपासून देण्याचें ठरविलें आणि देव प्रकट झाला. देव म्हणाला, 'कां रे बाबा रडतोस ?' लांकूडतोड्या म्हणाला, 'तूं आहेस कोण ?' तेव्हां देव म्हणाला 'मीं देव आहें.' तेव्हां त्यानें देवास घडलेली

हकीकत सांगितली. देवानें लगेच त्याला मनांत ठरल्याप्रमाणें सोन्याची कुऱ्हाड देऊं केली, आणि लांकूडतोड्याच्या नकाराची वाट पाहूं लागला. परंतु तसं कांहीं घडलं नाहीं. लांकूडतोड्यानें चालून आलेली लक्ष्मी न सोडण्याच्या व्यावहारिक बुद्धीनें ती ठेवून घेतली तेव्हां मग देव निराशेनें आंवट तोंड करून निघून गेला.

तात्पर्यः — देवांनीं आपल्या भक्तांच्या मागण्या पूर्ण करण्याचे जुनाट आडाखे सोडून द्यावेत. कारण माणसें देवालासुद्धां टांग मारायला कमी करीत नाहींत.

∞ ∞ ∞

शेळीचें विज्ञानशास्त्र

एकदां एक शेळी ओढ्याच्या कांठावर उभी राहून पाणी पीत होती. त्या ओढ्याच्या प्रवाहाच्या वरच्या बाजूस त्याच वेळीं एक लांडगा पाणी पीत होता. लांडग्यानें स्वतः पाणी गढूळ केलें आणि भांडण उकरून काढण्याच्या निमित्तानें तो शेळीला म्हणाला, 'अग ए,पाणी गढूळ काय करतेस? मला पाणी प्यायचं आहे ना!' तेव्हां शेळी हंसून म्हणाली, 'अरे मूर्खा, असं उलट कसं होईल? मागं इसापनीतींतसुद्धां तूं असंच भांडण उकरून काढून भांडत बसला होतास. त्या काळच्या शेळ्या बिचाऱ्या भोळ्या होत्या म्हणून त्या तुला भ्याल्या. परंतु मी तशी भिणार नाहीं हें असल्या दादागिरीला? मी विज्ञान-शास्त्राची विद्यार्थिनी आहें. प्रवाहाच्या वरच्या बाजूस तूं लांब उभा आहेस. अर्थात् मीं गढूळ केलेलें पाणी उलटें तुझ्याकडे रे कसें येईल? पाणी नेहमीं उताराकडे जातें किंवा निदान समपातळींत राहातें असा विज्ञानशास्त्राचा चक्क नियम आहे!' शेळीचें तें शास्त्रीय ज्ञान ऐकून तो लांडगा मुकाट्यानें निघून गेला.

तात्पर्यः—इसापानें लांडग्यांना उगीच चढवून ठेवून त्यांच्या दादागिरीला उत्तेजन देऊन ठेविलें आहे. सध्यांच्या विज्ञानयुगांत असल्या मूर्ख दादागिरीचा काय उपयोग?

∞ ∞ ∞

तत्त्व बरोबर, धोरण चुकलें

गाढव जातीवर होणाऱ्या अन्यायाची दाद लावून घेण्यासाठीं एकदां एका अरण्यांतील, 'गर्दभ समाजोत्कर्षक संघा' च्या अध्यक्षानें प्राणांतिक उपोषण करण्याचें ठरविलें. आपल्या अन्यायाची दाद लावून घेण्यासाठीं माणसें हल्लीं उपवासाचेंच शस्त्र वापरतात ही बातमी गाढवाला कळल्यावर त्यानेंही हेंच तंत्र वापरण्याचें ठरविलें. एके दिवशीं भक्कम जेवणखाण करून त्यानें प्राणांतिक उपोषण सुरू केलें. आठवडा गेला; दुसरा आठवडा निम्मा गेला; आणि दुर्दैवानें एके दिवशीं सकाळीं तें गाढव उपोषणानें मेलें.

गाढवानें उपवास करण्याचें तंत्र उचललें; परंतु एका आठवड्याच्या आंत आश्वासन देण्यासाठीं वाघसिंहासारख्या एखाद्या बड्या धेंडाची अगाऊ तरतूद न केल्यामुळें गाढव नाहक जिवाला मुकलें.

तात्पर्यः—तत्त्वापेक्षां धोरण आणि धूर्तपणा या गोष्टींना प्राधान्य देण्याचा मानवी शहाणपणा त्या सत्प्रवृत्त गाढवाला न समजल्यामुळें तें तत्त्वासाठीं मरून गेलें. यावरून तत्त्वापेक्षां धोरण आणि धूर्तपणा श्रेष्ठ आहे हें सहज पटेल.

∞ ∞ ∞

एका बाबतींत साम्य

एकदां एका गांवांत मूर्खांची एक परिषद भरली. नेमकी त्याच वेळीं, त्याच गांवामध्यें विद्वानांचीहि एक परिषद भरली. मूर्खांच्या परिषदेस मोठमोठे इरसाल मूर्ख आले होते. परिषदेंत मांडण्यासाठीं निरनिराळ्या मूर्खांनीं निरनिराळे ठराव आणले होते. परंतु कोणत्याहि मूर्खाला दुसऱ्यानें मांडलेला ठराव पसंत न पडल्यामुळें (खरं सांगायचं म्हणजे न समजल्यामुळें) कोणताहि ठराव पास न होतां सभा विसर्जन पावली. (म्हणजे उधळली गेली.)

इकडे विद्वानांच्या सभेंतही बरेच ठराव आलें होते. परंतु प्रत्येक ठरावावर निरनिराळ्या विद्वानांनीं इतकी शास्त्रीय चर्चा (प्राकृत शब्द 'काथ्याकूट') केली कीं आणि त्यांच्यांत इतके तात्त्विक मतभेद (प्राकृत शब्द 'लाथाळी') झाले कीं, सभापतीला नाइलाजानें सभेचें विसर्जन करावें लागलें.

अशा रीतीनें दोन्हीही सभा उधळल्या गेल्या.

तात्पर्यः—हातीं घेतलेल्या कार्याचा विचका उडविण्यांत मूर्ख काय नि विद्वान् काय दोघेही सारखेच तत्पर असतात. फक्त फरक इतकाच कीं, मूर्खांच्या या कृतीला ' मूर्खपणा ' असें म्हणतात आणि विद्वानांच्या कृतीला ' तात्त्विक मतभेद ' अशी प्रतिष्ठित आणि गोंडस संज्ञा देतात.

∞ ∞ ∞

दैव देतें आणि .... !

एकदां एका ट्राममधून एक तरुणी आणि तरुण उतरत होते. बाहेर पाऊस सपाटून पडत होता. तरुणीजवळ (कथेच्या सोयीच्या दृष्टीनें अर्थातच) छत्री नव्हती आणि त्या तरुणाजवळ मात्र छत्री होती. तरुणी केविलवाण्या नजरेनें पावसाकडे पाहून, आपली बघतां बघतां ' वसंतसेना ' होणार या भावनेनें हवालदील झाली होती. हा 'सिनेमा छाप' मोका चालून आला असतांना तो टाळण्याइतका तो तरुण कांहीं बावळट नव्हता. ट्राममधून उतरत असतां त्यानें तिला विचारलें, ' छत्री पाहिजे काय ? ' हेतु हा कीं छत्रीच्या निमित्तानें आणि अंग न भिजण्याची थोडी जास्त दक्षता घेण्याच्या निमित्तानें तिला खेटून चालण्याची संधि आपल्याला मिळावी. दोघेंही खालीं उतरलीं आणि ट्रामच्या शेडमध्यें उभीं राहिलीं. ती म्हणाली, ' घ्या तुमची छत्री ! मी समोरच्या गल्लींतच राहातें. कृपा करून तुम्ही या शेडमध्यें पांच मिनिटें थांबा. मी घरीं जाऊन गड्याकडून ताबडतोब छत्री पाठवून देतें. थँक्स् हं वेळेवर उपयोगी पडल्याबद्दल ! ' असं म्हणून तिनें छत्री घेतली आणि हंसत हंसत ती निघून गेलीसुद्धां. आणि हा तरुण इकडे शेड्मध्यें तिच्या गड्याची छत्रीसाठीं वाट पहात आंबट चेहरा करून उभा राहिला.

तात्पर्यः—सिनेमावाले आणि कादंबरीवाले वाटेल त्या थापा मारतात आणि उमेदवार तरुणांना (जे केवळ प्रेमाची उमेदवारीच करतात परंतु ज्यांना मोबदला मिळत नाहीं त्यांना उमेदवार तरुण म्हणतात.) नेहमीं असें तोंडघशी पाडतात.

दैव देतें आणि छत्री (एकटीच) जातें, असं म्हणतात तें अगदीं खरं आहे.

∞ ∞ ∞

थोडक्यांत पुष्कळ

एकदां एका मुलाच्या तोंडाला विडी ओढल्याचा वास आला म्हणून त्याचे वडील त्याला म्हणाले, ' मध्या गाढवा, विडी ओढलीस वाटतं ? आपल्या घरांत कुणीही विडी ओढीत नाहीं; अन् तूं दहा वर्षांचं कार्टं असून ओढतोस हं ? कुठून आणल्यास या विड्या ? '

तेव्हां मधू म्हणाला, ' बाबा, तुम्ही फडताळांत लपवून ठेवलेल्या विड्या किंवा दादा आणि भाऊ यांनीं लपवून ठेवलेली सिगारेट मीं ओढली नाहीं. शेजारच्या अण्णा भटजीनें लपवून ठेवलेल्या विड्या त्यांच्या गणूनें आणल्या होत्या. त्या आम्हीं दोघांनीं ओढल्या. परंतु सुमीनें-गणूच्या धाकट्या बहिणीनें (वय वर्षें ६) तें पाहिल्यामुळें तिलाही दोन झुरके देऊन गप्प बसवावें लागलें. परंतु तेवढ्यानें तिचें समाधान झालें नसावें आणि तिनें ही चहाडी केली असावी. '

तात्पर्यः--दुसऱ्यानें एखादी भानगड केल्यास आपण गप्प बसावें. नाहींतर दुसऱ्याच्या भानगडी उकरण्याच्या नादांत आपलींहि गुप्त कुलंगडीं बाहेर येण्याची शक्यता असते.

∞ ∞ ∞

लबाड बोलण्याचें तंत्र

एकदां वसंत नांवाचा एक सहा वर्षांचा मुलगा शेजारच्या त्याच्या छोट्या मित्राकडे गेला होता. मित्राच्या आईनें आपल्या मुलाबरोबर वसंतालाहि लाडू आणि चहा दिला. नंतर तो थोडा वेळ खेळून घरीं परत आला. परंतु घरीं आल्यावर आईसमोर यायला घाबरला. कारण बाहेर दुसरीकडे कांहीं खायचें नाहीं अशी आईची त्याला सक्त ताकीद होती. इतका वेळ दिसला नाहीं म्हणून आईनें वसंतास सहज विचारलें, ' वसंता, कुठं होतास रे इतका वेळ ? ' वसंताचें मन त्याला खात होतें. म्हणून मार किंवा रागें भरून घेणें चुकविण्यासाठीं त्यानें लबाड बोलण्याचें ठरविलें. तो म्हणाला, ' आई, मीं किनई मघाशीं शेजारच्या शरदकडे गेलों नव्हतों; त्याच्या आईनें शरदला लाडू

नि चहा दिला नाहीं; त्याचप्रमाणें मलाही लाडू नि चहा दिला नाहीं. मीं लाडू खाल्ला नाहीं; नि चहा प्यालों नाहीं; नंतर मीं त्याच्याशीं खेळलों नाहीं; आणि मागाहून मीं आपल्या घरीं परत आलों नाहीं !'

प्रत्येक वाक्यापुढें 'नाहीं' हें क्रियापद ठेवलें कीं, लबाड बोलणें झालें अशी बिचाऱ्या वसंताची समजूत होती. आई अर्थात् काय समजायचें तें समजली.

तात्पर्यः—लहान मुलांनीं स्वतःचें असें कांहीं नवें तंत्र ठरवून लबाड बोलण्याच्या भानगडींत पडूं नये. घरचीं वडीलधारीं माणसं कशीं पद्धतशीर रीतीनें लबाड बोलतात हें त्यांनीं नीट अभ्यासावें आणि मग प्रसंगानुसार लबाड बोलत जावें.

∞ ∞ ∞

मोठ्यांचा संयम

वेळीं अवेळीं सभा-संमेलनांतून, व्याख्यानांतून गरीबांविषयीं हळहळणारी एक श्रीमंत बाई आपल्या नवऱ्याबरोबर सिनेमाला गेली होती. सिनेमांत, एक गरीब भिकाऱ्याचा पोरगा उपाशी असल्यामुळें कुत्र्याच्या तोंडांतली भाकरी त्याच्याशीं झगडा करून काढून घेतो आणि अतिशय हर्षभरानें ती उष्टी भाकरी खातो असें अत्यंत करुणाजनक दृश्य होतें. हें दृश्य पहात असतांना थिएटरमधील प्रत्येक व्यक्ति घळघळा रडली; त्या बाईचा नवरा रडला. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती बाई मुळींच रडली नाहीं. नवऱ्यानें अंधुक प्रकाशांत तिच्याकडे निरखून पाहिलें तेव्हां तिचे डोळे आणि गाल कोरडे असून गालावरचा मेकअपही ठाकठीक होता. सिनेमा सुटल्यावर त्यानें तिला त्या प्रसंगी न रडण्याचें कारण विचारलें, तेव्हां त्या कनवाळू माउलीनें उत्तर दिलें, 'सिनेमाला येतांना घरून हातरुमाल बरोबर घेऊन यायला मी विसरलें आणि जॉर्जेटच्या साडीनें डोळे पुसले तर साडी खराब होईल म्हणून मी मुद्दामच रडलें नाहीं !'

तात्पर्यः—मोठ्या लोकांचा संयमसुद्धां मोठाच असतो. नाहींतर इतर सामान्य माणसें ! लागलीं रडायला !

∞ ∞ ∞

माणसांच्या गुणांचा प्रसार

एकदां एका गाढविणीचें एका उंटावर प्रेम बसलें. परंपरागत चालत आलेल्या प्रेमाच्या पद्धतीनें गाढवीण उंटाला म्हणाली, 'सजणा, तुझं रूप किती गोड आहे रे !' त्यावर उंटहि प्रणयोन्मादानें म्हणाला, 'अन् सजणे, तुझा आवाजहि किती गोड आहे ग !' तेव्हां गाढवीण लाजून मुरका मारून म्हणाली, 'इश्श ! कांहीं तरीच !' उंट म्हणाला, 'शप्पत ! अगदीं खरं सांगतोंय् मी. तूं मला एक भावगीत म्हणून दाखविलंच पाहिजे.' गाढविणीनें थोडंसं लाजल्यासारखं केलं आणि मग ती फुरफुरली. (गाढवांचं खाकरणं) मग तिनं खड्या आवाजांत भावगीत म्हणून दाखविलं. त्या भावगीतानें उंट खूष झाला आणि म्हणाला, 'सखे, गाढवे, ज्या मुखांतून एवढं मस्त भावगीत निघतं त्या मुखानं मला एक गोड चुंबन दे पाहूं !' तेव्हां गाढविणीनें उंटाच्या उंच तोंडाशीं आपलं तोंड मिळविण्याचा खूप प्रयत्न केला, शेवटीं तिला एक युक्ति सुचली. जवळच एक शिडी होती. ती शिडी तिनें उंटाच्या मानेला लावून ती एखाद्या अल्लड बालिकेप्रमाणें दुडदुड शिडी चढून वर गेली अन् त्याला चुंबन देऊन परत खालीं आली.

तात्पर्यः—परस्परगुणप्रशंसा, गायन, चुंबन, आणि चुंबन देण्याघेण्याचे आडवळणी मार्ग इत्यादि बऱ्याच गोष्टी पशूंनीं माणसांपासून उचलण्यास सुरुवात केली. त्यामुळें माणूस आणि पशू यांच्यांतील अंतर कमी कमी होत आहे, ही गोष्ट उत्तम आहे हें कोणाही विश्वप्रेमी माणसाला पटण्यासारखें आहे.

∞ ∞ ∞

पुरुष सारे एका जातीचे

एकदां एका नदीमध्यें एक तरुण म्हैस आंघोळ करीत होती. आसपास तशीं कोणी पुरुष जनावरें नव्हतीं. त्यामुळें ती अधिक मोकळेपणानें आंघोळ करीत होती. (म्हणजे काय?) परंतु एक रंगेल प्रौढ बैल एका झुडूपाआडून तिच्या तरण्या सौंदर्याचें अनिमिष नेत्रांनीं अवलोकन करीत होता. इतक्यांत त्या बैलाच्या मागें हळूच चोरपावलांनीं त्याच्या तिसऱ्या लग्नाची गाय आली आणि बैलाचें शिंग धरून म्हणाली, 'लाज नाहीं वाटत दुसऱ्या बायकांकडे

पहायला ? ती म्हैस आपल्या जातीची का गोताची ? पुरुषांचा डोळा सदा न् कदा मेंला दुसऱ्या बायकांवर ! मी एवढी तांबूस रंगाचे छानदार ठिपके असलेली सडपातळ तरुण गाय तुमचीं बायको असतांना त्या काळ्या लष्ट म्हशीवर कां डोळा ? ' बैल ऐन गुन्ह्याच्या वेळीं सांपडला असल्यामुळें तो गप्प राहिला आणि खालीं मान घालून म्हणाला, ' तांबू, (गाईचं सासरचं नांव) माफ कर मला ! यापुढं मी तुझ्यावांचून दुसऱ्या कुणाकडे पाहाणार नाहीं ! '

तात्पर्यः—पेन्शनर म्हाताऱ्यांचे गुण बैलांनीं तंतोतंत उचलालला सुरुवात केली असं दिसतं.

∞ ∞ ∞

हत्तीणींची नृत्यशाळा

एकदां एका हत्तीणीनें अरण्यांत नृत्यशाळा सुरू करण्याचें ठरविलें. ' हत्तीण ' आणि ' नृत्य ' हे दोन शब्द एकत्र आलेले पाहून अरण्यांतील लहानमोठीं बहुतेक सर्व श्वापदें घाबरून गेलीं. सिंह, बैल, घोडा, अस्वल, गाढव प्रभृति प्राण्यांचें एक शिष्टमंडळ हत्तीणीला भेटायला गेलें. तें हत्तीणीला म्हणालें, ' तुम्ही नृत्यशाळा सुरू केल्यास पुष्कळ हत्तीणी तुमच्या शाळेंत येऊन नृत्य करूं लागतील. आणि त्या नृत्याच्या पदन्यासानें (प्राकृत शब्द 'थयथयाटानें') सारें अरण्य धरणीकंप झाल्याप्रमाणें डळमळूं लागेल. आणि अरण्यांतील सर्व झाडें उन्मळून पडतील. तरी आपण या अविचारापासून परावृत्त व्हावें अशी आमची तुम्हांला जांगलिक श्वापदांच्या वतीनें नम्र विनंति आहे.'

तेव्हां हत्तीण निर्धारानें म्हणाली, ' तें कांहीं नाहीं ! मी नृत्यशाळा सुरू करणारच ! धरणीकंप होईल, झाडें पडतील—या साऱ्या तुमच्या अतिशयोक्तीच्या थापा आहेत. मुंबईमध्यें माणसेंसुद्धां नृत्यशाळा चालवितातच कीं, ! तेथील कितीतरी नृत्यशाळा पहिल्या दुसऱ्या तिसऱ्या मजल्यांवर आहेत. तिथं खालच्या मजल्यावर थोडीशी माती कोसळून पडण्याखेरीज दुसरी कोणतीहि आपत्ति कोसळत नाहीं. तेथील कांहीं शिकाऊ नृत्यांगनांपेक्षां आमच्या विद्यार्थिनी किती तरी सडपातळ आणि नाजूक अंगकाठीच्या आहेत. '

हत्तीणीचें हें सोदाहरण वक्तव्य ऐकून तें शिष्टमंडळ पाय हालवीत (जनावरांना हात नसतात म्हणून) निघून गेलें.

तात्पर्यः—' हत्ती समाजां 'त लठ्ठ मानव प्राण्यांची अकारण बदनामी होत आहे. मानवांनीं या बाबतींत लक्ष घालणें आवश्यक आहे.

चोरांची सांस्कृतिक परिषद्

भारतवर्षांत नेहमीं विविध प्रकारच्या सांस्कृतिक परिषदा भरत असल्याचें पाहून चोरांनींही आपली एक, ' अ. भा. तस्कर परिषद् ' भरविण्याचें ठरविलें. मुंबईतल्या चोरबाजाराशिवाय परिषदेला उत्तम जागा दुसरी कोणती असणार ? म्हणून परिषद् चोरबाजारांतच भरली. इतर परिषदांप्रमाणें ठराव, चर्चा, उपवक्त्यांचीं चऱ्हाट भाषणें, उपसूचना इत्यादि सगळे प्रकार याहि परिषदेंत झाले. खालीं अध्यक्षीय भाषणांतील महत्त्वाचा भाग दिला आहे—

' मित्रहो, आपली संस्कृति, नीति, तत्त्व आणि धोरण यासंबंधीं मी आपणांस चार शब्द सांगणार आहें. चोरी करणें हा गुन्हा नसून सांपडणें हा गुन्हा आहे, हें चोरीच्या धंद्यांतलें मुलभूत तत्त्व तुम्हां सर्वांना ठाऊकच आहे. हें तत्त्व इतकें सुंदर आहे कीं, सभ्य (!) माणसेंसुद्धां याचा पुष्कळदां अवलंब करतात. जगांतला प्रत्येक माणूस चोर आहे हें दुसरें तत्त्व. (हिअर ! हिअर !) प्रत्येकाच्या चोरीचा प्रकार निराळा असतो. कोणी परक्या भाषेंतील वाङ्मय चोरतो; कोणी पोरींचीं हृदयं चोरतो; किंवा एखादं लहानसं कांटे बापाच्या खिशांतल्या विड्या चोरतं; (स्मित.) मुकाट्यानें लपत छपत जाऊन द्रव्य हरण करणें ही चोरीची पद्धत आतां मध्ययुगीन झाली आहे. व्यापार, दलाली, कंत्राटें हे हल्लींचे सुधारलेले (Civilised) मार्ग आहेत. संस्कृतींत तत्त्व आणि धोरण या दोन गोष्टी येतात. तत्त्व हा संस्कृतीचा स्थायी भाव असून धोरण हें कालमानाप्रमाणें बदलतां येते. नीति ही भानगड लवचिक असल्यामुळें वाटेल तशी बदलतां येतें. चोरांची संस्कृति फार मोठी आहे. गीतेंतील योग्याचें वर्णन चोरांना बरोबर लागूं पडतें. 'या निशा सर्वभूतांनां तस्यां जागर्ति संयमी । यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतों मुनेः ॥ हा श्लोक घ्या. जग जागें असतें

तेव्हां आपण झोंपलेले असतों आणि सगळें जग जेव्हां झोंपलेलें असतें तेव्हां आपला संचार सुरू होतो. प्रत्येक चोर 'वसुधैव कुटुम्बकम्' वृत्तीचा असतो. हें आपलें, हें दुसऱ्याचें; हें अिसापाकीट आपलें, हें अिसापाकीट दुसऱ्याचें असें तो कधींच मानीत नाहीं. चोराची प्रत्येक माणसाच्या ठिकाणीं 'आत्मवत्' बघण्याची दृष्टि असते. भगवान् श्रीकृष्णांनीं अशा व्यक्तींना 'पंडित' अशी संज्ञा दिली आहे. (मूर्ख चोर 'पंडित नेहरू कीं जय' असें म्हणाले, परंतु सुज्ञ चोरांनीं त्यांना गप्प बसविलें.) गीतेंत चक्क म्हटलेंच आहे–'आत्मवत् सर्वभूतेषु यः पश्यति स पंडितः' 'असो. शेवटीं Thief is Free and Theft is Sacred हें ब्रीदवाक्य प्रत्येकानें हृत्पटलावर कोरून ठेवावें अशी विनंति करून मीं माझें भाषण संपवितों.' (प्रचंड टाळ्या.)

तात्पर्यः—सभ्य लोकहो, बोला ! इतर परिषदांत आणि चोरांच्या परिषदेंत काय फरक आहे ? विद्वत्ता, संस्कृति, तत्त्व, ध्येय, धोरण इत्यादि बाबतींत त्यांचीहि एक विशिष्ट परंपरा आहेच. आणि ती परंपरा इतर 'अचोर' माणसांच्या परंपरेशीं जुळणारी आहे हें वरील अध्यक्षीय भाषणावरून सहज समजून येईल.

∞ ∞ ∞

आत्यंतिक प्रामाणिकपणा

एका माणसानें आपलें शेत दुसऱ्यास विकलें. त्या दुसऱ्या माणसानें शेत नांगरण्यास सुरुवात केली. शेत नांगरीत असतां जमिनींत त्याला द्रव्यानें भरलेला हंडा सांपडला. त्या गृहस्थानें तो हंडा लंपास न करतां मूळच्या मालकाकडे येऊन तो म्हणाला, 'मीं तुमच्याकडून फक्त जमीन विकत घेतली. जमिनीच्या आंतील संपत्तीवर माझा नैतिक दृष्ट्या हक्क नाहीं !' तेव्हां मूळचा मालकहि प्रामाणिक असल्यामुळें म्हणाला, 'छे ! हें द्रव्य मी मुळींच घेणार नाहीं. जमीन तुमच्या ताब्यांत आल्यावर तुमच्या नशिबानें हें द्रव्य तुम्हांला मिळालेलें आहे. त्यावर नैतिक दृष्ट्या माझाही मुळींच हक्क नाहीं !'

किती तरी वेळपर्यंत ते दोघेही तें द्रव्य घेईनात. कांहीं वेळानें मात्र ते दोघेही हमरीतुमरीवर येऊन भांडूं लागले. भांडण्याचें कारण काय ? तर

आपल्या विनंतीला मान देऊन दुसरा द्रव्य घेईना ! (अहाहा ! किती आदर्श भांडण ! देशांतील सर्व भांडणें याच पद्धतीनें होतील काय ?) थोड्या वेळानें भांडण विकोपाला जाऊन मारामारीस सुरुवात झाली. रक्तबंबाळ होईपर्यंत एकमेकांना काठ्या मारल्या. आणि शेवटीं दुर्दैवानें ते दोघेही मेले !

तात्पर्यः—वरील गोष्ट म्हणजे शुद्ध थाप आहे. धर्मराजासारख्या प्रामाणिक राजाच्या वेळींसुद्धां याच बाबतींत वाद निर्माण झाला होता. परंतु त्या वेळींसुद्धां कोणी मेलेंबिलें नाहीं. मी झालों म्हणून वाटेल ती थाप मारण्यांत काय अर्थ आहे ?

∞ ∞ ∞

नागरिकांची सोय चोरांच्या पथ्यावर

एकदां दोघे चोर रात्रीचे चोरी करण्यासाठीं आपल्या आयुधांसहित हिंडत होते. मध्यरात्रीचा सुमार होता. रस्त्यांतली वाहतुक बंद झाली होती. माणसें तर रस्त्यांवर मुळींच नव्हतीं. कांहीं कुत्रीं आकाशांत नसलेल्या चंद्राकडे बघून भुंकत होतीं. अशा वेळीं त्या चोरांनीं दिवसा हेरून ठेवलेल्या घरावर धाड घालण्याचें ठरविलें. ते भिंत चढून आंत जाणार तोंच त्यांना पडीकडच्या रस्त्यावर गस्तवाल्याचें ' घरमालक सावध हाय ? ' हें ओरडणें ऐकूं आलें. या ओरडण्यानें घरमालक सावध होण्यापेक्षां चोरच सावध होऊन जवळच असलेल्या म्युनिसिपालिटीच्या कंदिलाखालीं लपून बसले. (म्युनिसिपालिटीच्या कंदिलाखालील कित्येक चौरस यार्ड जागा अंधारमय असते हें सर्वांना माहितच आहे.) गस्तवाला या चोरांसमोरूनच गेला, इतकेंच काय हे चोर ज्या घरांत चोरी करायला जाणार होते त्या घरमालकांकडूनहि तो सावध असल्याचें उत्तर घेऊन तो पुढें निघून गेला. चोर मागाहून निर्धास्तपणें घरांत शिरले आणि सावधपणानें कार्यभाग उरकून स्वस्थानाप्रत गमन करेत झाले.

तात्पर्यः—गस्तवाला आणि रस्त्यावरील दिवा या दोन्ही गोष्टी चोरांपासून नागरिकांचें रक्षण करण्यासाठीं आहेत. चोरांना वास्तविक ही आपत्ति आहे. परंतु या दोन गोष्टींतील भोंगळपणामुळें ती चोरांना नुसती आपत्ति नसून ' इष्टापत्ति ' वाटत आहे हें यावरून दिसतें.

∞ ∞ ∞

कोल्होबांना शिक्षा

एकदां एका कोल्ह्याला फार तहान लागली म्हणून तो एका विहिरीवर पाणी प्यायला गेला. तेथें तो भरपूर पाणी प्याला. परंतु तेवढ्यांत त्याला कांहीं बेडूक दिसले. कोल्ह्यानें त्यांतले दोन चार बेडूक उचलून तोंडांत टाकले. बिचारे बेडूक ! गेले मुकाट्यानें कोल्होबाच्या पोटांत ! तिथेंच तावडतोब कोल्ह्याला एक मोठा विंचू दिसला. त्याचे ते पुष्कळ पाय. मुसमुसलेलें मस्त शरीर आणि एखाद्या पोरीच्या शेंपट्यालाही लाजविणारी पाठीवर कमानदारपणें विलसणारी नांगी पाहून कोल्होबाला भरल्या पोटींसुद्धां तोंडाला पाणी सुटलें. कोल्होबाला विंचवाच्या कर्तृत्वाची विशेष माहिती नव्हती. त्यानें विंचवाचें तोंड आपल्या तोंडांत घट्ट पकडून धरलें आणि त्या मोहक नांगीकडे अधाशी नजरेनें पाहूं लागला. एखाद्या लहान मुलानें चॉकोलेटची वडी जशी चावून चावून चविष्टपणें खावी त्याप्रमाणें कोल्होबानें चविष्टपणें विंचवाचे लचके तोडण्यास सुरुवात केली. आपल्या शरीराचे हे हाल पाहून विंचवानें कोल्ह्याच्या नाकावर फडाफड पांचसहा वेळां नांगी मारली.—जणूं कांहीं पोरीच्या वाटेला गेलेल्या उल्लू तरुणाला तिनें फडाफड चपलाच मारल्या—नांगीच्या प्रहारानें कोल्ह्याच्या तोंडून विंचू आपोआप खालीं पडला आणि कोल्हा वेदना असह्य होऊन मरण पावला.

तात्पर्यः—वास्तविक पहातां 'कोल्हा काकडीला राजी' असायला पाहिजे. स्वतःला अपरिचित आणि न पचणाऱ्या गोष्टी स्वतःच्या (इसापनीतींतल्या) बढाईवर करूं पाहणाऱ्या कोल्ह्यास एवढी शिक्षा होणें अपरिहार्यच आहे.

∞ ∞ ∞

धंद्यांचें सांखळीकरण

एक गृहस्थ हजामत करून घेण्यासाठीं सलूनमध्यें गेला असतां तेथें त्याला वस्तऱ्याची जखम झाली. म्हणून त्यानें शेजारींच असलेल्या दवाखान्यांत जाऊन औषधोपचार केले. परंतु जखम बरी न होतां चिघळत जाऊन शस्त्रक्रिया करण्याची पाळी आली. त्यानें दवाखान्याशेजारींच असलेल्या शस्त्रवैद्याकडून शस्त्रक्रिया करून घेतली. परंतु दुर्दैवानें शस्त्रक्रिया अयशस्वी होऊन तो मरणाच्या

मार्गाला लागला. ही बातमी कळतांच शस्त्रवैद्याच्या शेजारींच राहणाऱ्या वकिलानें त्या गृहस्थाच्या घराकडे धूम ठोकली आणि त्यास मृत्युपत्र तयार करून दिलें. वकील परत येतांना, त्याच्या शेजारच्या ' अंत्यवस्तुभांडारा ' च्या मालकानें वकिलाची सहास्य मुद्रा पाहून काय समजायचें तें समजून घेतलें आणि वाट पहात बसला.

वरून भिन्न व्यवसायी दिसणारीं हीं पांच माणसें आंतून एकमेकांचे हितसंबंधी होते.

तात्पर्यः—'धंद्यांचें एकीकरण,' 'धंद्यांचें राष्ट्रीयीकरण' इत्यादि कष्टसाध्य गोष्टींपेक्षां सरकारनें वरील पद्धतीनें धंद्यांची वर्गवारी करून त्यांचें 'सांखळीकरण' केल्यास सरकार, धंदेवाले आणि जनता या तिघांनाही (कमींत कमी पहिल्या दोघांना तरी) फायदा होणार आहे. सरकार इकडे लक्ष देईल काय ?

∞ ∞ ∞

स्थिरबुद्धि गाढव

पुण्यपत्तनांतील पुष्कळ अरुंद बोळांपैकीं एका बोळाच्या एका टोंकाशीं एक गाढव शांतपणें उभें होतें. त्या बोळाच्या दुसऱ्या टोंकाकडून एक विद्वान् मानवी प्राध्यापक हातांत जंगी ग्रंथराज घेऊन घाईघाईनें येत होते. ते त्या गाढवापर्यंत येऊन पोहोंचले. परंतु गाढवानें विलक्षण रीतीनें उभें राहून बोळ अडविल्यामुळें प्राध्यापकांना पलीकडे जायला वाट मिळेना. प्राध्यापक बहुभाषिक होते. त्यांनीं गाढवाला समजावें म्हणून त्याच्या भाषेंत, ' सरक बाजूला ' या अर्थी 'इश्या इश्या !' असें म्हटलें; परंतु तें जागचें हालेना. हातांतील ग्रंथराजावर हातानें जोरानें थाप मारून त्याला भिववून तेथून हलविण्याचा प्रयत्न करून पाहिला, परंतु व्यर्थ ! गाढव अगदीं स्थितप्रज्ञाप्रमाणें उभें होतें. शेवटीं त्या प्राध्यापकाला गाढवापुढें हार खावी लागली आणि ते आल्या पावलीं मागें वळून दुसऱ्या रस्त्यानें निघून गेले.

तात्पर्यः—स्थिरबुद्धि गाढव आणि परिस्थितीपुढें हार खाणारा अस्थिरबुद्धि प्राध्यापक यांत अधिक प्रज्ञावान् कोण हें गीतेंतील स्थितप्रज्ञाचीं लक्षणें न वाचतांही सहज समजण्यासारखें आहे.

नव्या म्हणी

—जिवाचं वडगांव करणें. (जिवाची मुंबई करणें).

—आंबे खाणार त्याला नेहरू देणार. (साखरेचें खाणार त्याला देव देणार.)

—तिखटा-मिठाचें खाणार, त्याला न. वि. गाडगीळ देणार. (साखरेचें खाणार...)

—घाल पांढरी टोपी नि कर काळा बाजार (पी हळद नि हो गोरी.)

—निवडणुकीपुरता मतदार. (कामापुरता मामा.)

—असेंब्लींत आमदार कैशा झोंपा काढी, जावें निवडूनि तेव्हां कळे. (पाण्यामध्यें मासा झोंप घेई कैसा, जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे.)

—शीर सलामत तो दरदिन हजामत (शीर सलामत तो पगडी पचास.)

—राखावें मंत्र्यांचें अंतर, वाशिला लागे तदनंतर. (राखावें बहुतांचें अंतर, भाग्य येतें तदनंतर.)

—व्याख्यानाला उभें राहिलें म्हणजे थापा सुचतात. (जात्यावर बसलं म्हणजे ओंवी सुचते.)

—मंत्र्याच्या मोटारीचा ड्रायव्हर, त्यासी करी सर्व नमस्कार (समर्थां घरचें श्वान, त्यासी देती सर्वही मान.)

—नटीचं वय आणि पुढाऱ्यांचा धंदा कोणीही विचारूं नये. (नदीचं मूळ नि ऋषीचं कुळ कोणी विचारूं नये.)

—ज्यांच्या डोक्यावर पांढरी टोपी तो देशभक्त. (ज्याच्या हातीं ससा तो पारधी.)

—रिकामा मंत्री (किंवा पुढारी) उद्घाटन करी. (रिकामा न्हावी कुडाला तुंबडी लावी.)

—आपलेंच सरकार, आपलेच काळाबाजारवाले. (आपलेच ओंठ आपलेच दांत.)

—उठला मंत्री केला उपदेश. (उचलली जीभ लावली टाळूला.)

—ज्याच्या हातीं वेणी तो प्रणयी. (ज्याच्या हातीं ससा...)

—ज्याच्या हातीं सुकलेली वेणी तो कवि. (ज्याच्या हाती ससा...)

—मुलीला आपली वेणी जड होत नाहीं. (म्हशीला आपलीं शिंगं जड होत नाहींत.)

—सहावीपर्यंत चढला इयत्ता एकेक, तरी का पास होई मॅट्रिक ? (उंच वाढला एरंड, तरी का होई इक्षुदंड.)

—चप्पल प्रीतिभंगाची बहीण. (भीड भिकेची बहिण.)

—तरुण बुडतो पैशानिशीं आणि प्रेयसी म्हणते वाल्ट (शेळी जाते जिवानिशीं आणि खाणारा म्हणतो वातड.)

—तुका म्हणे भोग सरे, पास होतीं रद्दड पोरें (तुका म्हणे भोग सरे, गुण येती अंगारे.)

—झांकली मूठ खाऱ्या शेंगदाण्याची. (झांकली मूठ सव्वा लाखाची.)

—मुलीचा बाजार नि 'अय्या' इश्शनें बेजार. (कवींचा बाजार स्तुतीनें बेजार.)

—मुलींच्या घरावर प्रेमपत्र. (हलवायाच्या घरावर तुळसीपत्र.)

—न्हाव्यावर रुसला, जंगल वाढवून बसला. (तेलणीवर रुसला नि अंधारांत बसला.)

—मुलीची करणी गालावर चप्पल. (देवाची करणी नारळांत पाणी.)

—शाळेंत राहून मास्तराशीं वैर. (पाण्यांत राहून माशाशीं वैर.)

—पेपर गेले, उत्तर आठवलें. (बैल गेला झोपा आड केला.)

—आयत्या गाईडवर अभ्यास. (आयत्या बिळांत नागोबा.)

—लाव पावडर हो गोरी. (पी हळद हो गोरी.)

—प्रेयसीनं बुडविलं नि पोलिसानं मारलं, तर फिर्याद कुणावर ? (पावसानं भिजवलं नि नवऱ्यानं मारलं तर फिर्याद कुणावर ?)

—रिकामा पदवीधर उमेदवारी करी. (रिकामा न्हावी, कुडाला तुंबडी लावी)

—मार खाणार त्याला पोलीस देणार. (साखरेचें खाणार त्याला देव देणार.)

—अहो मंत्री अहो नेता. (अहो रूपम् अहो ध्वनिः)

—युनिव्हर्सिटी उदार झाली, हातीं डॉक्टरेट् दिली. (राजा उदार झाला नि हातीं भोपळा दिला.)

—निवडून आला तर विजय, पडला तर नैतिक विजय. (उडाला तर कावळा, बुडाला तर बेडूक.)

—ज्याची घ्यावी नोट, त्याला द्यावें व्होट. (ज्याची खावी पोळी, त्याची वाजवावी टाळी.

—निवडणूक सरो, मतदार मरो. (गरज सरो वैद्य मरो.)

—पट्टेवाला चिरिमिरीला राजी. (कोल्हा काकडीला राजी.)

—साहेबा आधीं पट्टेवाल्याला नमस्कार. (महादेवा आधीं नंदीला नमस्कार.)

—पोरी तितक्या फॅशन्स्. (व्यक्ती तितक्या प्रकृती.)

—पांढरी टोपी शिरीं, त्याला कोण मारी? (देव तारी त्याला कोण मारी ?)

—मंत्री दमला दौऱ्यानं, सेक्रेटरी दमला फाइली वाहून. (घोडं मेलं ओझ्यानं, शिंगरूं मेलं येरझाऱ्यानं.)

—दारूची तहान नीरेवर भागविणें. (दुधाची तहान ताकावर भागविणें.)

—'पेला' लागे ओंठा, पोलीस मारी सोटा (पेला लागे ओंठा, दैव मारी सोटा.)

—इकडे म्युनिसिपालिटी, तिकडे सरकार (कर वसूल करायला.) (इकडे आड तिकडे विहीर.)

—नावडत्यांचा पक्ष जातीय. (नावडतीचं मीठ आळणी.)

—मंडईत 'अंगाला' 'अंग' लागणारच. (संसारांत भांड्याला भांडें लागणारच.)

—सत्कारसभा असो शोकसभा असो, पुढाऱ्याचं अध्यक्षस्थान चुकत नाहीं. (बारसं असो बारावं असो; भटाची पोळी चुकत नाहीं.)

—राष्ट्रीय फंडांत हात मारून घेणें. (वहात्या गंगेंत हात धुवून घेणें.)

व्यावहारिक शब्दकोश

सत्य—दारूच्या धुंदींत बाहेर पडतें तें.

असत्य—स्वतःशिवाय दुसरे बोलतात तें.

प्रेम—जें बहुतेकांचें पन्नास टक्केच जमतें.

योजना—कृतींत न आणतां लोकांना झुलवीत ठेवून नाचवावयाचे कागदी घोडे.

आश्वासन—राजकीय थापेबाजी.

चोर—दुसऱ्याची संपत्ति ओबडधोबड मार्गांनीं लुटणारा मनुष्य.

श्रीमंत—दुसऱ्याची संपत्ति कायदा आणि अब्रू यांच्या तावडींत न सांपडतां लुटणारा मनुष्य.

आयुष्य—मरण येईपर्यंत कांहींतरी भानगडी करीत घालवावयाचा काळ.

पुस्तकावरील जप्ती—पुस्तक सपाटून खपण्याची हमखास युक्ति.

चुंबन—रेशनकार्डावांचून मिळणारी साखर.

लोकशाही—ज्या राज्यपद्धतींत लोकांची एकदांच आवश्यकता असते. (ती म्हणजे मतदानाच्या वेळीं.)

स्वातंत्र्य—नसतें तोंपर्यंत पाहिजेशी वाटणारी गोष्ट.

वाटाघाटी - फिसकटण्यासाठीं करावयाचीं बोलणीं.

खून—वैयक्तिक स्वार्थासाठीं अथवा द्वेषबुद्धीनें एका माणसानें केलेली दुसऱ्याची हत्या.

युद्ध—राष्ट्रप्रेमाच्या नांवाखालीं घाऊक प्रमाणांत चालणारी दरोडेखोरी.

मुत्सद्देगिरी—लुच्चेगिरीला असलेली राजनैतिक संज्ञा.

राजकारण—सुसंस्कृत रीत्या चालणारी सामुदायिक लाथाळी.

तह—पुढील युद्धासाठीं जास्तींत जास्त तयारी कशी करतां येईल याचा शांतपणें विचार करतां यावा म्हणून चालू युद्ध स्थगित करण्याचा करार.

निवडणुकीचा दिवस—राजकीय शिमगा.

आंतरराष्ट्रीयता—विकतचे पिंड देऊन श्राद्धें करण्याचें राजकारण.

विधिमंडळ—जेथें 'हात वर करणें' एवढाच 'विधि' फक्त करायचा असतो.

पुढाऱ्यांचें मरण—फंड गोळा करणाऱ्यांवर झालेली ईश्वरी कृपा.

सौजन्य—लोकांनीं मारलेल्या लाथा आणि केलेला अपमान सहन करण्यास लागणारा गुण.

पुढारीपण—आजकालचा एक फायदेशीर धंदा.

तज्ज्ञांचा अंदाज—शास्त्रोक्त पद्धतीनें केलेल्या चुका.

फितूर—एखादा माणूस आपल्यांतून दुसरीकडे जाणें.

मतपालट—दुसऱ्या पक्षांतला माणूस आपल्याकडे येणें.

कर्जबाजारी—समाजांत कर्ज मिळण्याची ऐपत असलेला मनुष्य.

रोखीचा व्यवहार—उधारी ठेवण्याची पत नसल्याचें लक्षण.

नळ—'गृहयुद्धा' चें पानिपत.

बुद्धि—श्रीमंतांकडे किंवा सत्ताधीशांकडे गहाण टाकण्याची वस्तु.

मन—नेहमीं चोरीला जाणारी वस्तु.

संदेश—कृतींत न आणण्यासाठीं पुढाऱ्यांनीं अनुयायांना द्यावयाचा सल्ला.

सल्ला:—दुसऱ्यांना गोत्यांत आणण्यासाठीं करायचें वैचारिक साहाय्य.

भांडण—अडाण्यांनीं केलेली जोडापट्टी.

वादविवाद—विद्वानांनीं केलेली जोडापट्टी.

नृत्य—पद्धतशीर लाथा झाडण्याची कला.

भागीदार—धंदा बुडवायला मदत करणारा मनुष्य.

विनय—दुसऱ्याच्या तोंडून आपला मोठेपणा ऐकण्यासाठीं, स्वत:कडे द्यायचा कमीपणा.

विश्वास—मागाहून फसण्यासाठीं प्रथम करायचा बावळटपणा.

म्हातारपण - तरुणींच्याकडे अधिकारदृष्टीनें पाहाण्याचें आणि त्यांच्या पाठीवरून प्रेमळपणें हात फिरविण्याचें वय.

गायन—जाग्या माणसांना झोंप आणणारा आणि झोंपणाऱ्यांच्या झोंपेचें खोबरें करणारा कार्यक्रम.

शिष्टाचार—स्वतःचे हाल करून घेण्याचा सभ्य लोकांचा रिवाज.

अंधार—सर्वांच्या अब्रूवर पांघरूण घालणारी निसर्गाची देणगी.

उजेड—'कांहींही करायची चोरीच' असें वाटायला लावणारी निसर्गातील वाईट गोष्ट.

संडास—सुंदर सुंदर कल्पना सुचण्याचें एकान्तांतील ठिकाण.

स्तुति—बावळट लोकांना खूष करण्याचें साधन.

निंदा—दुसरे लोक हलकट आहेत हें ठरविण्याचा रिकामटेकडा उद्योग.

शहाणपणा—दुसऱ्यांना फसविण्यास लागणारा गुण.

मूर्खपणा—पिढिजाद श्रीमंतीला लागणारा गुण.

फंड—पोट भरण्याचा एक राष्ट्रीय मार्ग.

कुरूपपणा—शील न बिघडविणारी ईश्वरी देणगी.

आंकडे—तरुणीच्या डोक्याला आणि कवीच्या हृदयाला बोंचणारा पदार्थ.

हृदय—लवकर फाटणारी एक लवचिक वस्तु.

करार—मागाहून मोडण्यासाठीं तूर्त करायची तडजोड.

थापा—नसलेला मोठेपणा खुलवून दाखविण्यासाठीं लागणारी कला.

रद्दीवाला—वर्तमानपत्रवाल्यांचा आश्रयदाता.

सिनेमांतील बॉक्स—सिनेमाचं तात्काळ अनुकरण करण्याचें ठिकाण.

धक्का—जो बायकांनीं पुरुषाला मारला असतां मेहरबानी समजली जाते पण पुरुषांनीं बायकांना मारला असतां विनयभंग होतो.

सज्जन-व्यवहारांत भिडस्तपणामुळें वारंवार फसणारा मनुष्य.

ब्रह्मचर्य—कुठेंच न जमल्यामुळें नाअिलाजानें स्वीकारायचा आश्रम.

धीरगंभीरपणा—मोठ्या लोकांच्या शिथिलपणाला आणि चेंगटपणाला असलेली संज्ञा.

नीति–माणसाला हमखास दरिद्री करणारें तत्त्व.

श्रीमंती–नीतीला गाडून मिळवतां येणारी स्थिति.

नैतिक विजय–निवडणुकींत पडलेल्या उमेदवाराचा होतो तो.

स्त्रीदाक्षिण्य–स्वतःची गैरसोय करून घेण्याचा पुरुषांच्या अंगांतील (दुर) गुण.

लायकी–नोकरीस लागतांना आपल्या अंगीं असते ती.

वशिला–नोकरीस लागतांना आपल्याशिवाय जे वापरतात ते.

गौप्य–उघड गोष्टीपेक्षां लौकर फुटणारी गोष्ट.

काळा चष्मा–कुणाकडेही (!) छातीठोकपणें टक लावून पाहतां येण्याचें साधन.

जन्मास येणें–आयुष्यांतील पहिली जन्मठेप.

लग्न करणें–डबल जन्मठेप.

देणगी—नांव प्रसिद्ध होण्यासाठीं मनांत नसतांना द्यायची रक्कम.

इन्कार—एखाद्या गोष्टीचा फार गवगवा झाल्यानंतर पुढाऱ्यांनीं करायचा नकारार्थी गुळमुळीत खुलासा.

व्यवहारज्ञान—एखाद्या माणसास फसविण्यासाठीं तो कितपत बावळट आहे हें समजण्यास लागणारें सारासार ज्ञान.

खुलासा—प्रथम झालेल्या गैरसमजुतीमध्यें आणखी भर.

गाढव—कायद्याच्या रूपानें मनुष्यप्राण्याचें नियंत्रण करणारा प्राणी.

मानपत्र — व्याकरणांतील गुणवाचक विशेषणांची यादी.

वरात—वैवाहिक जीवनाची पहिल्याच रात्रीं निघणारी धिंड.

अर्धांगी—नवऱ्याचें अर्धें अंग खलास करून टाकणारी.

पत्नीचा शब्द—वरच्यावर झेलण्याचा पदार्थ.

अधिकारी— हाताखालच्या लोकांची लाक्षणिक हजामत करण्यासाठीं नेमलेला माणूस.

तत्त्वज्ञान—भरल्यापोटीं विद्वानांनीं करायचा काथ्याकूट.

म्युनिसिपालिटीचा कंदील—नागरिकांच्या समजुतीसाठीं आणि चोरांच्या सोयीसाठीं लावलेला दिवा.

महत्त्वाकांक्षा—मोठ्या लोकांच्या असमाधानीवृत्तीला असलेली संज्ञा.

दिलदारपणा—मोठ्या लोकांच्या उधळ्या वृत्तीला असलेली संज्ञा.

ध्येय—हाताशीं न लागेल अशा बेतानें लांब ठेवलेली वस्तु.

चर्चा—विद्वानांनीं करायची लाथाळी.

दारिद्र्य—मूर्खपणानें किंवा प्रमाणिकपणें वागल्याचें फळ.

अश्लीलता—सभ्य माणसांना चोरून आवडते ती.

स्थितप्रज्ञ—इरसाल मूर्खाला असलेली शास्त्रीय संज्ञा.

विधवा विवाह—'सेकंड्हँड्' सौदा.

चंद्र—कवींच्या तडाख्यांत सांपडलेला दुर्दैवी प्राणी.

प्राणांतिक उपोषण—फाडकन् प्रसिद्धी मिळवण्याचें प्रभावी साधन.

घोषणा—कृतींत न आणण्याकरितां पुढाऱ्यांनीं अनुयायांना मारायच्या थापा.

मोसंब्याचा रस—प्राणांतिक उपोषण (?) सोडण्याचें राष्ट्रीय पेय.

सत्ता—मूर्खपणाला भरपूर वाव असणारी गोष्ट.

छत्री—रस्त्यांत भेटणाऱ्या देणेंकऱ्याचें तोंड चुकविण्याचें साधन.

घर—सावकाराकडे गहाण टाकायची इमारत.

गॅलरी—माडीवरून खालीं केर टाकण्याची जागा.

वर्गणी—प्रतिष्ठित भिक्षा.

कादंबरी—वाचायला नेऊन लांबवावयाची वस्तु.

खिसेकापू—जपून राहण्याचें शिक्षण देणारा.

धुळवड—सार्वजनिक गटारसफाईचा दिवस.

तरुणीचें तोंड—'अय्या' नि 'इश्श' म्हणायचा कारखाना.

अफू—नापास आणि प्रेमभग्न लोकांना आवडणारा पदार्थ.

नेत्रकटाक्ष—उल्लू तरुणांना आणि भुक्कड कवींना घायाळ करणारी शक्ति.

वेणीचा शेपटा—प्रसंगीं स्त्री नागीण असते यांचें प्रतीक.

ब्रासो—दागिने साफ करण्याचा पदार्थ.

शांतता—जी स्थापन करण्याकरितां मोठमोठीं युद्धें होतात तीं.

वायदा—सध्यां एखादी गोष्ट पदरांत पाडून घेण्यासाठीं द्यायचें खोटें वचन.

चूक—अक्कल खरेदी करण्यासाठीं करावयाची गोष्ट.

अंडीं—सभेंत फेंकण्याची वस्तु.

घटना—संस्थेनें कोणकोणते नियम पाळायचे नाहींत याची केलेली यादी.

तुरुंगवास—बेकारी आणि जागेची टंचाई यांवर रामबाण उपाय.

मिशा—पोटांत जाणारे पदार्थ साफ करण्याचा ब्रश.

कलेपासक—अंगांतील कलेमुळें उपास काढणारा.

क्रॉप—पद्धतशीर अर्धवट हजामत.

राख—संसारांत पत्नी डोक्यांत घालून घेते आणि नवऱ्याला अंगाला फासावीशी वाटते असा पदार्थ.

पत्रक – पुढाऱ्यांचा कागद नासण्याचा रिकामटेकडा उद्योग.

अध्यक्षस्थान नेहमीं नालायक माणसांना मिळणारा मान. (प्रत्येक अध्यक्ष आपण या जागेला लायक नसल्याचें स्वतःच कबूल करीत असतो.)

पदर—नेहमीं स्थानभ्रष्ट होणारा पातळाचा भाग.

क्रांति—मोठ्या प्रमाणावर केलेल्या हुल्लडबाजीला असलेली राजनैतिक संज्ञा.

राजनीति—एकमेकांना बनविण्याचें राष्ट्राराष्ट्रांचें शास्त्र.

शिस्त—स्वत्व विसरून वरिष्ठांचे गुलाम होण्याच्या क्रियेचें गोंडस नांव.

टोपी—सभ्य माणसानें स्वतः घालायची आणि इतरांनीं दुसऱ्यांना घालायची वस्तु.

पांढरी टोपी—सामाजिक गुन्हे लपविण्याचें प्रतिष्ठित साधन.

अग्रलेख—संपादकाच्या सर्वगामी अकलेचें दैनंदिन प्रदर्शन.

मनुष्य—परमेश्वरानें निर्माण केलेला भस्मासूर.

ॲटम बाँब—पत्नीच्या तोंडाच्या मुलुखमैदानी तोफेची शास्त्रीय प्रतिकृति.

तलवार—एका वेळीं एकाचाच गळा कापण्याचें साधन.

लेखणी—एकाच वेळीं असंख्य लोकांचा गळा कापण्याचें साधन.

निष्ठा—अंधश्रद्धेला असलेलें प्रतिष्ठित नांव.

मिसळ—हॉटेलांतील शिल्लक राहिलेल्या पदार्थांची पद्धतशीर विल्हेवाट.

टेबल साफ करणें (हॉटेलांतील)—एकत्र असलेली घाण सारख्या प्रमाणांत पसरणें.

माणुसकी—जी नेमकी माणसांतच सांपडत नाहीं अशी चीज.

अबला—नवऱ्याचें बल नाहींशी करणारी.

अबोला—नवऱ्याला शरण आणण्याचा सौम्य मार्ग.

आदळआपट—नवऱ्याला विनशर्त शरण आणण्याचा खर्चिक मार्ग.

शिव्या—ओजस्वी आणि अंतःकरणाला जाऊन भिडणारें वाङ्मय.

नवरा—पोसण्यापुरता पत्नीचा मालक असलेला आणि बाकी इतर सर्व वेळीं तिचा दास असलेला पामर.

काव्य—दुःखाच्या भरांत वाल्मिकीच्या हातून चुकून झालेला भयंकर गाफीलपणा.

जीवश्च कंठश्च मित्र—प्रसंग पडल्यास कंठ दाबून जीव घेणारा मनुष्य.

अनाथ बालकाश्रम—लफडेबाजांची परस्पर सोय.

उंदीर—पुस्तकांची मनापासून आवड असणारा प्राणी.

शील—एकहातीं असतें तोंपर्यंत टिकणारी गोष्ट.

निर्वाणीचा इशारा—शाब्दिक दमदाटीची पराकाष्ठा.

एकमत होणें—अवघें एकच मत मिळणें.

तात्त्विक मतभेद—कार्यांत विघ्न निर्माण करण्याची शिष्टसंमत पद्धत.

चहाडी—खरें सांगणें या अर्थी हलक्या प्रतीचा शब्द.

नेतृत्व—अनुयायांना खड्ड्यांत टाकण्यासाठीं पुढाऱ्यांनीं करायचें कार्य.

फट—शेजारच्या खोलींत काय चाललें आहे हें गुपचुपपणें पाहाण्याची सोय.

मंडई—गर्दीमुळें स्त्रियांना चुकून धक्के मारण्याचें ठिकाण.

पुरावा—साक्षीदारानें सांगायची काल्पनिक हकीगत.

हितचिंतक—पदरची दमडीही न देतां कोरडा शाब्दिक पाठिंबा देणारी लबाड मंडळी.

सहानुभूति—आपल्या अंगाशीं कांहीं भानगड येणार नाहीं याची खात्री करून घेऊन एखाद्याला द्यायचा शाब्दिक पाठिंबा.

गालगुच्चा—चुंबनाचा चान्स् न मिळणाऱ्याची त्यांतल्या त्यांत सोय.

कुत्रा—मनुष्यप्राण्याच्या संगतींत राहूनहि प्रामाणिकपणा टिकवून धरणारा प्राणी.

गुन्हेगार—गुन्हा केल्यावर सांपडण्याचा मूर्खपणा करणारा प्राणी.

प्रतिष्ठित गृहस्थ—लफड्यांत न सांपडण्याची दक्षता घेऊन गुन्हा करणारा धूर्त प्राणी.

कपबशी—नवऱ्याशीं भांडल्यावर फोडायची वस्तु.

ब्रह्मचारी—विवाहितांच्या सुखाचा हेवा करणारा माणूस.

विवाहित—ब्रह्मचारी आणि विधुर यांच्या सुखाचा हेवा करणारा माणूस.

सोळावं वर्ष—कुरूप पोरी मस्त दिसूं लागण्याचं वय.

काटकसर—कंजुषपणाचें गोंडस नांव.

भूक—गरीबांच्या पोटाला लागलेली व्याधि.

अजीर्ण—श्रीमंतांच्या पोटाला लागलेली व्याधि.

अन्नधान्याचा प्रश्न—नेत्यांचा आणि मंत्र्यांचा मेजवानीच्या वेळीं खाद्य पदार्थांवर ताव मारतांना करायच्या चर्चेचा विषय.

सायकल — नाजूक ॲक्सिडंट करण्याचें वाहन.

खगोलशास्त्रज्ञ — नेहमीं कोटी, अब्ज आणि त्याच्याहि वरच्या संख्यांमध्यें वावरणारी मंडळी.

विरह — वाटेल तसं राबवून घेण्याचं हक्काचं माणूस दूर गेल्यामुळें पत्नीनें करायचा शोक.

सुधारलेला अभ्यासक्रम — एक ना धड नि भाराभर चिंध्या.

खोटे पैसे — दानधर्मासाठीं उपयोगी पडणारें द्रव्य.

तुरुंगवास — देशभक्तीचें सर्टिफिकेट.

सार्वजनिक संडास — कामशास्त्राचीं चोरटीं विद्यालयें.

लहर — श्रीमंत आणि अधिकारी यांच्या अंगीं असावा लागणारा आवश्यक (अव) गुण.

कर्तव्य — जाणून बुजून, मोबदल्याशिवाय काम करण्याचा अव्यवहारीपणा.

गोष्टा — कुरूपपणा लपविण्याचें विनयशील साधन.

आपलेपणा — वेळीं प्रसंगीं फुकटांत काम करून घेण्यासाठीं दाखवायचें जवळचें नातें.

दोस्त राष्ट्रें — राजकीय डावपेंचाच्या त्रांगड्यामुळें, नाइलाजानें जुळून येणारी राष्ट्राराष्ट्रांची मैत्री.

मित्र — कांहीं दिवसांनीं त्याच्या बहिणीकडे वाशिला लावण्यासाठीं घेतलेला आधार.



बायकोबरोबर हिंडतांना

मनुष्यप्राण्याच्या आयुष्यांत ज्या ज्या दुर्घटना निर्माण होतात किंवा येतात त्यांत बायकोबरोबर हिंडणें या गोष्टीला बरेंच प्राधान्य द्यावें लागेल. बायकोबरोबर हिंडण्यांत काय हाल आहेत हें माझ्यासारख्या नवख्या माणसापेक्षां अनुभवी माणसांनाच अधिक माहित !

बायकोबरोबर बाजारांत जा, सिनेमाला जा, समारंभाला जा किंवा आणखी कुठेंही जा, प्रत्येक ठिकाणीं ती आपली कटकट केल्यावांचून राहाणार नाहीं. कांहीं मासले खालीं देतों म्हणजे खात्री पटेल.

दिवाळी आली. बायको म्हणाली, ' दिवाळीला पातळ घेतलें पाहिजे. '

' बरं आहे, चल. ' असं म्हणून, स्वतःच्या पसंतीचीं पातळें घेतां यावींत आणि भरपूर नमुने पाहतां यावेत म्हणून मी तिला दादरला घेऊन गेलों.

एका मोठ्या दुकानांत गेलों. दुकानदाराला साधारणपणें पन्नास रुपयांच्या आंत बसेल अशीं पातळें दाखवावयास सांगितलें. त्यानें आर्ट सिल्कचीं, गर्भरेशमी, छापील रेशमी, जरी किनारी, फॅशनेबल पदराचीं अशीं विविध प्रकारचीं पातळें दाखविलीं. टेबलावर असंख्य पातळांचा ढीग पडला. तेव्हां सौभाग्यवतीनें पातळांची निवड सुरू केली. एका पातळाची उभी काडी. दुसऱ्याची आडवी काडी, तिसऱ्याची किनार, चौथ्याचा पोत, पांचव्याचा पदर, सहाव्याचा सुळसुळीतपणा, सातव्याचा रंग, आठव्याचा नेसता पदर, नवव्याचा वजनांतील हलकेपणा आणि दहाव्या पातळाची (तिच्या दृष्टीनें) माफक किंमत अशी प्रत्येक पातळांतली एक एक गोष्ट तिला पसंत पडली; आणि तिनें दुकानदाराला या पातळासारखा पदर असलेलें, त्या पातळासारखी किनार असलेलें, त्या पातळासारखा रंग असलेलें इ. इ. दहा पातळांतील एक एक गुण एकत्र आढळणारें (काल्पनिक) पातळ आहे काय म्हणून विचारलें. अर्थात् तसलें पातळ दुकानांत असणें अशक्य असल्यामुळें सौ. नाक मुरडून म्हणाली, ' चला, बाई, इथं नाहींच मुळीं तसलं पातळ ! आपण दुसऱ्या दुकानांत पाहूं या ! '

असं म्हटल्यावर आम्ही दुसऱ्या दुकानांत गेलों. मग तिसऱ्या, चौथ्या, पांचव्या, सहाव्या दुकानांत गेलों. प्रत्येक ठिकाणीं तिनें हुबेहूब वरीलप्रमाणें प्रकार केला आणि शेवटीं तिलाच कंटाळा आला म्हणून साठ रुपयांचें एक पातळ तिनें विकत घेतलें. नुसतें पातळ विकत घ्यायचें नसतें या रूढीमुळें तिनें ब्लाउझचें कापडहि खरेदी केलें आणि मला पांसष्ट रुपयांना चाट दिली.

एकदां आम्ही बाजारांतून हिंडत असतांना ती म्हणाली, ' मला एक स्टेनलेस् स्टीलचा चमचा विकत घ्यायचा आहे. '

--मीं म्हटलें, ' घे, समोरच दुकान आहे.'

आम्ही दुकानांत गेलों. तिथें असंख्य भांडीं पाहून ती हुरळून गेली आणि ' हें पातेलें दाखवा, तो तांब्या दाखवा ' असें करून तिनें एक तास मोडला. आपण नुसता चमचा घ्यायला आलों आहोंत ही गोष्ट ती त्या वेळीं जणूं विसरूनच गेली होती. थोड्या वेळांत तिनें एक शेर दूध मावेल एवढें पातेलें, एक ताट, एक फुलपात्र आणि एक डबा एवढें साहित्य खरेदी केलें. माझ्या हातांत तें ओझें देऊन, ती पर्स उडवीत हंसत हंसत दुकानाच्या पायऱ्या उतरूं लागली. मीं थोड्याशा खवचटपणें म्हटलें, ' अग, पण आपण नुसता चमचा घ्यायला आलों होतों ना ? '

' मीं मुद्दामच घेतला नाहीं !' ती म्हणाली. चमचा मेला नसला तर नसला. त्याच्यावांचून अडत नाहीं एवढं. आतां एवढा खर्च झालाय् ना? म्हणून मीं ही मुद्दामच काटकसर केली आहे ! '

बोला, आहे कीं नाहीं अजब गणितशास्त्र ?

भाजी खरेदी करतांना तर मी तिच्या शेजारीं कधींच उभा राहात नाहीं. कारण ती भाजीवाल्या बाईशीं अशी कांहीं हुज्जत घालते कीं, विचारूं नका; आणि मग एखादी आगाऊ भाजीवाली तिच्या आईबापाचा उद्धार करते, तें ऐकायला नको म्हणून मी आपला चार पावलें दूरच राहातों.

एकदां एका बाईजवळ भाजी घेत असतांना तिनें त्या बाईशीं हुज्जत घालायला सुरुवात केली. मी दुर्दैवानें माझ्या बायकोच्या शेजारींच चुकून

उभा होतों. त्या बाईनें 'हि' चा उद्धार केला आणि मला त्रयस्थ समजून माझ्यासमोरच माझ्या बायकोची निंदा केली.

सौभाग्य-वस्तु-भांडार दिसलं रे दिसलं कीं हिचं देहभान हरपून जातें. तिला काय घेऊं नि काय नको असें होऊन जातें. मी बरोबर आहें याचा तिला संपूर्ण विसर पडतो. एक दृष्टया मला तें ठीक वाटतें. तिची खरेदी होईपर्यंत मी रस्त्यावरच्या 'शोभे'कडे पाहात उभा राहातों. बहुतेक सर्व नवरे अशा प्रसंगीं असेंच करतात.

बायकोला जर नुसता एक गोंडा विकत घ्यायचा असेल तर ती प्लॅस्टिकच्या बांगड्या, लोंकर, भरतकामाचा रंगीत दोरा, गंगावनें (केशसंभार विपुल असूनहि उगीच!), पिना, गार्टर्स, डोनट, अंबाड्यावरची जाळी, कुंकू, पावडर, स्नो, नखाचा रंग, एक रुपयावाली खोट्या मोत्यांची माळ, इत्यादि यच्चयावत् वस्तूंच्या किंमती विचारून आणि जणुं कांहीं त्या घ्यायच्याच आहेत अशा थाटानें घासाघीस सुरू करते. दररोज येणाऱ्या असंख्य बायकांबरोबर बडबडून बडबडून बिचाऱ्या दुकानदाराचें कातडी तोंड फाटून कसें जात नाहीं याचेंच मला आश्चर्य वाटतें.

एकदां अशीच एक किरकोळ वस्तु विकत घेत असतांना तिनें एक तास मोडला. तेव्हां मीं कंटाळून तिला म्हटलें, 'चल ना आतां, किती उशीर झालाय्!'

तर ती फणकाऱ्यानें लगेच म्हणाली, 'तुमची मेली सदा घाईच! शांतपणें कुठं कांहीं पाहूंसुद्धां द्यायचे नाहींत दोन मिनिटं!' असं म्हणून जी वस्तु विकत घ्यायची होती तीहि न घेतां, धुसफुसत माझ्याबरोबर निघाली आणि रस्त्यानें तिनें सारखी भुणभुण सुरू केली. या कटकटीपेक्षां, आणखी थोडा वेळ थांबून तिनें ती वस्तु घेतली असती तर पीडा गेली असती असं मग मला वाटूं लागलं.

घराबाहेर पडल्यावर नुसत्या खरेदीवरच तिचं भागत नाहीं; ठराविक ठिकाणीं तिला ठराविक वस्तु खायला लागतात. चौपाटीला गेलं कीं, भेळ आणि पाणीवाला नारळ तिला लागतो; तर माटुंग्याला गेलं कीं, मसाला दोसा आणि

इडली सांभार तिला पाहिजे असतें; गिरगांवला गेलं कीं वेलणकरांच्या हॉटेलांतील अख्खा कांदा खाण्याचे डोहाळे तिला लागतात; तर दादरला गेलं कीं मामा काण्यांच्या हॉटेलांतील लसणाच्या खमंग चटणीनें तिच्या तोंडाला पाणी सुटतें. तिचे हे जिभेचे चोचले अर्थातच मला पदराला चाट लावून घेऊन पुरवावे लागतात.

सिनेमाच्या बाबतींतहि तोच खर्चिकपणा. माझ्या परस्पर जाऊन ती तिकिटें रिझर्व करून आणते. मीं तिला एकदां म्हटलें, 'अग, कशाला हीं एवढीं एक रुपया पांच आणे दराचीं महागाईचीं तिकिटें काढून आणलींस ?'

त्यावर ती म्हणाली, 'ध्या ! म्हणजे मी एवढ्या तंगड्या तोडून तिकिटें रिझर्व करून आणलीं आणि पैशाची बचत केली ती कुठंच गेली ! '

' बचत कशी ? ' मीं विचारलें.

' बचत नाहीं तर काय ? ' ती म्हणाली, ' जर संध्याकाळीं—आयत्या वेळीं—आपण गेलों असतों तर आपल्याला एक रुपया पांच आण्यांचीं तिकिटें मिळालीं नसतीं आणि मग आपल्याला दोन रूपये दराचीं तिकिटें काढावीं लागलीं असतीं ? '

' अग, पण आपण आजिबात हा सिनेमा पाहिलाच नसता तर सगळीच बचत झाली नसती का ? ' मीं म्हटलें.

' जळलं मेलं लक्षण ! तुम्हांला मेली हौसच नाहीं कसली ? सदान् कदा पैसा पैसा करतां. ' इत्यादि कुरकूर तिनें सुरू केली.

लोकहो, तुमचाहि अनुभव माझ्याप्रमाणेंच असेल. बायका इथून तिथून सारख्याच ? परंतु काय करावें ? त्यांच्यावांचून चालत नाहीं ना ! कुणी तरी म्हटलं आहे ना, ' लाईफ् मायनस् वाईफ् इज् इक्वल टु झीरो ! ' आमचं जीवन तसं शून्यवत् होऊं नये म्हणूनच मला तिच्या सगळ्या मिजाशी संभाळून तिच्याबरोबर प्रेमानें वागावें लागतें आणि तिच्या कलानें घ्यावें लागतें.

(ता. क.—वरील लेखांतली माझी बायको काल्पनिक आहे—लेखक)

मी आणि भारत

माझी आणि आपल्या भारत देशाची परिस्थिति नेहमीं सारखीच असते. भारताच्या बाबतींत ज्या घटना घडतात त्याच घटना माझ्याहि घरांत अल्प प्रमाणांत घडून येत असतात, हे चमत्कारिक योगायोगच नाहींत काय? खालीं कांहीं उदाहरणें देतों म्हणजे मी आणि भारत देश कसे एकरूप झालों आहोंत हें स्पष्ट दिसून येईल.

भारतांत अन्नधान्याचा तुटवडा पडूं लागला तेव्हां माझ्या घरांतहि तो पडूं लागला. तिकडे पं. नेहरूंनीं ज्या दिवशीं अमेरिकेच्या 'सत्यवाना'कडून (ट्रूमनकडून) उसना गहूं मागून घेतला त्याच दिवशीं माझ्या बायकोनें शेजारच्या सावित्रीबाईकडून मापटंभर गहूं उसने आणले.

मागं ब्रिटिश सरकारनें भोंकाचे पैसे सुरू केले आणि त्याच महिन्यापासून माझ्या खिशालाही भोंक पडलें. [कारण त्याच महिन्यांत माझं लग्न झालं.]

१९४७ सालीं भारताचे दोन तुकडे झाले आणि त्याच सालीं आमच्या घराच्या वांटण्या झाल्या.

भारत आणि पाकिस्तान यांतून समाईक वाहाणाऱ्या नद्यांच्या पाण्यावरून जेव्हां भांडणें उपस्थित झालीं त्याच दिवशीं माझ्या बायकोचें शेजारणीशीं नळाच्या पाण्यावरून कडाक्याचें भांडण झालें.

भारताची तिकडे पंचवार्षिक योजना आंखली गेली तर इकडे आमच्या घरांत 'द्विवार्षिक' योजना सक्रिय अमलांत आलीसुद्धां.

भारतसरकारनें देशांतील अंतर्गत सुधारणांसाठीं जागतिक बँकेकडे ज्या दिवशीं कर्ज मागितलें त्याच्या दुसऱ्या दिवशींच मी बायकोच्या बाळंतपणाच्या खर्चासाठीं बँकेकडे अर्ज टाकला.

भारत सरकारनें ज्या दिवशीं कांहीं जुना लष्करी माल विकायला काढला त्याच आठवड्यांत माझ्या बायकोनें माझे (मी माझे कुठल्याशा दलांत कीं शाखेंत जात असतांना शिवलेले) खाकी कपडे बोहारणीला देऊन एक नैवेद्याची वाटी घेतली.

भारत सरकारचे मंत्री सारखें कांहीं ना कांहीं बडबडत असतात, तर तेंच कार्य घरांत माझी पत्नी तितक्याच उत्कृष्टपणें करीत असते.

भारत सरकार कररूपानें माझ्या एका खिशांतून माझ्या न कळत पैसे काढून घेतें, तर दुसऱ्या खिशांतून तितक्याच सफाईनें माझी बायको पैसे पळविते.

भारताचा कितीहि अपमान झाला तरी भारत तो सहन करतो; आणि ऑफिसमध्यें दररोज मी तेंच करतों.

भारतांतून नेहमीं वाहाणाऱ्या गंगायमुना माझ्या घरांतही दररोज वाहात असतात.

भारताच्या पंतप्रधानांचा तिकडे अमेरिकेंत ज्या दिवशीं प्रचंड सत्कार झाला त्याच्या दुसरे दिवशींच मी सासुरवाडीला गेलों असतां सासऱ्यानें मोठ्या आनंदानें (खरं सांगायचं म्हणजे आंबट चेहऱ्यानें) माझें स्वागत केलें.

भारत सरकारला आणि मला राहाण्याच्या जागेचे प्रश्न सारखेच भेडसावीत आहेत.

भारत सरकारनें खरेदी केलेलीं ' तय्यार घरें ' आणि मीं खरेदी केलेले ' तयार कपडे ' एकाच दिवशीं पाण्याशीं तोंड दिल्याबरोबर बाद ठरले.

करबुडव्या लोकांची यादी भारत सरकारनें ज्या दिवशीं केली त्याच्यानंतर दोनच दिवसांनीं मीं माझ्याकडून उसने पैसे घेऊन ते बुडविलेल्या माझ्या जिवलग मित्रांची यादी केली.

भारत, अमेरिकेच्या मदतीमुळें नेहमीं अमेरिकेच्या बाजूला झुकलेला असतो आणि मीहि त्याच देशांतल्या (अमेरिकेंतल्या) गव्हाची चपाती खात असल्यामुळें, आणि त्याच अन्नावर माझा पिंड पोसला गेला असल्यामुळें माझीही सहानुभूति नेहमीं अमेरिकेच्या बाजूलाच असते.

राजकीय पार्श्वभूमीवरून प्रेम

स्थळ—चीनमधील यांगत्सिकँग नदीच्या कांठचें उपवन.

काळ—चालू.

वेळ—चांदण्या रात्रीची.

पात्रें—शिकेकाई—चिनी नवयुवक.

कुकूचकाई—त्याची प्रेयसी.

शिकेकाई—प्रिये, तुला या वेळीं काय वाटतं ?

कुकूचकाई—सख्या, जिवलगा ! साऱ्या जगांत कम्युनिझम आला आहे अशी गोड गोड कल्पना माझ्या हृदयांत तरळत आहे.

शिकेकाई—अहाहा ! प्रिये, किती छान आहेस ग तूं ! राजकीय गोष्टींतून तूं आपलं प्रेम व्यक्त करतेस. तो पाहिलास का चंद्र ?

कुकूचकाई—कित्ती छान आहे नाहीं ?

शिकेकाई—आपल्या सर्वशक्तिमान् स्तालिननें बनवला आहे तो.

कुकूचकाई—अय्या ! खरंच का ? मला वाटलं तो त्या टिनपाट् परमेश्वरानंच बनवला आहे.

शिकेकाई—त्याची काय टाप लागली आहे असला माल बनवायची ?

कुकूचकाई—प्राणसख्या, या नदीच्या पाण्यांत तुझं प्रतिबिंब बघ कसं छान पडलंय तें !

शिकेकाई—होय ना ! जणुं कांहीं माओच्या हृदयांत पडलेलं स्तालिनचं प्रतिबिंबच !

कुकूचकाई—सजणा, तुला किती छान उपमा सुचतात रे ! आतां मला एखादी उपमा दे बरं.

शिकेकाई—तूं यांगत्सिकँग नदीसारखी आहेस !

कुकूचकाई--तें रे कसं ?

शिकेकाई--या नदीच्या पात्राप्रमाणें तूं वारंवार बदलतेस.

कुकूचकाई—(लटक्या रागानें) आम्ही नाहीं बोलत जा !

शिकेकाई—(हंसत) पाठवूं का सामुदायिक शेतीवर ? (हें ऐकल्यावर लगेच ती त्याला बिलगून बसते.)

शिकेकाई—तो पाहा मंगळाचा तारा ! (गंभीरपणें) त्याच्याकडे पाहिल्यावर मला नेहमीं आदर वाटतो.

कुकूचकाई--तो कां ?

शिकेकाई--त्याचा लाल रंग पाहा ना ! हा लाल तारा आहे. आज लाखों वर्षें या ताऱ्यावर कम्युनिझम् चालत असला पाहिजे. तो आमचा ध्येयतारा आहे.

कुकूचकाई—मला आणून दे तो तारा.

शिकेकाई--प्रिये, तो आहे तिथंच बरा आहे. ध्येय नेहमीं बऱ्याच अंतरावर आणि भरपूर उंचीवर असावें. बरं, तें जाऊं दे. एक गोड गोड भावगीत म्हण बघूं.

कुकूचकाई—**गगनिं उगवला रशियन तारा ।**
ठार करुनियां रशियन झारा ॥
माओच्या या मिचमिच ताऱ्या ।
चंगू कै शेकूचा वाजवि बोऱ्या ॥

शिकेकाई—प्रिये, आतां गाणें पुरे. आतां एक गोड चुंबन दे. परंतु थांब. आज तूं ओंठांना लाल रंग लावला नाहींस ? अशा सुन्या ओंठांचें अपवित्र चुंबन मी घेणार नाहीं. जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं वसत असलेला प्रभु स्तालिन हें पाहील तर तो माझ्यावर कोपेल ना !

कुकूचकाई—(लिपस्टिक् लावून) हं, आतां घे चुंबन.

शिकेकाई--(चुंबन घेत) प्रिये, यावेळीं मला ' रशिया-सुखा ' चा (' स्वर्गसुखा ' चा या चालीवर) आनंद होत आहे.

कुकूचकाई—सख्या, तूं माझा राशिया आहेस, तूंच माझा सैबेरिया आहेस; चीन आहेस. तूंच माझा मॉस्को आणि तूंच माझा कोयता–हातोडा आहेस.

शिकेकाई—लाडके, तूंच माझी क्रांति आहेस अन् तूंच माझी सामुदायिक शेतीहि आहेस.

(दोघें एकमेकांना आलिंगन देऊन उभीं राहातात आणि 'अटेन्शन्' मध्यें उभीं राहून राष्ट्रगीत म्हणून प्रेमाचा प्रोग्राम खलास करतात. नंतर, सध्यां मॉस्कोंत पाऊस पडत असेल कीं काय अशी शंका आल्यावरून, चांदण्या रात्रींही डोक्यावर छत्री धरून तीं दोघें आपआपल्या घरीं निघून जातात.)

आर्थिक परिस्थिति आणि मी

शब्दकोड्यांत पहिल्या नंबरचं बक्षिस लागल्यावर त्या पैशांचा उपयोग कसा करायचा आणि त्याबद्दल मुलाखत घ्यायला येणाऱ्या प्रतिनिधींशीं कसं बोलायचं याचा काल्पनिक आराखडा तयार करीत मी दुपारचा पडलों होतों. महिन्यांतला शेवटचा रविवार होता. त्यामुळें खिशांत कांहीं आणेच शिल्लक होते. ज्या ज्या वेळीं मी असा कफल्लक असतों त्या त्या वेळीं मी मनाला रंजविण्यासाठीं हजारों रुपयांच्या काल्पनिक उलाढाली करतों. मी काल्पनिक मासिक काढतों. तें मासिक एकदम लोकप्रिय होतें. दरमहा एक लाख प्रती खपतात. आणि मी दरमहा लाखों रुपये काल्पनिक रीत्या मिळवतों.

परंतु मंडळी, माझी खरी आर्थिक परिस्थिति निराळीच आहे. मी एका 'तंत्र–विद्यालयांत' काम करणारा एक सामान्य माणूस आहें. अधून मधून साहित्याशींहि सलगी करतों. त्यामुळें मी स्वतःला लेखकहि म्हणवून घेतों. मराठी लेखकांचं आणि लक्ष्मीचं एवढं वैर कां आहे ? परंतु वस्तुस्थिति तशी आहे खरी ! आतां माझीच कहाणी ऐका, म्हणजे कळेल.

अडीअडचणीच्या वेळीं विकावा म्हटलं तर माझ्या बायकोचा एकच दागिना आहे. तो विकतां येत नाहीं. अन् तो म्हणजे मी स्वतः ! तात्पर्य काय, घरांत विकायला सोन्याचे दागिनेच नाहींत ! तीस तारखेला विकतां येण्याजोगी एकच वस्तु माझ्याकडे असते. अन् ती म्हणजे आदले दिवसापर्यंत सांचलेले वृत्तपत्राचे एकोणतीस अंक. (कोड्यांच्या पुरवणीसह.) ते अंक काखोटीला मारून मी किंग्ज् सर्कलच्या रद्दीवाल्याला विकतों. बिचारा फार सज्जन माणूस आहे. पैसे द्यायला तो उशीर लावत नाहीं. मला त्याचा आणखी एक गुण आवडतो. तो म्हणजे त्याच्याकडे येणारें कोणतेंहि साहित्य असो; त्याला तो वजनमापांची दृश्य कसोटी लावून त्याचें मूल्यमापन करतो. संपादकीय कसोटीच्या वेळीं लागणाऱ्या प्रतिभा, मौलिकता, कल्पकता इत्यादि अदृश्य शब्दांचा बुजबुजाट तेथें नसतो.

रद्दीचें भेंडोळें विकायला नेतांना कुणी ओळखीचा भेटला म्हणजे तो सहजच विचारतो, 'काय, बुवा, (माझें आडनांव) एवढी मूठभर रद्दी काय विकायला नेतां ?' तेव्हां मी बेफिकीरपणें म्हणतों " तसं नाहीं, घरांत अगोदरच जागा कमी त्यांत ही अडगळ कशाला ? नाहीं तरी घरांत 'ही, स्वयंपाकाच्या वेळीं भांडीं उतरायला ती फाडूनच टाकणार ? तेव्हां म्हटलं टाकावी देऊन रद्दीवाल्याला ! चार आठ आणे आले तर पोराला लिमलेटच्या गोळ्या घेऊन जाईन !

मी काय म्हणालों तें खरंच आहे असं समजून तो बिचारा निघून जातो. आतां खरं सांगूं त्या आठ आण्यांचं मी काय करणार तें ? अहो या आडवड्यांतले माझ्या कार्डावरेच तांदूळ सोडून द्यायची पाळी आली आहे. तसं आपलं सरकार फारच चांगलं आहे. तें आठवड्याला दोन तीन छटाकच तांदूळ देतं म्हणून बरं आहे. अहो, आठ आण्यांच्या आंत हिशेब बसतो !

मीं जेव्हां लेखन – व्यवसाय करायला सुरुवात केली तेव्हांच मला आंतारिक जाणीव झाली कीं, आपणांला यापुढें नेहमीं पैशांची चणचण भासणार ! लेखक म्हणून नांव छापून येऊं लागलं कीं, फुकटची धुंदी (फुकटांत–मोबदला न मिळतां–लेख छापून आल्यामुळें येणारी) आली आणि इतर चार चौघांसारख्या व्यावहारिक गोष्टी करणं मला कमीपणाचं वाटूं लागलं अन् नेमकं त्यामुळंच माझं आर्थिक दृष्ट्या नुकसान होऊं लागलं.

आमच्या घरांतला शेवटला आठवडा प्रेक्षणीय (अथवा अप्रेक्षणीय) असतो. 'तूप' म्हणूनच चापून वापरत असलेलें 'डाल्डाला घृतम्' सुद्धां खलास होतें; अन् आठवडाभर आमच्या चेहऱ्यावर 'डी' व्हिटॅमिनचा 'अभाव प्रकर्षानें दिसूं लागतो. डाल्डा विकत आणावा म्हटलं तरी कमींत कमी २ पौंड डबा आणला पाहिजे, अन् त्याला पडतात जवळ जवळ अडीच रुपये ! आणि या वेळीं आमच्या खिशांत अडीच आणेहि असायची पंचाईत !

अन् अशा हलाखीच्या आठवड्यांत माझ्याकडे एकदां एक पाहुणे आले. (पाहुणेच ते ! केव्हांहि उपटणार.) आतां आली कां पंचाईत ! आमच्या घरांत गेल्या दिवाळींत एकदां अर्धा रत्तल लोणकढं तूप आणलं होतं त्यानंतर

अजूनाहि तसलं तूप घरांत आलं नाहीं. त्यामुळं पाहुण्यांच्या नाशिकीं लोणकढं तूप नव्हतेंच परंतु डाल्डाहि नव्हता. जेवायला ताटं मांडलीं; भाजी, भात इ. पदार्थ वाढले. मी नि पाहुणे पाटांवर बसलों. पानावर बसल्यावर सामान्यतः तूप वाढण्याचा रिवाज आहे. मी बायकोशीं नेत्रपल्लवी करूं लागलों; आणि तिनं मला समजतील अशा खुणा केल्या. नंतर तिनें एका तामल्यांत चमचा घेऊन मोठ्या भांड्यांतून तूप काढीत आहोंत अशी बतावणी केली आणि ' तथाकथित ' तुपाचें तामलें ऊन करण्यासाठीं शेगडीवर ठेवलें. नंतर तूप वाढण्याच्या वेळीं तिनें मला खूण केली, आणि त्या खुणेप्रमाणें मी लगेच सकाळच्या वृत्तपत्रांतील अग्रलेख पाहुण्यांच्या तोंडापुढें धरला आणि म्हणालों, पहा, या संपादकांनीं ' कूळकायदा हा कूळकायदा नव्हे. या विषयावर कसा अग्रलेख लिहिलाय तो ! ' अशा प्रकारें पाहुण्यांच्या तोंडापुढें (डोळ्यांपुढें) वर्तमानपत्र असल्याची संधि साधून तिनें मोठ्या ऐटींत चमचा खडखडवीत तूप वाढलें (म्हणजे तशी बतावणी केली).

× × × ×

माहिन्याचा शेवटचा आठवडा होता. पैशांची फारच चणचण भासूं लागली म्हणून खिशांत दोन आणे टाकून माटुंग्याहून गिरगांवला जायला निघालों. गिरगांवांतल्या एका संपादकाकडून दोन आणे रेटनें आठ कवितांचा एक रुपया येणें बाकी होता. त्याच्या वसुलीसाठीं गेलों होतों. परंतु संपादकानें नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें अंगठा दाखविला. विषण्ण मनानें नाक्यावर आलों आणि ट्रामची वाट पाहण्यासाठीं उभा राहिलों. समोरच ' पारकर यांचें मालणकर उपाहारगृह ' पाहून माझ्या पोटांतला भुकेचा राक्षस जागृत झाला ! माझी भूकहि अशी चमत्कारिक आहे कीं, खिशांत पैसे नसले कीं ती हटकून सपाटून लागते. खिशांत ट्रामपुरताच एक आणा होता आणि ट्राम यायला जसजसा उशीर होऊं लागला तसतशी माझी भूक वाढत चालली. अखेर माझ्या न कळतच माझे पाय मालणकरांच्या हॉटेलाकडे वळले. हॉटेलांत ' आख्खा कांदा ' खाल्ला. [आख्या मुंबईत ' आख्खा कांदा ' फक्त येथेंच मिळतो. दर : एका कांद्यास अडीच आणे. चटणी मोफत. कांदा तळून होईपर्यंत दहा मिनिटें थांबावें लागतें.] भजीं खाल्लीं. चहा ढोसला आणि साडेपांच आण्यांचं बिल

घेऊन काउंटरपाशीं आलों. खिशांतून रुबाबांत पाकीट काढलं, अन् पांच रुपयांची नोट काढावी अशा ऐटींत ट्रामचं तिकीट काढलं आणि मग क्षणभर पाकिटाचे कप्पे शोधण्याचें सोंग केलं आणि श्री. पारकरांना (' नॅशनल रेस्टॉरंट परिषद्, पॅरिस ' चे सभासद) अतिशय करुण चेहरा करून (करुण चेहरा करण्यांत माझा हातखंडा आहे.) मी म्हणालों,

' ओ ! सॉरी ! माझ्याजवळचे पांच रुपये सकाळींच खर्च झाल्याचें माझ्या लक्षांत नव्हतें. ते माझ्याजवळच आहेत अशा कल्पनेनें मी हॉटेलांत शिरलों. मी उद्यां गिरगांवांत येईन तेव्हां पैसे अवश्य देईन. ' असं म्हणून मोठ्या खिन्नपणानें–म्हणजे तसा आव आणून–मी माझें फाउंटनपेन त्यांच्या काउंटरवर ठेवीत म्हणालों, ' मी उद्यां पैसे आणून देईपर्यंत तुम्ही माझें हें फाउंटनपेन ओलीस ठेवून घ्या, म्हणजे तुमची खात्री पटेल. '

मात्रा बरोबर लागू पडली. साडेपांच आण्यासाठीं मी भारी पेन (पारकरांना तसं वाटलं !) ठेवून जात आहें हें पाहून, त्यांना माझ्या प्रामाणिकपणाविषयीं शंकाच उरली नाहीं. त्यांतून ते गेल्या वर्षींच पॅरिसचा प्रामाणिकपणा पाहून आले होते. त्यांनीं अर्थातच माझें पेन मला परत दिलें आणि ' पुन्हां गिरगांवांत याल तेव्हां पैसे द्या. ' असें सांगितलें. दारिद्र्य माणसाला लबाड बनवितं, या न्यायानं मी पारकरांचे साडेपांच आणे द्यायला अजून गेलों नाहीं. दुसऱ्याच हॉटेलांत परस्पर जाऊन खाण्यापिण्याचा कार्यक्रम उरकतों आणि ट्राम गांठतों.

माझ्या दारिद्र्याचा माझ्या लिखाणावरही परिणाम झाला आहे. माझ्या कथांतील नायकांना मी मास्तराची किंवा कारकुनांची नोकरी देतों आणि त्यांचा पगारहि दरमहा चाळीस रुपयांपेक्षां जास्त सहसा वाढवीत नाहीं.

× × × ×

लेखक झालों म्हणून सभा–संमेलनाच्या वर्गण्यांचें शुक्लकाष्ट माझ्यामागें नेहमीं लागतें. लेखनावरच्या मिळकतीपेक्षां वर्गणीचा खर्चच फार होतो. अशा वेळीं वर्गण्या टाळण्याच्या मी कांहीं युक्त्या करतों. कधीं आजारी पडतों. आजारी असल्यामुळें कार्यक्रमाला जाणें टळतें आणि कार्यक्रमाला जायचं नसल्यामुळ वर्गणी मागणाऱ्यांचा निम्मा दम खलास होतो आणि वर्गणीची कटकट चुकते.

कधीं कधीं सौ. च्या 'कॅजुअल लीव्ह' चें (खोटेंच) कारण पुढें करून आणि 'गृहखातें' आपल्याकडे असल्याचें सांगून ह्या वर्गणीवाल्यांना वाटेला लावतों.

महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत कुणी नुसतं चहाला आलें तरीहि आम्हांला मोठं संकट वाटतं. त्यावेळीं पाहुण्यांच्या देखत आम्हां पति-पत्नीचे होणारे संवाद पाहा—

मी—अग ए! रामभाऊ आज फार दिवसांनीं आले आहेत. त्यांना खायला कांहीं तरी कर ना! (इथं मी बायकोकडे पाहून डोळे मिचकावतों)

माझी 'ही'—(रूबाबांत स्टो ओढीत) काय करूं? बटाट्यांचा कीस कीं शिरा?

रामभाऊ—नको हो, कशाला त्रास घेतां?

मी—छेः! असं कुठं झालंय् काय? कधीं नव्हे ते तुम्ही येणार.

रामभाऊ—खरंच खायला करूं नका.

(आम्हांला तेवढेंच निमित्त पुरें होतें.)

मी—बरं तुमची मर्जी! निदान चहाचं पाणी तरी?

रामभाऊ—छे, आज फारच उष्मा होतोय्! चहाबिहा कांहीं नको!

(आम्हांला तेवढेंच निमित्त पुरे होतें.)

मी—बरं! अग, लिंबूं असेलच! मग फक्कडपैकीं सरबत कर बघूं.

ही—सकाळींच नाहीं का केशवराव नि माधवराव आले तेव्हां केलं सरबत? लिंबूं संपलंय्. (सकाळीं केशवराव, माधवरावच काय परंतु लिंबूंहि आमच्या घरीं आलें नव्हतें, हें सुज्ञ वाचकांनीं जाणलें असेलच!)

मी—अग, मग जा चटकन् नि नाक्यावरच्या भाजीवाल्याकडून घेऊन ये. तसेंच कोंपऱ्यावरच्या इराण्याकडून बर्फहि आण. बर्फाशिवाय सरबताला मजा नाहीं. जा लौकर!

(माझी अभिनयकुशल पत्नी चटकन् (रिकामीच) पर्स हातांत घेऊन चपला पायांत सरकावीत निघण्याचा आविर्भाव करते.)

रामभाऊ–(लटक्या रागानें) इंदुताई, अगोदर बसा पाहूं स्वस्थ ! उन्हाच्या कशाला चाललां आहांत लिंबू न् टिंबू आणायला ? मला मडक्यांतलं थंडगार पाणीच द्या म्हणजे बस्स !

(आम्हांला तेवढेंच निमित्त पुरे होतें.)

मी–(खिन्नपणें–म्हणजे तसा आव आणून) बरं, मर्जी तुमची ! अग, ह्यांना गार पाणीच दे ?

अशा प्रकारें रामभाऊ नुसतें थंड पाणीच पिऊन गेले, परंतु ते खुषींत गेले. त्यांना शिरा, चहा, सरबत, इत्यादि खाल्ल्याप्याल्याइतकें समाधान वाटलें होतें.

असलीं नाटकें करण्यांत आम्हां नवराबायकोचा हातखंडा आहे. कांहींहि न देतां घेतां, जणूं कांहीं सर्वच देत आहों असें मिष्टास भाषण करण्याची कला मला आणि माझ्या बायकोला फारच छान साधली आहे. (इतर बायकांनो ! माझ्या बायकोपासून हे गुण शिकून घ्या !)

मी लेखक असल्यामुळें, अतएव दरिद्री असल्यामुळें, आमच्या घरांत पैशाची ओढाताण नेहमीं असते. त्यामुळें एरवीं साध्या असणाऱ्या परंतु वेळप्रसंगीं आम्हांला महान् वाटणाऱ्या संकटांना तोंड देतां देतां माझा नि माझ्या बायकोचा मेंदु खलास होतो.

× × ×

पोस्टमन् येतोय् वाटतं. कांहीं मनी ऑर्डर बिनिऑर्डर असेल तर बरें होईल !

पोस्टमन्—वि. आ. बुवा, हें घ्या तुमचं पाकीट !

मी पाकीट उघडून पाहिलं. दक्षिणी ब्राह्मण बँकेचे गेल्या दोन महिन्यांचे कर्जाचे हप्ते थकल्याबद्दलचें फक्त पत्र होतें तें !

बंडू : आदर्श माणूस

फोर्टमधील एका मोठ्या दुकानांत मॅनेजरची एक जागा भरली जायची होती. त्या जागेसाठीं बी. ए., एम्. ए., बी. कॉम्, इत्यादि पदवीधरांचे अर्ज आले होते. आमच्या बंडूनेंहि अर्ज केला होता. धाडसच होतें तें. कारण तो नॉन्–मॅट्रिक होता. परंतु दैवयोगानें त्याला मुलाखतीचें बोलावणें आलें. सगळ्यांचे शेवटीं त्याची आणि मालकाची मुलाखत झाली. बंडूची रुबाबदार मूर्ति पाहून मालक खूष झाले. त्यांनीं त्याला थोडे निराळ्या प्रकारचे खालील प्रश्न विचारले.

मालक - तुमचं शिक्षण किती झालंय ?

बंडू—मी नॉन–मॅट्रिक आहें.

मालक—तुमचा चेहरा मोहक आणि तुळतुळीत कसा !

बंडू—मी नेहमीं ' सेव्हन ओ ' क्लॉक ' नें दाढी करतों.

मालक—तुमच्यांतल्या उत्साहाचं रहस्य काय ?

बंडू—मी माझ्या आहारांत, डाल्डांत तळलेले आणि पोळलेले पदार्थ नियमितपणें घेत असतों.

मालक—तुमचा पांढरा शर्ट सफेत कसा निघाला आणि रंगीत पँट उजळ कशी निघाली ?

बंडू—अर्थात् सनलाईट साबणामुळं !

मालक—तुमचें शरीर एवढं सतेज कसं !

बंडू—मी दररोज लक्स साबण लावून स्नान करतों.

मालक—तुमचा चेहरा एवढा तजेलदार कां दिसतो ?

बंडू—अफगाण स्नोचा हा प्रभाव आहे.

मालक—तुमचे बूटसुद्धां किती चमकतात !

बंडू—चेरी ब्लॉसम बूट पॉलिसचा हा परिणाम आहे.

मालक—तुमचे दांत एवढे शुभ्र कसे ?

संग्रहालय

' विधायक कार्य केलेंच पाहिजे ' अशीं नुसतीं पलकेंच खरडून सांगणारा परंतु स्वतः त्याची कृति न करणारा पुढारी यांच्यामध्यें आदर्श लबाड कोण ?

—स्वतः टोपी घालणारे लोक डोक्याचा खुंटीप्रमाणें उपयोग करतात, आणि दुसऱ्यांना टोपी घालणारीं माणसेंच डोक्याचा ' डोकें ' म्हणून उपयोग करतात.

—एक वेळ रक्तहीन क्रांति शक्य आहे; परंतु रक्तहीन हजामत मुळींच शक्य नाहीं.

—प्रेमविवाहित दांपत्याचें प्रेम लग्नानंतर लवकरच संपुष्टांत येतें, आणि लौकरच खटके उडण्यास सुरुवात होते. बरोबरच आहे. लग्नाच्या अगोदरपासूनच प्रेम करून करून तें संपत असल्यामुळें लग्नानंतर हा प्रेमाचा तुटपुंजा सांठा किती दिवस पुरा पडणार ?

—पत्नी कितीही कजाग आणि तोंडाळ असली तरी तिला एकाच वाक्यांत गप्प बसावितां येतें. तें दिव्य वाक्य हें होय—'मी तुझी क्षमा मागतों ! '

—कित्येक नवऱ्यांना कामाच्या दिवसापेक्षां सुट्टीचा दिवस भयंकर वाटतो. कारण या दिवशीं घरच्या 'ऑफिसरशीं' गांठ असते.

—पहिल्यांदा लोकांनींच निवडून दिलेलें परंतु अधिकारारूढ झाल्यानंतर त्याच लोकांना अप्रिय वाटणारें सरकार म्हणजे 'लोकशाही सरकार !'

—विद्वत्ता आणि दारिद्र्य, त्याचप्रमाणें मूर्खपणा आणि श्रीमंती अशी विसंगत विभागणी परमेश्वराच्या हातून गाफीलपणें झाल्यामुळें विद्वानाला श्रीमंत होतां येत नाहीं आणि श्रीमंत मूर्खच राहातो.

—व्यवहारज्ञान असलेला प्रियकर पहिलें प्रेमपत्र स्वतः न लिहितां तें प्रेयसीकडून प्रथम येईल अशी व्यवस्था करून मग पुढें तिच्या प्रत्येक पत्रास अनुलक्षून पुढील पत्रव्यवहार करतो.

—कांहीं चावट लोकांचें असें म्हणणें आहे कीं, वेश्या या आजन्म सौभाग्यवती असून सिनेमा नटी या आजन्म कुमारीच असतात.

—कांहीं लबाड मंडळींचें म्हणणें असें आहे कीं, विसराळू लोकांपासून कर्ज काढावें आणि ती रक्कम वसूल होईल अशा गरजू लोकांना व्याजानें द्यावी.

—वर्तमानपत्रांत फोटो आणि प्रसिद्धी, त्याचप्रमाणें आश्वासन देणारें एखादें बडें घेंड यांची आगाऊ तरतूद न करतां प्राणांतिक (!) उपोषण करणें म्हणजे नाहक पोटाची आबाळ करणें होय !

—बऱ्याच गिऱ्हाईकांचें असें म्हणणें आहे कीं, सलूनवाल्यांनीं सलूनमध्यें आयोडिन, बेंझॉइन, बोरीक पावडर, मर्क्यूरोक्रोम, बँडेज इत्यादि प्राथमिक उपचाराच्या वस्तू आणि हजामत पूर्ण होईपर्यंतच्या वेदनांची जाणीव न होण्यासाठीं हुंगण्याकरितां क्लोरोफॉर्मही ठेवावा.

—लग्नांत बायकोचा हात धरतां येतो, परंतु लग्न झाल्यावर तिचें तोंड धरतां येत नाहीं असा कांहीं गरीब नवऱ्यांचा अनुभव आहे.

—लफडेबाज माणसांचें असें म्हणणें आहे कीं, जन्माला येणारीं मुलें आईच्या चेहऱ्याचीं व्हावींत, म्हणजे एकंदरींत सुरक्षिततेच्या दृष्टीनें ठीक !

—रस्त्यांत येणाऱ्या देणेकऱ्यांचीं तोंडें चुकविण्यासाठीं छत्रीचा उत्तम उपयोग होतो; म्हणून बाराही महिने आपल्याबरोबर छत्री बाळगावी असें कांहीं बुडव्या मंडळींचें म्हणणें आहे.

—कांहीं लोकांना पत्नी आणि सिगारेट यांमध्यें सिगारेट अधिक प्रिय वाटते. कारण पत्नी नुसतें चुंबन देते, तर सिगारेट चुंबन देतां देतां प्रियकरासाठीं आत्मसमर्पणही करते.

—जरीचें पातळ पाहिजे असणाऱ्या धूर्त बायका एकदम जरीचें पातळ न मागतां महाग किंमतीच्या हिऱ्याच्या कुड्यांची प्रथम मागणी करतात, आणि अपेक्षेप्रमाणें नवऱ्याकडून नकार मिळतांच जरीच्या पातळावर समझोता घडविण्याचा बनाव करतात. परंतु महाधूर्त नवरे सगळ्याच मागण्यांना मुळांतच नकार दाखवून शेवटीं मेहेरबानी म्हणून ब्लाऊजच्या कापडावर बायकांची बोळवण करतात.

—मत देणें हा नागरिकांचा धर्म असून आश्वासन देणें हा पुढाऱ्यांचा धर्म आहे.

—स्त्रिया आणि भविष्यकाळ या दोन परस्पराविरोधी गोष्टी आहेत. कारण स्त्रियांच्या पोटांत 'कांहींच' राहात नाहीं, तर भविष्यकाळाच्या पोटांत काय काय आहे याचा कोणालाच आणि कधींहि पत्ता लागत नाहीं.

—उशी आणि पत्नी यांच्यांत मुख्य फरक म्हणजे उशी डोक्याखालीं असून आपल्याला आराम देते, तर पत्नी डोक्यावर बसून स्वतःच आराम करते.

—भय्याचें दूध, डाल्डा तूप आणि सावत्र आईची माया यांच्यांत स्निग्धता बेताचीच असते.

—हिंवाळ्यांतील चांदण आणि म्हाताऱ्या बाईचा रोमान्स् या दोन्ही गोष्टी अंगावर कांटा उभा करतात.

—बायको न मिळाल्यामुळें सुस्कारा सोडणारा ब्रह्मचारी, बायको मिळाल्यामुळें सुस्कारे सोडणारा विवाहित आणि बायको मेल्यामुळें सुस्कारे सोडणारा विधुर, यांच्यांत अधिक दुःखी कोण असा बऱ्याच लोकांना नेहमीं प्रश्न पडतो.

— कांहीं लोकांना अशी शंका आहे कीं, दोन बायका करणारा नवरा आणि दोन नवऱ्यांचें पत्नीत्व स्वीकारणारी बायको यांच्यांत अधिक शीलवान् कोण आणि कां ?

—संतांचीं अंतःकरणें डाल्डाप्रमाणें निर्विकार असतात. डाल्डाला घाण वास येत नाहीं आणि लोणकढ्या तुपाचा सुगंधहि येत नाहीं.

—बायको माहेरीं गेली असतां आनंद मानणारा नवरा आणि विरहानें दुःखी होणारा नवरा, यांपैकीं कोणाला आपुलकी दाखवावी असा कांहीं मित्रांना नेहमीं प्रश्न पडतो.

—कांहीं वात्रट मंडळींना असें वाटतें कीं पावसाचा हंगाम नसलेल्या एखाद्या दिवशीं अचानकपणें पाऊस यावा आणि मग आपल्याला रस्त्यांतलें ' मृच्छकटिक नाटक ' फुकटांत पहायला मिळावें.

—स्वतः गाफील राहाणें हा मूर्खपणा असून दुसऱ्याच्या गाफीलपणाचा फायदा न घेणें हा महामूर्खपणा आहे असे धूर्त माणसांचे अनुभवाचे बोल आहेत.

—चुंबन ही एकच चीज अशी आहे कीं तिची परतफेड करतांना बाकी शून्य न राहतां दोघांकडेही ती दुप्पट होते.

—स्वर्गात् परमेश्वर आणि मृत्युलोकांत ऑफिसर या दोनच गोष्टी शाश्वत असून बाकी सर्व अशाश्वत आहे.

—पोरींकडे डोळे भरून पहाण्यांत वात्सल्य असतें आणि टक लावून पहाण्यांत फाजीलपणा असतो. परंतु बऱ्याच तरुणांच्या हातून या बाबतींत गफलत होऊन त्यांच्यावर फाजीलपणाचा आरोप येतो.

—ढेकूण, सावकार, ऑफिसर आणि पत्नी, यांपैकीं प्रत्येकजण रक्तशोषण करण्यास समर्थ आहे; मग ज्या ठिकाणीं या चारही गोष्टी आहेत त्याचे हाल काय विचारावे ?

—फॅशनेबल तरुणीनें केलेला स्वयंपाक आणि बावळट तरुणीनें केलेलें प्रेम दोन्ही बेचव असतात.

—कोण आलं आहे हें बघण्यासाठीं दरवाज्याला जी लहानशी जाळी असते तिच्यामुळें, बिलें वसूल करायला येणाऱ्या लोकांपासून, 'बाबा घरीं नाहींत' असें मुलांकडून सांगवून स्वतःचा बचाव करतां येतो.

—जगांत शहाणीं माणसं नेहमीं अल्पसंख्यांक असतात, म्हणून एक एक शहाणा पुष्कळ मूर्खांना बनवूं शकतो; आणि मूर्ख लोक 'आपण बहुसंख्य आहोंत' याच समाधानांत मशगूल असतात.

—विद्वानांचा विद्वत्तेचा विषय सोडल्यास बाकी ते वेडेच असतात आणि वेड्यांचा वेडाचा विषय सोडल्यास ते इतरांइतकेच शहाणे असतात. म्हणून विद्वानांनीं वेड्यांना हंसणें हा शुद्ध वेडेपणा आहे.

—एखादी गोष्ट जशी घडली तशीच्या तशी खरी सांगण्यास बुद्धिमत्तेची आवश्यकता नसते. परंतु जेव्हां लबाड सांगायचें असतें आणि तें पचवायचें

असतें त्याचवेळीं बुद्धीची आवश्यकता असते. म्हणून मनुष्याला 'बुद्धिप्रधान प्राणी' म्हणून निर्माण करतांना त्याला लबाडीच्या वेळीं उपयोगी पडणारी शक्ति म्हणून तर परमेश्वरानें बुद्धिपुरःसर बुद्धि दिली नाहीं ना असें बऱ्याच लबाड मंडळींना वाटतें.

—सरकारनें फार मोठ्या योजना लोकांपुढें ठेवल्या कीं, धूर्त माणसें बरोबर ओळखून असतात कीं, या योजना या कारकीर्दीत पुऱ्या होत नाहींत; तर पुढील निवडणुकीच्या जाहीरनाम्यांतील तें एक 'आश्वासन छाप' कलम आहे.

—देशांतील तरुणांची नाजुक प्रकृति पाहून कांहीं मल्ल लोकांनीं असं सुचविलं आहे कीं, यापुढें या तरुणांना 'देशाचे भावी आधारस्तंभ' न म्हणतां देशाच्या 'भावी आधारकाट्क्या' असं म्हणावें.

—कांहीं मूर्ख माणसांचें (कीं शहाण्यांचें) असें म्हणणें आहे कीं, जगांतील सारीं माणसें मूर्ख असून जीं माणसें कमी मूर्ख आहेत त्यांना 'शहाणे' असें म्हणतात.

— तरुण माणसें संक्रांतीप्रमाणें असतात. संक्रांत जाते एका दिशेनें परंतु दृष्टि असते दुसरीकडेच. त्याचप्रमाणें तरुणसुद्धां जातात रस्त्यानें, परंतु दृष्टि असते समोरच्या माडीकडे किंवा गॅलरीकडे.

—कांहीं 'चान्स्' न मिळालेल्या तरुणांना डॉक्टर, ज्योतिषी आणि बांगडीवाला यांचा हेवा वाटतो. कारण या तिघां भाग्यवान् प्राण्यांना तरुणींचे हात राजरोस हातांत घ्यायला मिळतात.

—मरायचेंच झालें तर निष्णात डॉक्टराच्या हातून मरावें, म्हणजे उपचार करण्यांत कुचराई झाली अशी हळहळ तरी मरतांना वाटणार नाहीं; असें कांहीं आसन्नमरण लोकांचें म्हणणें आहे.

—स्टेशनच्या दादरावरून एखादा मनुष्य बेफिकीर चेहऱ्यानें, जरा जास्त रुबाबांत, उगीच कॉलर ठाकठीक करीत, खिसा चांचपण्याचें सोंग करीत खालीं येऊं लागला म्हणजे दाराशीं असलेला टी. सी. बरोबर ओळखतो कीं, या जंटलमन्जवळ पास किंवा तिकीट मुळींच नाहीं.

—एखाद्या माणसास फसविण्यासाठीं, तो कितपत बावळट आहे हें समजण्याकरितां जें सारासार ज्ञान लागतें त्यास 'व्यवहारज्ञान' म्हणतात, अशी तज्ञांनीं केलेली व्याख्या आहे.

—न ढळलेला पदर सावरण्यांत विनय आहे कीं लक्ष वेधून घेण्याचा हेतु आहे हें फक्त ती क्रिया करणाऱ्यालाच ठाऊक ! पुरुषांना या दोन्हींपैकीं नक्की कारण कोणतें तें अद्याप कळलेलें नाहीं.

—पलीकडच्या फूटपाथवर दोन पुरुषांचा एकमेकांना धक्का लागला म्हणजे त्या धक्क्याचें कारण अलीकडल्या फूटपाथवरून जाणारी फाकडू स्त्री होय, असा बहुतेक 'सजातीय' धक्का खालेल्या लोकांचा अनुभव आहे.*

—कांहीं लाजरे आणि स्त्रियांपासून चार पावलें दूर राहाणारे तरुण, लग्न झाल्यावर स्वतःच्या बायकोबरोबर फिरायला चालले असतां बायको आपण होऊन त्याला खेटून चालली तरी ते पूर्वीच्या संवयीप्रमाणें दूर दूर राहूनच चालतात.

—'जें न देखे रवि तें देखे कवि' याचा अर्थ कांहीं खवचट टीकाकार असा लावतात कीं, सूर्याला अंधार मुळींच दिसत नाहीं आणि कवि मात्र नेमकें अंधारांत धडपडत असतात. एवढ्या बाबतींत मात्र वरील सुभाषित खरें आहे !

—अस्ताव्यस्तपणें थापा मारणाऱ्याला समाजामध्यें 'थापाड्या' म्हणून समजण्यांत येतें आणि गंभीरपणें जे थापा मारतात त्यांना 'प्रतिष्ठित' असें समजण्यांत येतें. म्हणून उदयोन्मुख थापा मारणाऱ्यांनीं प्रथम गंभीरपणाचें तंत्र शिकून घ्यावें.

—महिला मंडळांतील स्त्रियांचा लहानमोठेपणा त्यांच्या नवऱ्यांना मिळणाऱ्या पगाराच्या आंकड्यावरून ठरला जातो, अशी कमी पगारवाल्या नवऱ्यांच्या बायकांची तक्रार आहे.

---

* मुखपृष्ठावरील चित्र पहा.

--कांहीं मवाल्यांच्या डोक्यांत एक विचार असा घोळतो कीं, एखाद्या माणसाला लुबाडण्यासाठीं त्याला क्लोरोफॉर्मचा रुमाल हुंगायला देण्याऐवजीं त्याच्यापुढें एखाद्या आधुनिक 'युगप्रवर्तक' (हा शब्द हल्लीं फार स्वस्त झाला आहे. म्हणून मीहि हा शब्द वापरण्याची संधि दवडत नाहीं.) कवीची कविता गाऊन दाखवावी म्हणजे तो माणूस तावडतोब फिट येऊन पडेल आणि मग तेवढ्या अवकाशांत आपला कार्यभाग उरकतां येईल.

—वीज कोसळणें, धरणीकंप होणें, वादळ होणें, अतिवृष्टि होणें, अनावृष्टि होणें या दैवी आपत्ती आहेत; आणि बायकोनें गाणें म्हणणें, कवीनें काव्यगायन करणें, प्रत्येक पुढाऱ्यानें उठल्यासुटल्या उपदेश करणें, पाहुण्यांचा सुकाळ होणें आणि बायको महिला समाजांत 'समाज कार्य (?)' करायला गेली असतां 'चूल आणि मूल' यांचा चार्ज स्वतःकडे येणें या मानवी आपत्ती आहेत.

—व्यापारी केवळ स्वतःच्या कुटुंबाच्या चरितार्थासाठीं आवश्यक इतकाच नफा घेऊं लागले, गवळी पाण्याचा एकही थेंब न मिसळतां शुद्ध दूध विकूं लागले, सोनार मुळींच सोनें मारीनासे झाले, परीट कपडे गहाळ न करतां बरोबर आणून देऊं लागले, मुलांमुलींचे जिन्याजवळचे चोरटे व्यवहार बंद झाले म्हणजे कलियुग संपून 'सत्ययुग' सुरू झालें असें समजावें, असें कुठल्याशा 'भविष्य पुराणां'त लिहिलें आहे.

--आपण सगळेजण परमेश्वराचीं मुलें आहोंत. म्हणजे एकमेकांचे भाऊ झालों. म्हणून जगांत लग्न झालेल्या जेवढ्या स्त्रिया आहेत त्या आपल्या वहिनी आहेत आणि लग्न न झालेल्या सगळ्या (एक सोडून) आपल्या ताई आहेत असें कांहीं साळसूद तरुण समजतात.

--लेखकांना एखादी भुक्कड कोटि सुचली आणि ती टाळण्याचा मोह आवरेनासा झाला म्हणजे ते ती कोटि नायकाच्या अथवा नायिकेच्या वडिलांच्या तोंडीं घालतात, आणि, 'नानासाहेब स्वतः केलेल्या कोटीवर बेहद्द खूष होऊन हंसूं लागले' अशी वर मखलाशी करतात.

—आज दिलेलें वचन ही उद्यां ठरणारी घोडचूक असते, म्हणून धूर्त प्रियकर प्रेयसीला कसलेंच वचन कधींही देत नाहीं.

—चावट अभिरुचीच्या वाचकांपेक्षां 'संस्कृति–संरक्षक बुद्रुक' च अश्लील साहित्य फार वाचतात. कारण त्यांना अश्लील कोठें, किती नि काय आहे याची बारकाइनें छाननी करायची असते. त्यामुळें संस्कृति–संरक्षणाच्या सभ्य बुरख्याखालीं चावट साहित्य वाचण्याची हौस या लोकांना भागवितां येते.

—कांहीं वात्रट लोक असं सांगतात कीं, नटीचें प्रेम निर्माता, दिग्दर्शक, नायक आणि नवरा या चार व्यक्तींमध्यें विभागलेलें असतें, त्यामुळें प्रत्येकाच्या वांटणीस तिचें फक्त चतकोर प्रेम येतें.

—मंडईमध्यें भाजीपाला खरेदी करणाऱ्या लोकांपेक्षां, 'चुकून' धक्का लागण्याचा अथवा मारण्याचा 'चान्स्' घेणाऱ्यांचीच गर्दी जास्त असते म्हणे!

—काय असेल तें असो! जगांतल्या बहुतेक माणसांना कोणत्या ना कोणत्या कारणानें अंधारच अधिक आवडतो.

—'इश्श' म्हणून बायकांनीं केलेल्या 'प्रतिकारां' त फारसा दम नसतो; उलट तो एक संमतीचाच प्रकार आहे म्हणे!

—दोन बायका, दोन घड्याळें आणि दोन पुढारी यांच्यांत क्वचित्च मतैक्य होतें.

—एका विद्वानाच्या मतें जगांत माणसांच्या फक्त दोनच जाती आहेत. एक सभ्य माणसांची आणि दुसरी राजकारणी माणसांची.

—पावडरीचें गोरेपण, वेश्येचें प्रेम आणि श्रीमंत बाईचें समाजकार्य या गोष्टी अल्पकाल टिकणाऱ्या असतात.

—श्रीमंतांच्या देणग्या आणि गरीबांच्या वर्गण्या गोळा करून त्याच्या बदली राष्ट्रीय गप्पा मारणाऱ्या धूर्त मंडळींच्या उद्योगाला 'राजकारण' अशी संज्ञा आहे असें एक विद्वान् सांगतात.

—पुराणामध्यें एक युग म्हणजे लाखों वर्षांचा प्रचंड काळ अशी माहिती दिली आहे. परंतु ती चुकीची आहे असा शोध हल्लीं मराठी साहित्यांत लागला आहे. या साहित्यिकांच्या मतें युग म्हणजे एक आठवड्याचा अवधि. प्रत्येक आठवड्याला एक नवा युगप्रवर्तक कवि जन्माला येतो, यावरून या विधानास पुष्टि मिळते.

—नवरा आणि खाणावळीचा मेंबर या दोन परस्पर विरोधी व्यक्ती आहेत. नवऱ्याला घरांत खाणावळीचा थाट पाहिजे असतो तर खाणावळीच्या मेंबरला खाणावळींत 'घरगुती' जेवण पाहिजे असतें.

—बायकांना पुरुषांपेक्षां एकंदरींत सौंदर्यदृष्टि कमीच असते; म्हणून त्या पुरुषाला आपला जन्माचा साथीदार करतात. आणि तेंच सौंदर्यरसिक पुरुषांचें पाहा. ते आपली जन्माची जोडीदारीण म्हणून स्त्रीला निवडतात.

—'जन्म देणें' हा आईबापांचा गाफीलपणा आणि 'लग्न करणें' हा स्वतःचा गाफीलपणा, हे दोन्ही माणसाला आयुष्यभर नडतात.

भाषणस्वातंत्र्याच्या बाबतींत वेडे खरोखरच भाग्यवान्! शहाण्यांना या बाबतींत सरकारशीं भांडूनहि पुरेसें यश मिळत नाहीं. उलट वेडे मात्र वाटेल तें बडबडूं शकतात. त्यांना कोणीहि अडथळा करूं शकत नाहीं.

—सामान्य माणसानें कसली तरी मोठी गोष्ट करण्याचें ठरविलें आणि ती इतरांना सांगूं लागला म्हणजे लोक त्यास 'थापा' म्हणतात; आणि मंत्र्यांनीं मारलेल्या खरोखरीच्या थापांना मात्र 'पंचवार्षिक योजना', 'नॅशनल प्लॅन', 'डेव्हलपमेंट स्कीम' इत्यादि बडीं बडीं नांवें मिळतात.

—नेहमीं खरं बोलण्यांत माणसांचा भोळेपणा दिसून येतो; नेहमीं खोटें बोलण्यांत माणसांचा मवालीपणा दिसून येतो; आणि शंभर टक्के खरें वाटेल इतक्या सफाईनें खोटें बोलण्यांत सभ्यपणा आणि मुत्सद्दीपणा व्यक्त होतो.

—कांहीं लेखकांना संपादकांचा आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा हेवा वाटतो. कारण त्यांचें भुक्कड लिखाणसुद्धां छापून काढण्याचें त्यांच्या हातांत असतें.

लेखकाचें अवसान खलास करणारी, 'साभार परत' ही जोडगोळी त्यांना कधींच लागू नसते.

—व्याकरणाचा मुडदा पाडण्याइतकें मनोधैर्य, शब्दांची मोडमोत लीलेनें करण्याइतका राकटपणा, रक्त, मांस, हाडकें यांचा विपुलपणें उपयोग करतां येण्याइतका हिडीसपणा आणि स्वतःलाहि न कळण्याइतका शब्दबंबाळपणा अंगीं असला म्हणजे 'नवकाव्य' करणें अवघड नाहीं असें नवकाव्याचे कांहीं टीकाकार म्हणतात.

—निवडणुकींत आपल्या पक्षाच्या उमेदवाराला मत देणाऱ्या लोकांच्या दोन जाती आहेत. एक जात स्वतःच्या वाहनानें अथवा पायीं जाऊन मतदान करणाऱ्या सभ्य लोकांची; आणि दुसरी म्हणजे प्रतिपक्षीयांच्या मोटारींतून जाऊन (आणि स्वपक्षीयाचें तेवढेंच पेट्रोल वांचवून) आपल्या उमेदवाराला मत देणाऱ्या धूर्त लोकांची !

—तसें पाहिलें तर जगांत सगळेजण मूर्ख आहेत. कांहींजणांना 'तज्ज्ञ' म्हटलें जातें याचा अर्थ एवढाच कीं त्यांचें एखाद्या विषयावरचें ज्ञान इतर चार–चौघांपेक्षां थोडें जास्त असतें. तेवढें जादा ज्ञान वजा केल्यास हे 'तज्ज्ञ' इतरांइतकेच मूर्ख असतात.

म. प्र. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क. ४३७० नों दि .....
वि. बा:बा.
अनुक्रम २८४४०
वि भाग बा:बा.
क्रमांक १५१२
नों. दि. १-१-५१
BVBK-0404370